

स्थापना १९१६



साईबाबांच्या

मूर्ती पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २



# श्री साई वाक्सुधा

जो क्षणभरही सत्संग सोडीत नाहीं; श्रीरामाच्या ठायीं ज्याची जिव्हा रत झाली आहे, विषय हे ज्याला विषाप्रमाणें वाटतात, आपणांस अध्यात्माचें ज्ञान व्हावें यासाठीं जो अहोरात्र झटून प्रयत्न करीत असतो तो साधक समजावा. जो एकांतांत बसून ईश्वराचें ध्यान करीत असतो व श्रीरामाचे गुणानुवाद ऐकत असतां अनिवार आनंदी होतो, लोक काय म्हणतील याची पर्वा न करतां जो संतसेवेंत मग्न असतो, तसेंच रमामाधव ज्याच्या अंतःकरणांत सदासर्वदा वास करीत असतो, तो साधक समजावा–निंदा स्तुति, मान अपमान, जन व जनार्दन ज्याला सारखेच वाटतात, तो साधकावस्थेला पोहोंचला आहे असें समजावें.

—श्रीसाईसच्चरि


# श्रीसाईलीला

## श्रीरामनवमी विशेषांक

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ३९ वें ] एप्रिल १९६१ [ अंक १२ वा

: संपादक :

गो. वि. क्षीरसागर

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३२६१

: कार्यालय :

'साई निकेतन,' व्हिन्सेंट रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४/बी,
दादर, मुंबई १४

# प्रिय वाचक—

शिरडी येथें प्रति वर्षाप्रमाणें श्रीसाईबाबांच्या प्रेरणेनें होणाऱ्या श्रीरामनवमी महोत्सवानिमित्त हा विशेषांक आमच्या प्रिय वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला सहाजिकच आनंद होत आहे. श्रीरामजन्माचें, श्रीरामाच्या अवतार कार्याचें व पुण्यपावन रामनामाचें महत्त्व जाणून बाबांनीं हा उत्सव सुरू करविला व तो अव्याहत वाढत्या उत्साहानें चालू आहे. असंख्य लोक उत्सवाचा लाभ घेऊन रामनामाचा आनंद लुटीत आहेत.

'श्रीसाईलीला' बाबांच्याच अनेकविध कार्याचें एक अंग असून त्यांच्याच प्रेरणेनें चाललें आहे. रामनवमीच्या निमित्तानें दरवर्षी विशेषांक प्रसिद्ध करण्याच्या प्रथेला अनुसरून हा अंक ऐन रामनवमीच्या वेळीं प्रसिद्ध होत आहे. रामायणाची व रामचरित्राची गोडी अवीट आहे. हजारों वर्षांपासून आम्हीं भारतवासी ती गोडी चाखीत आहोंत, तरीही तो अमृताचा झरा पूर्वीच्याच वेगानें या देशांत अखंड वहात आहे आणि कोट्यावधि लोकांना जीवनसाफल्याचा महामंत्र देत आहे. तसाच तो पुढेंही देत राहील. त्या चरित्राला नवे नवे पैलू पडत आहेत. विविध दृष्टिकोनांतून त्याच्याकडे पहाण्यांत येत आहे. रामकथेला व त्यांत ग्रथित झालेल्या तत्त्वांना शिळेपणा येण्याचा संभव नाहीं. जितकें म्हणून त्या कथेचें पारायण करावें, तितकें तें अधिकाधिक कल्याणप्रदच होत असतें, असा अनुभव आहे.

अशा या पुण्यपावन कथेसंबंधानें विविध दृष्टिकोनांतून लिहिलेले लेख या विशेषांकांत देतां यावेत व वाचकांची अल्प प्रमाणांत तरी सेवा करतां यावी या हेतूनें आम्हीं आमच्या निकटवर्ती मित्रांस लेख लिहिण्याची विनंती केली व हें कार्य महत्वाचें आहे, ही बाबांची अर्थात् जनताजनार्दनाची सेवा आहे या भावनेनें ज्यांनीं ज्यांनीं या अंकासाठीं लेखनसहाय्य केलें त्यांना धन्यवाद. श्री. केशव कृष्ण प्रधान बी. ए., एल. एल. बी. श्री. गणपतराव चेंबुरकर, श्री. मोरेश्वर वासुदेव लिमये बी. ए. उर्फ श्री. अवधूतस्वामी श्री. काशीनाथ महादेव ताम्हनकर बी. ए., श्री. अनंत वा. मराठे ( संपादक किरात ) त्याचप्रमाणें श्री. वि. के. छत्रे, श्री. आंबर्डेकर वगैरे लेखकांचे आभार मानावे तेवढे थोडेच होतील. त्यांच्या योग्यवेळीं झालेल्या सुंदर सहकार्यामुळें या अंकांत विविध प्रकारचें साहित्य देऊन वाचकांची सेवा करणें आम्हांला शक्य झालें. श्रीसाईलीलेवर त्यांनीं अशीच सदैव कृपादृष्टि ठेवावी अशी विनंती आहे.

———

नेली. तिचा विवेकरूपी मारुतीनें शोध लावला. मग त्या परब्रह्म रामानें लिंगदेहरूपी लंकेचें दहन करून त्या अहंकाररूपी रावणाचा वध केला व आपल्या चित्कालरूपी सीतेला सोडवून आणिलें आणि ते स्वराज्य सिंहासनावर अधिष्ठित होते झाले. तात्पर्य, हें राम – रावणयुद्ध सर्वकाल चाललें तेंच असतें! श्रीरामदासांनीं महाराष्ट्रांत श्री रामोपासना प्रसृत केली तेव्हां त्यांनीं व्यावहारिक दृष्ट्या श्रीरामाच्या रिपुमर्दनावर भर दिला होता. तथापि त्यांनींही प्रसंगोपात्त श्रीरामाविषयीं अध्यात्मपर उद्गार काढलेच आहेत. श्रीरामावरील एका आरतींत ते म्हणतात.

आरती आरती ऐक्य भावें ओवाळूं ॥
प्रकाश स्वयंज्योति निज तेजें बंबाळू ॥ ध्रु० ॥
परमात्मा श्रीराम महामाया जानकी ।
विश्रांति पावली गजर न कीजे सेवकी ॥ १ ॥
स्नेह ना भाजन, नाहीं वाती ना पावक ॥
स बाह्याभ्यंतरीं अवघा नि घोट दीपक ॥ २ ॥
ऐक्याचें सुमन–सेजे आत्मा रघुपती ।
वाचा पारुली शब्द न बोलवे पुढती ॥ ३ ॥
राम आणि दास चैतन्य पहुडलें रामीं ।
हेंहीं बोलावया दुजा नुरे धामीं ॥ ४ ॥

आणि रामनामाविषयीं सांगावयाचें तर त्रेता युगांतील श्री वाल्मीकि ऋषीपासून सध्यांच्या कलियुगांतील महात्मा गांधीपर्यंत किती तरी लोकांनीं श्रीराम चिंतनानें मनाला शांति लाभल्याचा स्वानुभव कथन करून ठेविला आहे.

**मुक्तेश्वर** म्हणतात—

" तनू चिंतितां त्या रघू–राजयाची । हरें वेधना त्या भवा वृश्चिकाची ॥
स्मरा सादरें सर्वदा राम वाचे । रुळे आंकणा क्रूर तो काळ साचे ॥ १ ॥

**तुकाराम महाराज सांगतातः—**

" राम म्हणतां तरे जाणतां नेणता । हो कां याती भलता कुलहीन ॥ १ ॥
राम म्हणतां न लगे आणिक सायास । केले महादोष तेही जळती ॥ २ ॥
राम म्हणे तया जवळी न ये भूत । कैंचा यमदूत म्हणतां राम ॥ ३ ॥
राम म्हणतां तरे भव सिंधूपार । चुके येरझार म्हणतां राम ॥ ४ ॥
तुका म्हणे हें सुखाचें साधन । सेवीं अमृतपान एका भावें ॥ ५ ॥

—( " रघुकुलतिलक श्रीरामचंद्र " या अप्रसिद्ध पुस्तकांतील एक प्रकरण )

# श्रीरामकथेचें अध्यात्मिक स्वरूप

लेखक : श्री. अ. वा. मराठे

श्रीरामायण नि महाभारत हे आपले धार्मिक ग्रंथ आहेत. त्यांत काव्य आहे इतिहासहि आहे. पण त्यापेक्षां अधिक महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांतले ना श्रीराम नि श्रीकृष्ण हे परमेश्वराचे अवतार असल्यामुळें त्यांच्या कथाच नव्हे तर त नुसतें नामस्मरणहि इहपरलोकीं कल्याणकारक होतें अशी हिंदुमात्रांची श्रद्धा आहे. आ त्या दृष्टीनें श्रीरामचंद्रांचेंच नव्हे तर रामायणांतील साऱ्या विभूतींचें आध्यात्मिक स्व आतांपर्यंत अनेकांनीं कसें वर्णिलें आहे हें इथें सांगावयाचें आहे :—

**अध्यात्मरामायणांत म्हटले आहे :—**

त्वं विष्णु जानकी लक्ष्मीः । शिवस्त्वं जानकी शिवा ॥ १ ॥
ब्रह्मा त्वं जानकी वाणी । सूर्यस्त्वं जानकी प्रभा ॥ २ ॥
लोके रमणीवाचकं यावत् तत्सर्वं जानकी शुभा ।
पुन्नाम वाचकं यावत् तत्सर्वं त्वंहि राघव ॥ ३ ॥

**एकनाथ** महाराज आपल्या '**भावार्थ रामायणांत**' सांगतात :—

आत्मप्रबोध तो लक्ष्मण । भावार्थ तो भरत जाण ॥
निजनिर्धारी तो शत्रुघ्न । आनंदविग्रही पूर्ण श्रीराम ॥ १ ॥
अहमात्मा तोचि दशरथ । उत्पत्तीसी मुख्य हो ॥
दूर गेलिया श्रीरघुनाथ । निवर्तत अहमात्मा ॥ २ ॥
आतां विवेक आणि निजविचारू, तैसे वसिष्ठ विश्वामित्र गुरु ॥
ज्या पासोनि अति साचारू । शस्त्रास्त्र विद्या दृढ केली ॥ ३ ॥
कौसल्या ते सुविद्या । सुमित्रा तें शुद्ध मेधा ॥
कैकेयी ते अविद्या । मंथरा कुविद्या तीपासीं ॥ ४ ॥
कुबिजा क्षोभवोनि अविद्येसी । श्रीराम केला वनवासी ॥
तंव सीता अनन्य भावेसी । श्रीरामासरसी निघाली ॥ ५ ॥

श्रीराम म्हणजे परब्रह्म, **सीता** म्हणजे चित्कला, **मारुति** म्हणजे सदस विवेकबुद्धि, **रावण** म्हणजे अहंकार, **लंका** म्हणजे लिंगदेह, **राक्षस** म्हणजे का क्रोधादि षड्रिपु, आणि **वानर** म्हणजे चंचल मनोवृत्ति असें मानूनहि श्रीरामक स्वरूप पुढील प्रमाणें वर्णिलें जातें. 'अहंकाररूपी रावणानें चित्कलारूपी सीता चो

# कबीर व कमाल

**********************

**कबीर थोर रामभक्त होते. ते तसेच मोठे अतिथी सत्कारशील होते. त्यांच्या आतिथ्य सत्काराच्या गोष्टी त्या काळीं फार प्रसिद्ध होत्या.**

एकदां कांहीं साधु मध्यरात्रीच्या वेळीं रामनामाचा जप करीत काशीला आले आणि कबीर रहात होते त्याच बाजूला एका जुनाट पडक्या झोंपडीसमोर उभे राहून त्यांनीं हांक मारली. झोपडींतून एक मनुष्य बाहेर आला आणि म्हणाला, 'या गरीबालाच कबीर म्हणतात. धन्य झालों आपल्या दर्शनानें.' असें सांगून कबीर साधूंना घरांत बोलावून घेऊन गेले. त्यांनीं बायकोला जागे केलें आणि म्हणाले, 'संतांच्या सेवेचा योग मिळाला आहे. साधु उपाशी दिसतात.' तेवढ्यांत त्यांचा मुलगा कमाल जागा झाला. तो सुद्धां बाबांसारखाच मोठा भक्त होता. तिघे विचार करूं लागलीं कीं, घरांत अन्नाचा एकही दाणा नाहीं रात्रीच्या वेळीं मागायचें तरी कोणाकडून. साधू उपाशी झोंपले तरी पाप. उपाशी निघून गेले तर त्याहून मोठे पाप. म्हणून काय वाटेल तें करावें लागलें तरी चालेल; परंतु साधुंच्या जेवणाची व्यवस्था केलीच पाहिजे.

कबीरांनीं जेवणाची व्यवस्था होत आहे असें साधूंना सांगून गंगास्नान करून यायची विनंति केली. साधू गंगेवर आंघोळीला निघून गेले. कबीर व कमाल तांदूळ, डाळ वगैरे शिध्याच्या शोधार्थ निघाले, पण रात्रीच्या वेळीं शिधा कोठून मिळणार? बराच वेळ विचार करून कमाल म्हणाला, 'बाबा! रामशेटच्या कोठारांतील धान्य मिळूं शकेल. मागितलें तर तो देणार नाहीं. मी जाऊन काढून आणतों. नंतर त्याला सांगून टाकूं म्हणजे झालें. तो जी शिक्षा देईल ती भोगायला मी तयार आहे.' कबीरांना हीं युक्ति रुचली नाहीं, पण दुसरा कोणताच उपाय नसल्यामुळें त्या दोघांनीं मिळून रामशेटच्या वाड्याच्या भिंतीला भोंक पाडलें. कमाल आंत शिरला, कबीर बाहेर वाट पाहत उभे राहिले. कमाल सरळ कोठाराकडे गेला आणि त्याला हवे तेवढेंच धान्य झपाझप उतवून भोंकांतून बाहेर कबीरांना देऊं लागला. सर्व काम संपल्यावर कमालनें रामशेटला हांक मारून सांगितलें, 'हे पहा रामशेट, आज गरज पडली म्हणून मी तुमच्या कोठारांतलें धान्य नेत आहे, सवड मिळेल तेव्हां परत करीन बरें का!' असें सांगून भिंतीला भोंक होतें त्या बाजूला तो पळाला. अपरात्री चोराला पाहून रामशेटची बोबडीच वळली होती. पण चोराला पळतांना पाहून त्याला धीर आला, आणि तो त्याच्या मागें धांवला. कमाल भोकांतून बाहेर निसटणार एवढ्यांत रामशेटनें मागून त्याचे पाय ओढले.

कमाल कबीरांना हळूच म्हणाला, 'आतां जर आपल्याला कोणी ओळखलें तर लोक जीं नांवें ठेवतील तीं ठेवतीलच, पण पाहुण्यांना सुद्धां राग येईल. रामशेट माझा पाय ओढीत आहे. आतां माझा बचाव होणें अशक्य आहे. म्हणून तुम्ही लवकर काम

आटपा.' आणि त्यानें खुणेनें आपलें डोकें कापून पळून जावयास सांगितलें. विचार करायला वेळ नव्हता म्हणून कबीरांनीं सुरा काढला आणि कमालाचें डोकें कापून घेऊन घरची वाट धरली.

घरीं परतल्यावर त्यांनीं बायकोला डोकें मुलाचें दाखवून म्हटलें, 'संतसेवेचा पुण्यलाभ व्हावा म्हणून मी पुत्रहत्येचें पातक केलें आहे.' आईनें मुलाचें डोकें उचलून पोटाशीं धरलें 'आई, घाबरूं नकोस.' असें तें डोकें पुटपुटल्याचा त्या माउलीला भास झाला. तिनें पुन्हां एकदां पुत्राचें तें हासरें मुखकमल आपल्या हृदयाशीं धरलें आणि मन आवरून नवऱ्यानें आणलेला शिधा घेऊन ती स्वयंपाकास लागली.

साधू गंगेवरून परत आले. कबीरांनीं पानें मांडलीं, आणि उशीर झाल्याबद्दल माफी मागितली. साधू पोटभर जेवले व तृप्त झाले. त्यांनीं नवराबायकोस आशीर्वाद दिला आणि ते झोंपले.

कमालाचें डोकें कबीरांनीं कापल्याबरोबर रामशेट धाडदिशीं जमिनीवर आदळला. आणि शिररहित धड आंत आलेलें पाहून तो घाबरून मोठमोठ्यानें ओरडूं लागला. गडबड शेजारपाजारचे लोक जमा झाले. पाहतांत तों माणसाचे धड. राजाच्या कानावरसुद्धां ही बातमी गेली. तो आपल्या शिपायांना म्हणाला, 'तें तसेंच उचलून घेऊन या आणि चौकांत उभें करून ठेवा. धडाजवळून जाता येतां ज्याच्या डोळ्यांना आसवें आलेलीं दिसतील त्याला धरून माझ्याकडे घेऊन या.' राजाज्ञेप्रमाणें कमालचें धड हमरस्त्यावर चौकांत उभें करून ठेवण्यांत आलें. तें पाहावयास सर्व लोक जमा झाले.

सकाळीं साधू उठले. अपरात्री कबीरांनीं त्यांचा जो सत्कार केला त्याबद्दल त्यांनीं नवरा-बायकोचे आभार मानले. ते म्हणाले, 'देव तुमचें कल्याण करील आणि तुमच्या सर्व इच्छा पुऱ्या करील' इतक्यांत त्या चौघांपैकीं म्हाताऱ्या साधूनें कबीरांना विचारलें. अरे हो, पण तुझा मुलगा कोठें दिसत नाहीं. अजून उठला नाहीं कीं काय ? त्याला आशीर्वाद दिल्याशिवाय कसें जावयाचें ? बोलव त्याला', कबीरांनीं कांहींतरी उत्तर देऊन तो प्रसंग टाळला.

कबीर संतांचा निरोप घ्यायला म्हणून जेव्हां बाहेर रस्त्यावर आले, तेव्हां त्यांना तेथें लोकांची मोठी गर्दी दिसली. त्यांनीं चवकशी केल्यावर त्यांना सर्व वृत्त समजलें. तो म्हातारा साधू म्हणाला, 'अरेरे ! कोणातरी दुष्टाचें हें काम असावें. चला पाहूं या कोणाचें धड आहे तें.' कबीरांनाहि त्यांच्याबरोबर जावें लागलें. धडाच्या अंगाखांद्यावर त्रिपुंड पाहून तो साधू ओरडला, 'हा कोणीतरी वैष्णव भक्त दिसतो. कपड्यावरून हा कोष्टी असावा असें वाटतें. चोरी करतांना हा पकडला जावा आणि याचें कोणीतरी डोकें कापून न्यावें हें कांहींतरी भयंकर प्रकरण असलें पाहिजे.'

कबीर साधूचें बोलणें ऐकून थोडेसें दचकलेच, पण स्वतःला सावरून म्हणाले, 'मला असें वाटतें कीं तो वैष्णव असून चोरी करावयाला गेला त्या अर्थीं तो परोपकारार्थींच चोरी करावयाला गेला असावा.'

साधूला कबीरांचें बोलणें ऐकून संशय आला. त्यानें त्या घडालाच प्रश्न केला, " कबीराचें म्हणणें खरें असेल तर घडा, तूंच उत्तर दे. तूं आपला देह परोपकारार्थ का ठेवलास ? " प्रश्न ऐकतांच तें धड नाचत नाचत पुढें आलें आणि म्हणालें, " होय. "

घडाला नाचूं लागलेलें पाहून सर्व लोक चकित झाले. तो साधू कबीरांना म्हणाला, " कबीरा, तूं कोणी तरी सिद्ध पुरुष असला पाहिजेस, नाहींतर तुला या प्रकरणाविषयीं माहिती तरी असली पाहिजे. सांग खरें काय आहे तें. " तें ऐकून कबीरांनीं साधूंचे पाय धरले. आणि रात्रीं घडलेली गोष्ट सांगून टाकली.

तें ऐकून साधूला भयंकर राग आला आणि तो म्हणाला; " अरे दुष्टा, तूं चोर पण आहेस आणि पुत्रघाती महापापी पण आहेस. आमचें दुर्दैव कीं आम्ही रात्रीं ते चोरीचें अन्न खाल्लें त्याचें जें पाप आम्हाला लागेल तें लागेलच, त्याबरोबर एका वैष्णव भक्ताच्या हत्येचें पातकही आम्हाला लागेल. "

कबीर घरीं जाऊन आपल्या बायकोलाही घेऊन आले आणि बरोबर कमालाचें डोकेंही घेऊन आले. तें डोकें पाहून साधू म्हणाला, ' हें डोकें तर तुझ्या मुलाचेंच दिसत आहे. पण हें शरीर त्याचें असेलसें वाटत नाहीं. '

खरी गोष्ट अशी कीं, कमालानें कोणी ओळखूं नये म्हणून योगबळानें आपलें धड वाढवून घेतलें होतें. कबीरांनीं कांहीं उत्तर केलें नाहीं. ते आपल्या पत्नीला म्हणाले, ' जा त्या घडावर आपलें डोकें ठेव ' तिनें घडावर तें शीर ठेवतांच तें घडाला चिकटलें कमालानें प्रथम आईला, मग कबीरांना आणि शेवटीं साधूंना नमस्कार केला.

तें दृश्य पाहून सर्व लोक थक्क झाले. त्याहून थक्क करणारी गोष्ट म्हणजे त्या साधूंच्या जागीं राम, लक्ष्मण, भरत, व शत्रुघ्न लोकांना दिसले. रामाच्या डाव्या बाजूला सीतामाई उभी होती. कबीर, त्यांची बायको व कमाल यांनीं रामपंचायतनाला वंदन केलें आणि सर्व लोकांनीं साष्टांग प्रणिपात केला.

कबीरांच्या कृपेनें सर्वांस श्रीरामप्रभूचें दर्शन घडलें म्हणून रामशेटनें कबीराचे आभार मानले आणि साधूसंतांना जेवायला बोलावून समाराधना केली.

श्रीरामायणांतील

# आदर्श बंधु व आदर्श दूत

******************************

[ लेखक : **काशिनाथ महादेव ताम्हनकर,** बी. ए. ]

श्रीरामचंद्र प्रभूचें पुण्यस्मरण करण्याचें महत्त्व श्रीसाईबाबांनीं ओळखलें आणि तें आपल्या भक्तजनांनाहि पटविण्याचें महत्व ओळखून आपल्या हयातींतच श्रीरामनवमीचा उत्सव शिरडीस सुरू केला. हा उत्सव शिरडीच्या पुण्यक्षेत्रांत दिनांक २४, २५ व २६ मार्च या तीन दिवसांत साजरा होणार आहे. साईभक्तांना आणि साईबाबांच्या सर्वच चहात्यांना या उत्सवाविषयीं सादर कौतुक वाटणें स्वाभाविक आहे.

श्री रामायणांत कुटुंबाचे व समाजाचे आदर्श भारतीय जनतेपुढें ठेवण्यांत आले असून, आदर्श मानणाऱ्या सर्व भारतीयांच्या हृदयांत या आदर्शांविषयींचा नितांत आदर मुरून राहिला आहे. कौसल्येसारखी आदर्श माता, सीतेसारखी आदर्श पत्नी, भरत व लक्ष्मण यांच्यासारखे आदर्श बंधु आणि हनुमंता-सारखे आदर्श रामसेवक, रामायणांत आहेत. श्रीराम प्रभु सारख्या आदर्श राजाचें व पुरुषोत्तमाचें आदर्श चरित्र आपल्या भक्तजनांनीं चिंतन, मननपूर्वक कित्ता म्हणून आपल्या पुढें ठेवावें म्हणूनच बाबांनीं श्रीरामनवमीचा उत्सव आपल्या पुण्य-क्षेत्रांत सुरू केला ही गोष्ट सर्वच भारतीयांना कौतुकास्पद वाटावी अशीच आहे. बाबा स्वतःच्या भक्त-संवादांत या आदर्शाला अनुसरूनच उपदेश करीत असें दिसून येतें.

## आदर्श बंधु-लक्ष्मण

लक्ष्मण हा श्रीरामाच्या सगुणभक्तींत मुरलेला बंधु होता. श्रीराम वनवासाला जाण्यापूर्वी श्रीराम प्रेमामुळें त्यानें कैकेयी मातेची व दशरथ पित्याची कडक निर्भर्त्सना कौसल्येकडे केली तरी शेवटीं असें सांगितले कीं, 'माते, तूं खात्री बाळग राम कोणत्याहि संकटांत सांपडण्याचा संभव उत्पन्न होईल, तर त्या संकटाचा प्रतिकार करण्यासाठीं त्या संकटाच्या खाईत या लक्ष्मणानें प्रथम उडी घेतली असल्याचें तुला दिसून येईल ! या लक्ष्मणाच्या धनुष्य बाणादि शस्त्रा-स्त्रांची आणि तुम्हां पूर्वजांच्या पुण्याईची शपथ वाहून तुला मी हें सांगतों तेव्हां माते तूं निर्धास्त रहा.' लक्ष्मणानें नुसती तोंडची शपथ घेतली नाहीं तर त्याप्रमाणें उभ्या हयातींत तो वागलाहि. नवविवाहित तरुण पत्नी उर्मिला हिला सोडून ऐन तारुण्याच्या उमेदींत त्यानें रामाबरोबर वनवास पत्करला, हें वर्तन किती असामान्य निष्ठेचें आहे, याचा आजच्या तरुणांनीं विचार करण्यासारखा आहे. १४ वर्षांच्या सुदीर्घ वनवासांत रामाची नाना प्रकारें सेवा करीत असतांना त्याला सीतामाईच्या पायांतील दागिन्यां खेरीज कशाचीहि ओळख नव्हती, इतकें कडकडीत ब्रह्मचर्य वा विवाहित तरुण जवानानें पाळलें, सीतामाईच्या पदवंदनाखेरीज त्यानें वर पाहिलें नाहीं असा याचा अर्थ आहे.

लक्ष्मणाच्या या सुदीर्घ तेजस्वी तपोनिष्ठेमुळें,रामविरहानें सीतामाई व्याकुळ होऊन अद्वातद्वा हृदयाला झोंबेल असें बोलली, तरी लक्ष्मणानें तिच्यावर न रागावतां तिची आज्ञा पाळून तो श्रीराम शोधास व रक्षणास गेला, ' लक्ष्मणा धांव ' ही श्रीरामाची हांक नसून मायावी राक्षसाची आहे हें तो जाणून होता. पण सीतामाईच्या आज्ञेप्रमाणें बाहेर पडण्यापूर्वी पर्ण-कुटीच्या प्रवेश द्वारापुढें त्यानें आपल्या धनुष्यानें एक रेषा मारून ठेविली आणि त्या रेषेच्या बाहेर न पडण्याची नम्र विनंति सीतामाईना केली. हीच **'लक्ष्मण रेषा'** म्हणून वाङ्मयांत प्रसिद्ध आहे. महाकुटील व महापराक्रमी गोसाव्याच्या वेषांतील रावणाला देखील ही रेषा ओलांडून आंत जाण्याची छाती झाली नाहीं ! पुढें मायावी राक्षसाच्या ढोंगानें फसल्यानंतर सीतामाईंना आपल्या निर्मळ व तपस्वी दीराला कटु शब्द बोलण्याचा पश्चात्ताप होऊन तिच्या तोंडून पश्चात्ताप युक्त शोकोद्‌गार निघाले, पण **' लक्ष्मण रेषा ' ओलांडल्याचें कटुतम प्रायश्चित्त** तिलाहि भोगावें लागलेंच !

लक्ष्मणाच्या या सुदीर्घ अशा वैवाहिक ब्रह्मचर्यामुळें आणि एकनिष्ठ सेवेमुळेंच रावणाचा महापराक्रमी पुत्र इंद्रजित याचा वध करण्याचा **एकमेव अधिकार व मान** लक्ष्मणालाच लाभला. या एकनिष्ठ आणि श्रीरामाची सगुणभक्ति करणाऱ्या बंधूच्या आदर्श चरित्राचें वर्णन करावें तितकें थोडेंच ठरेल ! आजच्या तरुणांनीं हा कित्ता डोळ्यांपुढें ठेवून, त्याच्या असामान्य गुणांचें अनुकरण करण्या सारखेंच त्याचें चरित्र आहे.

× × ×

## आदर्श बंधु भरत

भरत हा श्रीरामाचा सावत्र भाऊ असूनहि तोहि श्रीरामाचा आदर्श भक्त व सेवकहि होता. सावत्रपणामुळें त्याच्या वाट्याला निर्गुणभक्ति आली पण तीहि त्यानें आदर्श रीतीनें आचरून दाखविली.

आपली माता कैकेयी हीच श्रीराम वनवासास जाण्यास कारणीभूत झाली आणि भरताला अयोध्येचें राज्य लाभावें म्हणून तिला ही ' दुर्बुद्धि ' झाली याचा भरताला संताप आला ! तो त्या संतापाच्या भरांत कैकेयीला म्हणाला:—

**अवो, कैकयी हें काय ।**
**केलें तुवा हाय ! हाय !**
**न म्हणवे तुज माय ।**
**जन्मोजन्मीं वैरिणी**

श्रीराम पितृवचन पाळण्यासाठीं वनवासाला गेले आणि पुत्रशोकानें दशरथासारख्या थोर पित्यानें प्राण सोडला हें पाहून भरताचा उदार आत्मा संतापानें कासावीस झाला.

राज्यसत्ता व राज्य भोग यावर लाथ मारून भरत तडक श्रीरामाच्या भेटीस गेला ! पण तेथेंहि श्रीरामांनीं आपल्या वनवासाच्या व्रतापासून न ढळतां भरतावरच अयोध्येचें राज्य संभाळून चालविण्याची जबाबदारी टाकली ! त्यागी भरताला तें ' भयंकर दिव्य ' पण

काय करणार! एकनिष्ठ बंधु या नात्यानें श्रीरामाची आज्ञा पाळणें क्रमप्राप्तहि ठरलें! पण आदर्श बंधु भरतानें एका अटीवर ही आज्ञा शिरसावंद्य म्हणून पाळली!

श्रीरामाच्या पादुका भरतानें मागून घेतल्या. या पादुका त्यानेंच अयोध्येच्या राज-सिंहासनावर स्थापन केल्या आणि राज्यवस्थेचीं सूत्रें ठरवून त्यांची अंमलबजावणी करण्याचें कर्तव्य शत्रुघ्न बंधूवर सोंपविलें. राज्यव्यवस्थेचें वेळोंवेळीं मार्गदर्शन करून स्वतः भरत नंदिग्रामासच 'वनवासी रामभक्त' म्हणून राहिला! त्याचे 'वनवासी' या नात्याचें आचरण इतकें त्यागपूर्ण तपश्चर्येचें होतें कीं, श्रीराम वनवास संपवून प्रथम नंदिग्रामास भरत भेटीला आले त्यावेळीं 'वनवासी राम कोणता व भरत कोणता' हें निवडणें तेथें जमलेल्या मंडळींना कठीण गेल्याचीं वर्णनें आहेत. आपल्या सावत्र ज्येष्ठ बंधूकरितां सहज प्राप्त झालेल्या राज्याचा त्याग, राज्यभोगांचाहि त्याग, आणि चौदा वर्षें खडतर वनवास आचरूनहि राज्यकारभाराचीं सूत्रें व्यवस्थित चालविणें हा संयमपूर्ण महान् त्याग आणि ही महान् रामभक्ति यांना प्राचीन आणि अर्वाचीन वाङ्मयांत तोडच नाहीं!

× × ×

## श्रीराम-पुरुषोत्तमाची थोरवी

या ठिकाणीं एक घटना नमूद केल्यावांचून रहावत नाहीं. भरत रामाच्या भेटीस आला त्यावेळीं 'कैकयी मातेचा सुपुत्र, कैकयी मातेचा सुपुत्र' (कैकयी मातः कैकयी मातः') याच संबोधनानें श्रीरामानें त्याच्याशीं खूप संभाषण केलें. भरताच्या व लक्ष्मणाच्या मनांत रुजलेला कैकयी मातेविषयींचा तिरस्कार श्रीरामांना काढून टाकावयाचा होता! श्रीरामांच्या हृदयांत कैकयी मातेविषयींचा द्वेष किंवा तिटकारा यांना थाराहि नव्हता. वनवासाला जाण्यापूर्वी आपली माता कौसल्या व बंधु लक्ष्मण यांचे बरोबर झालेल्या संवादांत कैकयी मातेविषयीं एक वाकडें अवाक्षर देखील श्रीरामाच्या तोंडून निघालें नाहीं, ही गोष्ट रामायणाच्या वाचकांनीं व भक्तांनीं अवश्य ध्यानांत घेण्यासारखी गोष्ट आहे!

आणि तसा विचार केल्यास श्रीरामासारख्या पुरुषोत्तमाचें धोरण आणि आचरण योग्य आणि आदर्श असेंच होतें, असें दिसून येतें.

कैकेयी मातेनें वर मागितलाच नसता आणि श्रीरामाची अयोध्येच्या राज्य-सिंहासनावर स्थापना झाली असती, तर प्रचलित रामायणाला कोणती कलाटणी मिळाली असती, याची कल्पक कवींनी कल्पना लढवून 'दुसरेंच एक रामायण' रचण्याचा प्रयत्न करावा! **आपल्या 'दुसऱ्या रामायणाला' आजच्या प्रचलित रामायणाची तोड येईल काय?**

या दुसऱ्या रामायणांत 'वा-नर' अशा वानर संघटनेच्या रम्य व अद्भुत कथा कशा असतील? आजच्या **रामायणाचें-रामायणत्व** या अद्भुत व सुरम्य कथांच्या घटनांतच आहे, असें आचार्य विनोबा भावे आणि इतरहि रामायणभक्त म्हणतात.

त्याचप्रमाणें रामावताराचा जो मुख्य कटाक्ष ' दुष्ट रावणादि राक्षसांचा संहार तोहि आजच्या रामायणांप्रमणें अद्‌भुत, चित्तवेधक आणि काव्य या दृष्टीनें देखील सुरम्य असा वटेल काय ? अर्थात् या घटना जिच्या वरमागणीमुळें घडल्या त्या कैकयी मातेला दोषी ठरवून कसें चालेल ? श्रीरामांनीं कैकयी मातेला आणि पूज्य पिता दशरथ या उभयतांनाहि दोषी न ठरवितां ' पितृवचनाचें पालन ' या थोर तत्त्वनिष्ठेच्या शब्दांनीं वनवासाची संधि साधली, यांत **पुरुषोत्तम वृत्तीचा कळस** झाला, हें ध्यानीं घ्यावयास पाहिजे. ' जन्मदात्या कौसल्या मातेपेक्षांहि कैकयी मातेचें श्रीरामावर कांकणभर जास्तच प्रेम होतें, ' अशीं वर्णनें खुद्द रामायणांतच अनेक ठिकाणीं आहेत, हेंहि वाचकांनीं ध्यानांत घेण्यासारखें आहे !

× × ×

## आदर्श रामदूत हनुमान

आजकाल प्रत्येक सरकार देशोदेशीं ' अँबासडर्स ' पाठवितें आणि प्रत्येक देशांत इतर देशांच्या ' वकिलाती ' स्थापन झालेल्या आढळतात. पण इतर प्राचीन वाङ्मयांत श्रीरामदूत हनुमान यांच्यासारखा अँबॅसडर झाला नाहीं. आणि अर्वाचीन युगांत आणि वाङ्मयांत तर तो होईल असें वाटतहि नाहीं, हें अतिशयोक्तीचें विधान म्हणून मुळींच ठरणार नाहीं !

' भारताच्या भावी अँबॅसडर्सनीं आपल्या संस्कृतीची ते जातील त्या देशांना ओळख पटावी असें वागावें,' अशी इच्छा इंग्लंड व अमेरिकादि देशांतील राज्यकर्त्यांमार्फत व्यक्त झाल्यामुळें, आजकाल आपल्या संस्कृतीच्या विचारआचारांचे पाठ भारताच्या भावी अँबॅसडर्सना ऊर्फ प्रातिनिधिक व्यक्तिदूतांना देण्याची व्यवस्था आपल्या भारतसरकारनें योजनेंत आणल्याचें समजतें ! भारतावरील हा खरोखर दैवदुर्विपाकच होय !

थोर राज्यकर्ते हो, ' आदर्श रामदूत हनुमान ' यांच्या उज्ज्वल चरित्राचा अभ्यास या भावी अँबॅसडर्सना करावयास लावा, इतकेंच सुचवावेसें वाटतें ! सीताशुद्धि आणि नंतर श्रीहनुमानानें जे अद्‌भुत असें दूतकार्य केलें तें किती थोर सद्‌गुणांनीं भारलेलें आहे, हें लक्षांत घ्या. शौर्य, धैर्य, हजरजबाबीपणा, अतुलनीय प्रसंगावधान, कितीहि अवघड काम असलें तरी ते हंसतमुख उत्साहानें आणि कमालीच्या चातुर्यपूर्ण हिकमतीनें आणि धाडसानें पार पाडण्याची चपलाई, वृत्तीचा साधेपणा, उच्च विचारसरणी जरूर तेथें स्पष्ट वक्तेपणा आणि सडेतोड प्रत्युत्तरें इत्यादि सद्‌गुणांचें वर्णन करावें तितकें थोडेंच ठरणार आहे !

वरील सद्‌गुणांवर कळस चढविणारा सद्‌गुण म्हणजे ' श्रीरामभक्तिमय सेवावृत्ति ' एक ' राम ' और ' सबकुछ हराम ' ही रामदूत हनुमानांची वृत्ति !

श्रीराम वनवासाहून परत आल्यावर राज्याभिषेक प्रसंगीं सीतामाईनीं प्रियदूत हनुमानांना अत्यंत मौल्यवान् असा अप्रतिम मोत्यांचा कंठा भेट म्हणून दिला. समारंभा-

# निर्बल के बल राम !

## एक अनुभव

**श्रद्धा हें एक महान् व रामबाण औषध आहे. मानवी शरिरांतील गुप्त अध्यात्मिक सामर्थ्याचीं सारीं द्वारें श्रद्धाबळानें आपोआप खुलीं होतात व त्यामुळें त्या माणसाला मानसिक त्याचप्रमाणें अध्यात्मिक स्वास्थ्य प्राप्त होतें. तो सुखी होतो.**

तुम्हीं कोणत्याही कार्याला श्रद्धापूर्वक हात घाला. त्याच्यामागें दैवी शक्तीचें पाठबळ असतेंच असतें. तें तुमच्या लक्षांतही येणार नाहीं. श्रद्धेशिवाय पूजाअर्चा, पाठपाठांतर, पठण, प्रार्थना वगैरे सर्व क्रिया व विधि व्यर्थ आहेत. जेथें श्रद्धा नाहीं तेथें उपड्या घड्यावर पाणी ओतल्याप्रमाणें होणार. श्रद्धेविना सारे व्याप निष्फळ आहेत. ज्याला श्रद्धा लाभली नाहीं, त्यानें वरील आचार–विचार करण्याच्या व्यापांत पडूं नये. विनाकारण वेळेचा अपव्यय कां करावयाचा ? परंतु ज्यानें श्रद्धेला आपलीशी केली त्याच्या हातून किती अचाट कार्यें पार पडतात, हें आपण अनेक थोरामोठ्यांच्या व साधुसंतांच्या जीवनांत पाहिलें आहे. असें एक अलिकडच्या काळांत घडलेलें उदाहरण येथें नमुन्यादाखल द्यावयाचें आहे.

### श्रद्धेमुळें सूर्य प्रकाशला

त्या व्यक्तीचें नांव आहे श्री. सुरजमल शर्मा. नांवाशीं आपणांस काय करायचें

---

नंतर हनुमंतांची स्वारी एका झाडावर जाऊन बसली, आणि कंठ्यांतील एकेक मोती काढून दातांखालीं रगडलें आणि ‘ त्यांत राम नाहीं ’ म्हणून फेंकून दिलें ! सामान्य जनांनीं ‘ अखेर वानर तो वानरच ’ म्हणून कुचेष्टा केली आणि ‘ तुझ्यांत तरी आहे कां राम ? ’ म्हणून विचारलें. त्यावेळीं कपाटाची कवाडें उघडतात तशी हृदयकपाटाचीं कवाडें उकलून श्रीहनुमंतांनीं या सामान्य जनांना **स्वतःच्या हृदयांतील श्रीराम-प्रभूचें दर्शन घडविलें !**

सदरील आख्यायिका खरी माना अगर खोटी माना, त्यांतील **तत्त्वबोध मात्र शंभर नंबरी खराच आहे !**

आजच्या व भावी राज्यदूतांनीं ‘ श्रीरामदूत हनुमान ’ यांच्या चारित्र्याचा आदर्श डोळ्यापुढें ठेवून वागल्यास आजची वकिलात–खातीं भारताचें बहुत कल्याण साधूं शकतील ! यावर कोणी म्हणतील, ‘ **ह्याचे अगोदर भारताचें लोकराज्य राम-राज्याच्या तोडीचें झालें पाहिजे** ’ ! या विषयीं जास्त कांहीं न लिहितां हा लांबलेला लेख ‘ **तथास्तु** ’ म्हणून पुरा करतों.

---

आहे ? परंतु या सुरजमलच्या जीवनांत श्रद्धेपायीं सूर्य कसा प्रकाशला हें येथें सांगावयाचें आहे. त्यांचें वय असेल सुमारें साठ वर्षांचें. १९५९ सालीं ते बद्रिनाथ व केदारनाथची यात्रा करून आले. यू. पी. मध्यें रहाणारे. ४–५ वर्षांपूर्वींच्या काळांत त्यांच्या जीवावर अनेक आघात झाले. १९५१ सालीं ते भयंकर आजारी स्थितींतून कसेबसे वर उठले. लाडका व कर्तासवरता मुलगा फार आजारी झाला. त्याच्यासाठीं दगदग सोसावी लागली. अनेक शारीरिक कष्ट घेतले; अपरंपार पैसा खर्च केला; परंतु शेवटीं यश न येतां मुलगा हातचा गेला. या गोष्टीचा मनावर व व शरिरावर अत्यंत विपरीत परिणाम झाला. पोटांत कांहींतरी रोगानें घर केलें. आस्ते आस्ते भूक कमी होत गेली. व शेवटीं अशीं एक स्थिति वाट्यास आली कीं, जें कांहीं खावें तें वांतीच्या रूपानें बाहेर पडावें. कोणतीही साधीसुधी खाल्लेली वस्तु पचन होईना. अशा स्थितींत करावयाचें काय ? पाणीही पचन होईनासें झालें. शरिरांत कांहीं जाईना व जर गेलेंच तर तें टिकेना. याचा परिणाम काय व्हावयाचा ? शरीर रोडावत चाललें ! डॉक्टरांनीं प्रकृतिमान तपासून पाहिलें व आंतड्याचा टी. बी. झाल्याचें निदान केलें; तसेंच तज्ञ डॉक्टरांकरवीं उपाययोजना करवून घ्यावी असेंही सुचविलें. त्यांची असहाय्य व केविलवाणी स्थिति पाहून एका गृहस्थानें एका जवळच्या शहरीं असलेल्या एका टी. बी. तज्ञ डॉक्टरांचा त्यांना पत्ता देऊन त्यांच्याकडे जाण्याचा सल्ला दिला.

### आगींतून फोफाट्यांत

आपली हकीगत निवेदन करतांना सूरजमल सांगतात कीं, जवळचा पैसा बहुतेक संपुष्टांत आलेला होता; परंतु माणसाला जगण्याची बलवत्तर आशा असते. त्याच्यासाठीं तो वाटेल ती धडपड करील. जरुरीपुरतें कर्ज काढून मी त्या गांवीं गेलों व त्या डॉक्टराचें औषध घेऊं लागलों. औषध चालू होतें. एके दिवशीं झोपलों असतां पाय एकदम आखडले. त्यांची हालचाल होईना ! ही आणखी कोणती नवी आपत्ति ! हिला तोंड कसें द्यायचें ? त्या डॉक्टरानें निराश करून मला मुंबईला मोठ्या डॉक्टराकडे जाण्याचा सल्ला दिला. मग लंडनलाच कां नको ? परंतु हे व्याप करायला पैसा कुठें होता ? आणि शरीरांत तरी त्राण कुठें राहिलें होतें !

निराश झालों, आशेचा एखादाही किरण दृष्टीस पडेना; शेवटीं जें कांहीं व्हायचें असेल तें होवो. आपण आपल्या गांवीं जाऊन रामनामाचें चिंतन करीत अखेरचे दिवस घालवायचे असें ठरविलें व मी नजीबाबाद या माझ्या गांवीं येऊन दाखल झालों.

अशक्तपणा व त्यामुळें शरिराचा परावलंबीपणा उत्तरोत्तर वाढत चालला होता. मी आतां मरणाला भीत नव्हतों. तो माझ्यावर झडप घालणार ही खूणगांठ बांधून मी मोकळा झालों, होतों.

आमच्या गांवीं एक देवीचें देऊळ आहे. घरापासून फार जवळ. एके दिवशीं त्या देवळाच्या पायरीवर बसून जीवनासंबंधानें विचार करीत होतों. या काळांत रामनाम

ह्याच माझा सर्वाधार होऊन राहिला होता. बुडत्याला आणखी दुसरा कोण आधार देणार ?

**एका साधूचा सल्ला**

इतक्यांत कोणी एक साधु पुरुष त्या मंदिरांत देवीदर्शनासाठीं आलेला मी पाहिला. त्यानें माझ्याकडे पाहिलें. त्याला माझी करुणा आली असावी. तो म्हणाला, 'असा सचिंत येथें बसून काय करीत आहेस ?'

तेव्हां माझ्या चिंतेचें कारण मी सांगितलें व सर्वपरीनें निराश झाल्यानंतर आतां आयुष्याच्या घटका मोजीत येथें बसलों आहे असेंही सांगितलें.

यावर तो सत्पुरुष म्हणाला, 'ठीक आहे; डॉक्टरांनीं सांगितलेले सारे उपाय व उपचार करून झाले म्हणतां. परंतु अजून एक डॉक्टर शिल्लक राहिला आहे. त्याचा इलाज करून कांहीं गुण येतो का पहाना ! माझ्याजवळ, माझ्या परिचयाचा एक थोर व मोठा चमत्कारिक डॉक्टर आहे. त्याचा इलाज मी सांगतों; परंतु तुम्हीं तो करून पहाल कां ?'

"महाराज मी किती निराश झालों आहें व आयुष्याचे अखेरचे दिवस कसे मोजीत आहे याची कल्पना आपणांस आतां झाली आहे. आपल्या डॉक्टराचा इलाज मला शक्य असल्यास मी जरूर करीन. परंतु आपल्या त्या भल्या डॉक्टराचें नांव मला सांगाल का ?

'कां नाहीं सांगणार ! त्याचें नांव आहे भगवान् ! सर्वांचे उपाय करून थकलां; आतां या डॉक्टराचा एक उपाय मी सांगतों तो करून पहा !'

त्या सत्पुरुषानें नंतर उपाय सांगितला. पेलाभर पाणी घ्यायचें; परंतु तें साधें नाहीं बरं का ? गंगेचें पाणी घ्यायचें व त्याबरोबर कुटून वस्त्रगाळ केलेली सुंठ, तीन मासे तोंडांत टाकावयाची. याप्रमाणें एकवीस दिवस हा इलाज करायचा. या एकवीस दिवसांत दुसरें कांहींएक खायचें, प्यायचें नाहीं. गंगेचें पाणी व सुंठीची पावडर हेंच आपलें भोजन समजायचें !'

**डॉक्टराची फी दिली पाहिजे**

असें सांगून तो साधु तेथून बाहेर निघून गेला; त्याच्या मागोमाग मी बाहेरच्या पटांगणांत उघड्यावर येऊन बसलों, व त्यांनीं सांगितलेल्या उपायासंबंधीं विचार करूं लागलों. साधी गोष्ट होती; आपण ती योजना अंमलांत आणावयाची असा विचार करीत आहें तोंच तो सत्पुरूष पुन्हां आला व माझ्यापुढें उभा राहून म्हणाला 'अहो ! तुम्हीं माझी फी नाहीं दिली '! कोणीही डॉक्टर किंवा वकील फी घेतल्याशिवाय काम करणार नाहीं. डॉक्टरची तर फी दिलीच पाहिजे. त्याशिवाय गुण कसा बरें येईल ?'

'महाराज ! मी एक गरीब, दुबळा माणूस आहें. माझ्याकडून आपण फीची अपेक्षा करूं नये, अशी माझी हात जोडून विनंती आहे. खरोखर मी कांहीं देऊं शकत नाहीं आपणास महाराज !'

'मला नको कांहीं; परंतु भगवंताची फी त्याची त्याला देऊन टाकलीच पाहिजे !'

'ठीक आहे; काय द्यावें लागेल तें तरी सांगा !'

'भगवंताला तुमचे रुपये, पैसे, आणे नकोत. त्याच्यापाशीं कुबेराचें भांडार भरलेलें आहे; परंतु भगवंताची एक अपेक्षा आहे. तुम्ही भगवंताशीं तन्मय झालें पाहिजे. ध्यानीं मनीं भगवंत ! असें होण्याचें एक साधन मी तुम्हांला सांगतों. तुम्हीं तुळसीदासजींचें रामायण नित्यनेमानें पठण करीत जा. श्रद्धेनें पठण करीत जा. तुमच्या शरिराच्या नसानसांतून नव्या शांतीचा संचार होत जाईल. तुमच्यांतून गेलेलें चैतन्य शरिरांत पुन्हां प्रवेश करूं लागेल. मी सांगितला तो सुंठ पाण्याचा इलाज करायचाच व त्याबरोबर रामायण पठण व निदिध्यासही चालू ठेवायचा म्हणजे गुण लौकर व खात्रीनें येईल. तुम्हीं बिलकुल निराश होऊं नका. भगवान् कृपाळु आहे. तो तुमच्यावर दयेची पाखर पसरल्याशिवाय रहाणार नाहीं. सारें स्वास्थ्य, सौंदर्य व समाधान तेथें आहे. पहा तर खरें हा उपाय करून ! त्यामुळें तुमच्या विचारांत थारेपालट होईल. सुंदर सुंदर विचार मनांत घोळूं लागतील व तेच तुमचें मंगल घडवून आणतील. मग सांगा, रामायणाचें पारायण तुम्हीं किती वेळ कराल ? मला वचन दिलें पाहिजे.'

माझ्या अंगांत एकाएकीं उत्साह संचारला होता. त्या भरांत मी बोलून चुकलों कीं मी रामायणाचीं एकावन्न पारायणें जरूर करीन.

**मी खडखडीत बरा झालों**

हातांत पाणी घेऊन त्यांनीं मला शपथपूर्वक संकल्प सोडायला लाविला; जातांना म्हणाले,"माझ्या सांगण्यावर संपूर्ण श्रद्धा ठेवा. मी आतां जातों. उद्यांपासून सांगितलेला कार्यक्रम सुरू व्हावा. तुमची पारायणें पूर्ण झालेलीं असतील तेव्हां मी येईन व तुम्हांला भेटेन, जा; देव तुमचें भलें करील !"


दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :—DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन्स (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

छबिलदास रोड, दादर (W. R.), मुंबई २८

तो सत्पुरुष निघून गेला, परंतु माझ्या मनावर कायमचा ठसा उमटवून गेला. दुसऱ्या दिवसापासून मी श्रद्धायुक्त अंतःकरणानें त्या सत्पुरुषानें सांगितलेला इलाज व रामायणाचें पारायण मनोभावें सुरू केलें. पाणीही पचत नव्हतें. तें आतां पचूं लागलें. थोड्याच दिवसांनीं मी थोडाथोडा टोमॅटोचा रस घेऊं लागलों; परंतु हें एकवीस दिवसांनंतर हो !

रामायणाचीं सात पारायणें पूर्ण होत आलीं आणि त्या दरम्यान मला नवा जन्म झाल्यासारखें वाटूं लागलें. दुःखी कष्टी करणारे विचार पार पळाले. भोजन घ्यावें असें वाटूं लागलें. साधें व हलकें भोजन थोडथोडें घेऊं लागलों. बाहेर पडून हळुहळू हिंडू फिरूं लागलों. या स्थित्यंतरामुळें माझी श्रद्धाही वाढत चालली. त्याबरोबर शरीरबळही वाढूं लागलें.

रामायणाचीं दहा बारा पारायणें पार पडलीं आणि मी निरोगी झाल्यासारखें मला वाटूं लागलें. वाटूं लागलें एवढेंच नव्हे तर मी ठणठणीत बरा झालों !

रामायण ग्रंथाची थोरवी मला आतां समजू लागली. त्यांत जीवनाला जरूर असलेलें अमृत ओतप्रोत भरलेलें आहे. माणसाला संजीवन देणारा तो ग्रंथ आहे याची खात्री वाटूं लागली.

( —हिंदी 'कल्याण' मधील एका लेखाच्या आधारें )

---

# वर्गणीदारांस विनंति

श्रीसाईलीला मासिकाच्या वर्गणीदारांपैकीं ज्यांचा वर्षारंभ एप्रिलपासून होतो त्यांनीं आपली वर्गणी पांच रु. कृपा करून शक्य तेवढी लौकर खालील पत्त्यावर पाठवावी. श्रीसाईलीलेचें दरवर्षी तीन खास अंक प्रसिद्ध होत असतात. (१) श्रीरामनवमी, (२) विजयादशमी व (३) गुरुपौर्णिमा हेच ते खास व विशेष अंक होत. वार्षिक टपाल खर्चासह अवघ्या पांच रुपये वर्गणींत या तीन खास अंकांसह श्रीसाईबाबांच्या सेवेस वाहिलेलें व आपणांस भक्तिभावपर व धार्मिक आणि अध्यात्मिक दृष्टया मार्गदर्शक होऊन राहणारें मासिक वर्षभर वक्तशीरपणें आपल्या भेटीस येत असतें. तरी कृपा करून आपली वर्गणी आपण लौकर पाठवावी व शिवाय आपल्या कल्याणासाठीं व सर्वांगीण उन्नतीसाठीं सुयोग्य असें साहित्य आपणास पुरविणाऱ्या या मासिकास कमींत कमी दोन तरी वर्गणीदार मिळवून देऊन आमच्या या सेवाभावाच्या कार्यांत आपणहि सहकारी व्हावें अशी कळकळीची विनंती आहे.

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

वर्गणी पाठविण्याचा व पत्रव्यवहाराचा पत्ता —**श्रीसाईलीला** कार्यालय, साई निकेतन, व्हिन्सेंट रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४/बी, दादर, मुंबई १४

---

# महात्माजींना रामनामाचें महत्व

**रामनाम म्हणजे म. गांधींचा जीवनाधार. त्यांनीं स्वातंत्र्य-प्राप्तीसाठीं प्रचंड लढा देशभर चालविला व त्यांत यशही संपादन केलें. त्या लढ्याच्या पाठीशीं रामनामाचा आधार होता. रामनामावर त्यांची असीम श्रद्धा व भक्ति होती.**

विलायतेंत शिक्षण घेऊन, तेथील वातावरणांत दीर्घकाळ राहून व बॅरिस्टरीची परीक्षा उत्तीर्ण होऊन आलेले महात्मा गांधी, स्वतः भंगी, धोबी, बवर्जी, दाई, मोची हीं सर्व कामें करायला शिकलेले व तीं कामें करणारे गांधी, यूरोपीयनांच्या दीर्घ सहवासांत राहिलेले गांधी, व आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं अहोरात्र चिंतन करणारे व त्यासाठीं झगडणारे गांधी रामायण व गीता यांच्याकडे कुठून लक्ष देणार ? त्या धर्मग्रंथांकडे त्यांचें लक्ष तरी कसें जाणार व लागणार ? सहाजिक हे प्रश्न कोणाहीपुढें उभे रहातील, परंतु नाहीं. रामायण व गीता म्हणजे महात्माजींचा सर्वाधार. सर्व चळवळींचा पाया. त्यांच्यावर तर त्यांनीं स्वातंत्र्याची इमारत रचिली व त्यांत यश मिळवून दाखविलें. रामनामाचा स्वतः भरपूर फायदा घेऊन इतरांपुढेंही तो अनुभवसिद्ध आधार त्यांनीं ठेविला. संकटमुक्त करणारें व योग्य मार्ग दाखविणारें रामनामासारखें दुसरे खात्रीचें साधन नाहीं असें त्यांनीं परोपरीनें सांगितलें आहे. देहत्याग करण्याची वेळ आली तेव्हांही अखेरच्या घटकेला त्यांनीं रामनामाचाच आधार घेतला. रामनाम त्यांच्या जीवनाला व्यापून राहिलें होतें.

## सर्व धर्मीं समानत्व

म. गांधींनीं सर्व धर्मांच्या मुख्य ग्रंथांचा बारकाईनें अभ्यास केला होता. सर्व धर्मांकडे पहाण्याची त्यांची दृष्टि प्रेमादराची होती; परंतु असें असूनही रामायण व गीता या दोन ग्रंथांचे ते परम भक्त होते. त्या ग्रंथांनीं त्यांना आकर्षित करून ठेविलें होतें.

महात्माजींच्या रोजच्या पठणांत गीता येत असे, त्याचप्रमाणें श्रीतुळशीदासजींचा 'श्रीरामचरित मानस' हा ग्रंथही त्यांच्या दैनंदिन पठणांतील होता. त्यांतील एकेक दोहा नव्हे, तर एक एक शब्द गोडी लावून ते पुन्हां पुन्हां वाचीत असत. तुळसीदासजींचें रामायण म्हणजे श्रद्धेची खाण आहे; तो प्रेरणा देणारा व कल्याण करणारा ग्रंथ आहे असें ते नेहमीं म्हणत असत. भक्तिमार्गाचें सुंदर विवरण करणारा त्याच्यासारखा ग्रंथ नाहीं असें त्यांचें सांगणें असे.

आपल्या मित्रांस ते मधून मधून वारंवार लिहीत असत कीं, रामायणाचा अत्यंत बारकाईनें अभ्यास करा; त्याचें चिंतन करा. साबरमती आश्रमांत महात्माजी सर्वांकडून

रामायण नित्यशः वाचवून घेत असत व त्यावर विवरण करीत असत. त्यांच्याजवळ तुळसीदासजींचें रामायण व प्रो. रामदास गोडे यांनीं त्यावर लिहिलेली टीका नेहमीं असे. दुपारीं थोडी विश्रांती घेतल्यानंतर ते या ग्रंथाकडे नित्य वळत असत. जो जो कोणी जवळ येईल मग ती स्त्री असो वा पुरुष असो, तिला किंवा त्याला ते रामायणाचें महत्त्व समजावून सांगत असत.

१९३२ सालीं ते येरवडा जेलमध्यें होते. तेथून त्यानीं आश्रमवासीयांस पाठविलेलीं पत्रें उपलब्ध आहेत. त्यापैकीं बहुतेक पत्रांतून त्यांनीं आदेश दिलेला आढळून येतो कीं, आश्रमांतील सर्वांना रामायण वाचायला व त्यावर विचार करायला लावा; कारण तो ग्रंथ अत्यंत संस्कारक्षम आहे. त्या ग्रंथाचें वाचन, मनन करावें तेवढें थोडेंच आहे.

## भरताचा आदर्श

श्री. मगनलाल गांधी यांची गांधीजीवर आत्यंतिक निष्ठा होती. त्यानीं त्यांस सर्वस्व अर्पण केलें होतें. १९०७ सालीं त्यांना लिहिलेल्या एका पत्रांत गांधीजी म्हणतात, भरताचा निःस्वार्थ व उच्चतम आदर्श तुम्हीं आपल्या दृष्टीसमोर सदैव ठेवावा, तो कल्याणकारी आहे.

महात्माजी श्रीरामचंद्राचे खरेखुरे उपासक होते. रामायणांतील परोपकार वृत्ति व इतर अनेक गुण आचरणांत आणण्यासाठीं ते नेहमीं झटत असत. गोस्वामी तुळसीदासजीना ते रामाचे अनन्य भक्त समजत असत. गोस्वामीजीनी रामायणांत संताच्या ठायीं असलेल्या गुणांचें वर्णन अनेक ठिकाणीं केलें आहे. जणूं काय गांधींजीसारख्या संतांचेंच चित्र तुळसीदासजींनीं रामायणांत उभें केलें आहे.

गांधीजींना बालवयांत रामनामाची गोडी लागली व ती उत्तरोत्तर वाढत गेली. त्यांच्या घरीं रंभा या नांवाची एक मोलकरीण होती. बालपणीं गांधीजीना भुताखेतांचें भारी भय वाटत असे. रात्रींच्यावेळीं अंधारांत जाणें, त्या भीतीमुळें ते टाळीत असत. मोलकरणीनें त्यांना सांगितलें कीं, 'राम, राम' म्हणत राहिल्यानें भुतेंखेतें दूर पळतात. त्या नांवाच्या वाऱ्यालाहि तीं उभीं रहात नाहींत. गांधीजींचा त्या सांगण्यावर विश्वास बसला. ते त्या वेळेपासून रामनामाचा जप करूं लागले व तो त्यांचा स्वभावगुणच बनून गेला.

रामनामावर गांधीजींची किती अढळ श्रद्धा होती याची आपल्याच्यानें कल्पनाहि करवणार नाहीं. प्रकृतींत कधीं बिघाड झाला तर ते म्हणत असत कीं, माझा डॉक्टर श्रीराम आहे. श्रद्धापूर्वक तें नांव मी घेत राहिलों तर सारे रोग माझ्यापासून दूर पळून जातील. या जगांत रामनामासारखें 'रामबाण' दुसरें कोणतेंही औषध नाहीं. महात्माजींची रामनामावर उगाच नाहीं एवढी अपरंपार श्रद्धा बसलेली होती. रामनाम संकट प्रसंगीं त्यांना ढालीसारखें वाटत असे. व त्याच्या सहाय्यानें कितीतरी अडचणींतून

# श्रीरामकृष्ण उपनिषद् – ( ३ )

## विद्वत्ता व भक्तिभाव

**श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या बोधवचनांस श्री. सी. राजगोपालाचारी यांनीं आजच्या काळास अनुसरून दिलेला हा सुंदर व बहुमोल पेहेराव आहे. प्रत्येकानें विचार करून आचरणांत आणावा अशीच त्यांची कल्याणकारी शिकवण आहे.**

ब्रह्म समाजाचे एक प्रमुख पुढारी केशवचंद्र सेन हे एकदां दक्षिणेश्वर मंदिरांत श्री रामकृष्ण परमहंस यांच्या भेटीसाठीं आले असतां म्हणाले, ' कधीं कधीं शिकले सवरलेले विद्वान लोकही मूर्खासारखें वर्तन करीत असतात, याचें कारण काय बरें असावें ? ते शास्त्रपारंगत असतात परंतु त्यांच्यांत शहाणपणाचा गंध नसतो. ते सुखोपभागांत लोळत असतात व त्यांतच समाधान मानून रहातात. त्यांच्या ऐहिक इच्छा आकांक्षा बलवत्तर असतात व त्यांनाच चिकटून राहण्यांत ते समाधान मानतात याचें कारण काय बरें असावें ? '

### गरुडाची दृष्टि

यावर रामकृष्ण परमहंस म्हणाले, गरूड पक्षी आकाशांत उंच उंच भराऱ्या मारीत असतो. आकाशांतील शुद्ध व स्वच्छ हवेंत मारलेल्या त्या भराऱ्या असतात; परंतु त्याची नजर कशावर असते माहीत आहे ? खालीं कुजकीं नासकीं प्रेतें, मांस, हाडें यांच्याकडेच त्याचें सारें लक्ष असतें.'

आम्हीं एखादा पवित्र धर्म ग्रंथ पठण करीत असलों तरी मनांत नाना प्रकारच्या इच्छा वावरत असतात; तें अनेक गोष्टींच्या मागें लागलेलें असतें. विद्वत्ता ही एक वेगळी गोष्ट आहे. आमच्या इच्छा, आकांक्षा हा एक वेगळाच प्रकार आहे.

---

ते पार पडले. शुद्ध मनानें रामनाम जपलें असतां तुम्हांला कशाचीच धास्ती बाळगायला नको.

**' कोटि कोटि मुनी जतन कराहीं**
**अंत राम कहि आवत नाहीं '**

असें गोस्वामी तुळसीदासजींनीं म्हटलें आहे; आणि तें खरें आहे. अंत काळीं ज्याला श्रीरामचंद्राची आठवण होईल तोच खरा भाग्यवान् व पुण्यपुरुष. गांधीजीवर या जगाचा निरोप घेण्याचा प्रसंग ओढवला तेव्हां ' राम राम ' म्हणत त्यांनीं सर्वांचा निरोप घेतला.

पवित्र धर्मग्रंथांच्या व साधुसंतांच्या लीलांच्या वाचनानें व अभ्यासानें आम्हांला शहाणपणा यावा अशी अपेक्षा असते; परंतु आमच्या मानगुटीवर ज्या इच्छा व आवडत्या गोष्टी यांचीं भूतें बसलेलीं असतात त्यामुळें प्रगतीच्या मार्गांत व्यत्यय येत असतो.

केवळ विद्वत्ता संपादन करणें एवढ्यानें आपला कार्यभाग साधणार नाहीं. आम्हीं एखाद्या भाषेवर प्रभुत्व मिळवूं; आम्हीं गीतेंतील श्लोक किंवा इतर मंत्र तोंडपाठ म्हणण्यांत पटाईत असूं. मंत्र म्हणत असतां एखादीही चूक आम्हीं करणार नाहीं. या गोष्टी आपण करूं शकतों एवढेंच त्यांचें महत्त्व. त्या पलीकडे दुसरें कांहीं नाहीं. आम्ही ज्या कशाची इच्छा बाळतों त्यामुळें आमचें पतन होतें किंवा आपण उच्चस्थानावर तरी आरूढ होतों. जोंपर्यंत कामिनी, कांचन व जगांतील इतर नाना व्यवहारांत गुरफटून गेलों आहोंत किंवा त्यांच्या बंधनांत सांपडलों आहोंत, तोंपर्यंत आम्हीं संपादन केलेल्या पुस्तकी ज्ञानापासून आमचा यत्किंचितही फायदा होण्याची आशा बाळगायला नको. आम्हीं मिळविलेल्या विद्वतेच्या बळावर आम्हीं विद्वत्ताप्रचुर प्रवचनें देऊं शकूं. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या,' अशी तोंडपाटिलकी करूं, ब्रह्म, ज्ञानयोग, भक्तियोग, जीवात्मा, परमात्मा वगैरे जाड्याजुड्या शब्दांचा सरसहा वापर करून आम्हीं ऐकणाऱ्यांच्या कानांची तृप्ति करूं; वाहवा! काय पण वक्तृत्व! अशा प्रकारची शाबासकी त्यांच्याकडून मिळवूं. परंतु हें सारें बोलणें ओठापर्यंतच. त्याचा शिरकाव अंतरंगापर्यंत, अंतःकरणापर्यंत मुळींच झालेला नसतो. या विद्वत्तेचा पूर्ण फायदा आमच्या पदरांत कधीं पडेल? जेव्हां आमच्या अंतरापर्यंत तें ज्ञान व ती विद्वत्ता जाऊन पोहोंचेल व जेव्हां आमचें मन ईश्वराच्याठायीं रत होत असेल तेव्हां. नाहींपेक्षां कितीही शास्त्रें आणि पुराणें वाचलीं व उलथीं केलीं तरी त्याचा तुम्हांला कांहींएक उपयोग होऊं शकणार नाहीं. सा री ग म प ध नि हे गायनांतील स्वर किंवा बोल झाले. परंतु ते स्वर खड्या आवाजांत उच्चारणें म्हणजे कांहीं गायन नव्हे. विद्वत्ता ज्ञान, त्याग यांच्यावर शब्दजाल पसरून तुम्हीं लोकांता झुलवूं शकाल; परंतु खरीखुरी विद्वत्ता व कांटेकोर त्याग या फार वेगळ्या गोष्टी आहेत; एवढेंच नव्हे, तर त्या मिळविणेंहि कठीण आहे.

## पाठांतर झालें म्हणून भागत नाहीं

एखादें पंचांग किंवा तारखेचें कॅलेंडर असतें.. त्यांत अमुक दिवशीं कमी किंवा जास्त प्रमाणांत पर्जन्यवृष्टि होईल असें लिहिलेलें असतें. तें कधीं कधीं खरें ठरतें व प्रत्ययास येतें; परंतु त्या पंचांगांचीं पानें घेऊन चुरगळल्यानें पावसाचें पाणी मिळूं शकणार नाहीं. तुम्हीं कितीहि जोर काढा, तुम्हांला पाण्याचा एखादा थेंबहि मिळणार नाहीं. मिळेल का? आपण जे धार्मिक व शास्त्रीय ग्रंथ वाचतों त्यांत किती सुंदर व रम्य भावना रेखाटलेल्या असतात! परंतु त्या वाचल्यानें किंवा त्यांचें पाठांतर केल्यानें त्या भावना आपणास आत्मसात् करतां येतील का? शास्त्रें किंवा भक्तीपर काव्यें वाचल्यानें आपणांस भक्तिभावाचा लाभ होऊं शकणार नाहीं. तुम्हांला भक्तिभावाचा ओलावा केव्हां

मिळेल ? तुम्हीं आपल्या भरधांव सुटलेल्या इच्छा, आकांक्षा ताब्यांत ठेऊं शकाल, त्या कशा आटोक्यांत ठेवाव्या या संबंधींचें ज्ञान आचरणांत आणूं शकाल, तेव्हांच भक्तिभावाची जोड तुमच्या वाट्याला येईल.

तुमची विद्वत्ता आणि अगाध बुद्धिमत्ता देवापुढें काय करायची आहे ? देव विद्वत्तेचा नाहीं तर शुद्ध भावाचा भुकेला आहे. 'देव भावाचा भुकेला.' हें त्रिवार सत्य आहे. भक्तिभावानें ज्यांच्या हृदयांत ठाणें दिलें आहे, तेथें मुके बोलूं शकतील मूकं करोति वाचालं; आणि आंधळ्यांना दृष्टिलाभ होईल. देवाला काय ? विद्वान आणि अविद्वान् सारखेच आहेत.

## गुंगी केव्हां येईल ?

'अफू,' 'अफू' हा शब्द सतत शंभर वेळां तुम्हीं उच्चारलात; म्हणून तेवढ्यानें तुम्हांला अफूची गुंगी येऊं शकेल काय ? मग गुंगी केव्हां येईल ? हातांत थोडी अफू घेऊन, ती चांगली कुस्करून व पाण्यांत मिळवून आपण तें पाणी प्राशन करूं, तेव्हां आपणाला गुंगीचें सुख अनुभवायला मिळेल. एरवीं नाहीं. आपलें मन भगवंताकडे वळविल्याशिवाय व त्यालाच शरण गेल्याशिवाय ( मामेकं शरणम् व्रज ) त्याचें नांव शेकडो किंवा हजारो वेळां उच्चारल्याने तो तुमच्याकडे ढुंकूनही पहाणार नाहीं. दृढ निश्चयपूर्वक आपण त्याच्या पदकमलावर आपली दृष्टि खिळवून ठेविली पाहिजे. शांत, एकांतपणें त्याचें अहर्निश चिंतन मनन व ध्यान केलें पाहिजे, तरच त्याची कृपादृष्टि एक दिवस आपल्याकडे वळेल.

शास्त्रें व धर्मग्रंथ वाचून जो कोणी इतर लोकांकडे ब्रह्मसंबंधानें गप्पा मारतो त्याची तुलना करायची तर ती नकाशावर बनारस हें क्षेत्र दाखविणारें एखादें टिंब असतें तें पाहून मी बनारस पाहिलें असें म्हणणाऱ्या गप्पीदासाशीं करतां येईल. नकाशावर शहरें, नद्या व डोंगर, टेकड्या निरनिराळ्या खुणांनीं जागच्याजागीं दाखविण्यांत आलेल्या असतात; त्या नकाशावर पहाणें म्हणजे कांहीं तीं शहरें, त्या नद्या व त्या टेकड्या प्रत्यक्ष पहाणें नव्हें, तसेंच हें आहे. दोराची गुंडी असते. तिला कधीं कधीं गांठी बसतात. त्या गांठी सोडविल्याशिवाय दोरा उपयोगांत आणतां येत नाहीं. त्याचप्रमाणें ग्रंथांतील शब्द या केवळ गांठी होत. त्या गांठी सोडवायच्या असतात. त्या शब्दजंजाळांत सांपडून मार्ग मोकळा होत नसतो. भक्ति, सद्गुण व ध्यान धारणा यांच्या सहाय्यानें त्या गांठी सोडवावयाच्या असतात. नम्रता व भक्तिभाव तसेंच ईशकृपा यांचें सहाय्य असल्याशिवाय भाराभर ग्रंथ वाचल्याने काय फायदा होणार आहे ? त्यामुळें अहंकारांत मात्र भर पडत असते. त्यानें तें जें पुस्तकीज्ञान मिळविलें त्यामुळें झालें काय ? पूर्वीच्या अहंकारांत आणखी भर पडली ! ज्याला सत्य ज्ञान म्हणतात त्याला तो दुरावतो.

## देवाला प्रेम हवें असतें

अहंकार हा राखेच्या ढिगाऱ्यासारखा आहे. त्यावर कितीही पाणी ओता. तें त्या राखेंत

जिरून जाणार. अहंकाराचें तसेंच आहे. देवभक्तींत त्यामुळें अंतराय निर्माण होत असते. आपण पुष्कळ संस्कृत ग्रंथाचें वाचन, पठण केलें, आपण भाराभर विचार केला तरी राखेच्या ढिगावर पाणी ओतल्यासारखें व्हायचें. पवित्र धर्मग्रंथ हे ब्रह्माकडे जाण्याची वाट दाखवितात; परंतु सद्गुणांची कास धरल्याशिवाय व भक्ति आणि ध्यान धारणा यांचें सहकार्य संपादन केल्याशिवाय त्या थोर पदाला जाऊन पोहोंचतां येणार नाहीं.

आम्हांला कांहीं वस्तु खरेदी करायच्या असतात. त्यांची एक यादी तयार करून आपण दुकानावर जातों. आम्हांला काय काय विकत घ्यायचें तें घेतल्यानंतर ती यादी निरुपयोगी ठरते. देवाची शिवाची भेट कशी होते हें शास्त्रें आपणांस सांगतात. मार्गदर्शन करतात; परंतु मग आपलें कर्तव्य कोणतें ? त्या दाखवून दिलेल्या मार्गानें जावयाचें. जिनसांची यादी आपण वाचीत राहिलों म्हणून ते जिन्नस आपल्या घरीं येतील का ? एखाद्या गांवाला जायचें तर त्या गांवी जाण्याचा रस्ता माहीत असून उपयोगाचें नाहीं. तर त्या रस्त्यानें आपण प्रत्यक्ष चालू लागलें पाहिजे. तेव्हांच आपण त्या गांवाला जाऊन पोहोंचूं. केवळ रस्ता माहीत असून भागत नाहीं, त्या रस्त्यानें जाण्याचें जेव्हां आपण मनावर घेऊं व मार्गक्रमण करूं तेव्हांच त्या गांवाला आपण जाऊन पोहोंचू.

श्री चैतन्य महाराज हे एकदां दक्षिणेकडे यात्रेनिमित्त जात होते. त्यावेळीं कोणी एक पंडित गीतेवर प्रवचन करीत होता. श्रोत्यांमध्यें असा एक भक्त होता कीं, ज्याला गीतेंतील एकही श्लोकाचा अर्थ समजत नव्हता. असें असतांही त्या प्रवचनभर त्याच्या डोळयांतून अश्रू ओघळत होते.

श्री चैतन्य त्याला विचारतात 'काय रे बाबा ! तूं असा रडत कां बसला आहेस ? तुला होतें तरी काय ?'

तो भक्त म्हणाला, "मला यावेळीं अर्जुन व श्रीकृष्ण रथांत बसलेले दिसताहेत ! त्यांना पहातां पहातां माझ्या नेत्रांवाटे हा असा अश्रु प्रवाह वहात चालला आहे ! प्रवचनाचा एखादा शब्दही माझ्या कानांत शिरत नाहीं !"

तो अशिक्षित भक्त खराखुरा ज्ञानी पुरुष होता. सर्व शास्त्रांचा अर्थ व मूलभूत उद्देश एकच आहे व तो म्हणजे ईश्वरावर आत्यंतिक जिव्हाळयाची भक्ति करावयाची जिव्हाळयाचें, अंतःकरणापासुनचें प्रेम हवें आहे. तें जेथें नाहीं तेथें सारा शुकशुकाट !

---

रामायण व महाभारत हीं हिंदूंचीं दोन महाकाव्यें आहेत. त्याचप्रमाणें ग्रीक लोकांचीं इलियड व ओडीसी हीं दोन महाकाव्यें समजलीं जातात; परंतु त्यांची एकमेकांशीं तुलनाच होऊं शकत नाहीं. गंगा व सिंधू या महा नद्यांची अटीका व थेसाली या यूरोपमधील नद्यांशीं तुलना करतां येईल काय ?

**— सर मोनियर विल्यम**

---

# श्रीरामचंद्राची सर्वश्रेष्ठ भूमिका

रामायणांत जीं विविध स्वरूपाचीं पात्रें रेखाटण्यांत आलीं आहेत, त्या सर्वांत श्रीरामाचें पात्र सर्वपरीनें आदर्श व अनुकरणीय आहे. आणि त्यामुळेंच त्या कथानकाला रामाचें नांव देण्यांत आलें आहे. अनादि कालापासून साधुसंतांनीं रामनामाला वैभवशिखरावर नेऊन बसविलें आहे. आणि जे पापी होते त्यांनीं रामनामाचा आधार घेऊन व त्याच्या कुशींत शिरून आपला उद्धार करून घेतला आहे. श्रीराम सद्गुणांचा पुतळा. ज्याला महापुरुष किंवा महादेव म्हणतां येईल असा तोच. आणि सारें रामायण पालथें घातल्या नंतर हीच आपणास प्रचीति येते.

## रामजन्माचें रहस्य

विश्वामित्र ऋषीला मरीच राक्षस व त्याचे सोबती अतोनात त्रास देत होते. तो महाभाग दशरथ राजाकडे सहाय्यार्थ येतो व त्याला आपलीं दुःखें सांगतो. श्रीरामाला माझ्या मदतीला दे अशी तो विनवणी करतो. कशाचाही विचार न करतां श्रीराम विश्वामित्राबरोबर जाऊन दुष्टांना शासन करतो व विश्वामित्राच्या मार्गांतील अडचणी दूर करतो.

**सतींना संतांना जरि कधीं जगीं दुष्ट छळिती ।**
**तयांना रक्षाया अवनिवरि ये मी रघुपती ॥**

श्रीराम जन्माचें रहस्यच हें आहे. दुष्टांचें निर्दालन व सज्जनाचें संरक्षण.

जनक राजाच्या राजधानीकडे जात असतां वाटेंत अहिल्येचा उद्धार करून व तिच्या जन्माचें सार्थक करून श्रीराम मार्गस्थ झाले. सीता स्वयंवरांत अवजड धनुष्य मोठ्या कौशल्यानें उचलून त्या स्वयंवरांत श्रीराम विजयी ठरले व तेथेंही त्यांनीं आपल्या पराक्रमाची चमक दाखविली.

परशुरामाचें आव्हान शौर्यानें स्वीकारून श्रीरामानें त्याला चीत केलें. श्रीराम आपल्या गुणांनीं सर्वांना वंदनीय व सर्वांचा आवडता होऊन राहिला होता. त्यानेंच राज्याधिकारी व्हावें हीच सर्वांची इच्छा होती. त्या दिवसाकडे सर्वजण उत्कंठेनें डोळे लावून राहिले होते, परंतु त्यांच्या दैवांत तसें व्हायचें नव्हतें. राज्यत्याग करून वनवासांत जाण्याचें श्रीरामाच्या वांट्यास आलें तेव्हां हूं कीं चू न करतां ते निर्वैर अंतःकरणानें वनवासासाठीं बाहेर पडले. कैकयी या वनवासास सर्वस्वी कारण झाली. परंतु एकाही शब्दानें तिच्याबद्दल त्यांनीं द्वेष व्यक्त केला नाहीं. तिचा शब्द म्हणजे आज्ञा व ती पालन करणें हें आपलें कर्तव्य असें त्यांनीं मानिलें व त्याप्रमाणें ते वागले. जातेवेळीं त्यांना पराकाष्ठेचें दुःख झालें तें एकाच गोष्टीचें. आपल्या परमपूज्य वडीलांची अखेरच्या दिवसांत आपल्या हातून सेवा घडावी ती घडली नाहीं, हेंच तें दुःख होय.

## वाट्यास आलेलें कर्तव्य पार पाडिलें

कौसल्या व लक्ष्मण यांच्याशीं बोलतांना त्यानीं एक गोष्ट स्पष्ट केली कीं वडिलांनी दिलेला शब्द पालन करणें हेंच माझें कर्तव्य व ब्रीद आहे आणि तें पालन करण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे व ती मी पार पाडीन, इतरांनीं त्या दुःखाचा भार वाहूं नये किंवा त्यांत सहभागी होऊं नये. वनवासी जीवन म्हणजे त्रासाचें व संकटाचें. सीतेनें तें अरिष्ट स्वतःवर ओढवून घेऊं नये हीच श्रीरामाची मनापासून इच्छा; परंतु तिनें येण्याची तयारी दाखविली तेव्हां श्रीरामानें तिचें मन दुखविलें नाहीं. तिची तेवढी तयारी आहे ना, मग येईना.

कैकयीही श्रीरामाच्या दुःखाची प्रमुख व एकमेव कारागीर होती. लक्ष्मण भयंकर चिडला होता; परंतु श्रीरामानें त्याची समजूत घालून त्याला शांत केलें. लक्ष्मणानें बरोबर न येतां मागें अयोध्येंत रहावें ही रामाची इच्छा. त्यासाठीं त्यानें लक्ष्मणाची परोपरीनें समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

भरत दुःखीकष्टी झाला होता. त्याला मातेनें मिळवून दिलेलें राज्य नको होतें. त्याला पाहिजे होता राम ! जेथें राम नाहीं तें राज्य घेऊन काय करायचें आहे ? हे त्याचे अंतःकरणांतील सुविचार होते. त्याचें दुःख वरपांगी नव्हतें. लक्ष्मणाला मात्र तसें वाटलें. श्रीरामाला तसें वाटलें नाहीं. भरतभेट झाली तेव्हां त्याचें सांत्वन व समाधान करून कैकयीला एका शब्दानेंहि न दुखविण्याबद्दल श्रीराम सांगतात. त्यांच्या मनाचा केवढा हा थोरपणा !

## शबरीबद्दल आदर

श्रीराम कर्तव्यकठोर होते तसेच विनोदीहि कांहीं कमी नव्हते. शूर्पणखेला लक्ष्मणाशीं विवाहबद्ध हो असें सांगून त्यांनीं केवढातरी विनोद केला आहे ! जटायूबद्दल त्यांनीं केवढा आदरभाव प्रगट केला आहे ! शबरी; गरीब बिचारी शबरी ! तिचा त्राता कोण ? केवढा तिचा भोळा भक्तिभाव ! तिचा आदरसत्कार त्यांनीं किती प्रेमानें स्वीकारला ! इतर लोक तिची सावली घ्यायला तयार नव्हते.

सुग्रीवास दिलेलें वचन पाळण्यासाठीं श्रीराम वालीचा वध करतात परंतु त्या घटनेचें त्यांना किती दुःख होतें !

राम आणि रावण यांची पहिली भेट होते त्यावेळीं रामाच्या मनांत त्याच्याबद्दल तिरस्काराऐवजीं आदराची भावना उत्पन्न झालेली असते. लंकेचें राज्य करण्याची त्याची लायकी रामाला पटते. रामरावण युद्धाच्या प्रथम दिनीं रावण चक्कर येऊन बेभान स्थितींत पडला असतां रामाला त्याचा सहज वध करतां आला असता; परंतु रामानें त्या संधीचा फायदा घेतला नाहीं.

लक्ष्मण चक्कर येऊन पडतो त्यावेळीं रामाला झालेलें दुःख अवर्णनीय असतें. त्याच्या जीवितासाठीं तो स्वतःचें जीवित अर्पण करायला तयार होतो. असा एक प्रसंग उद्भवतो

कीं, रावणाच्या हातांतील सारीं शस्त्रास्त्रें गळून पडतात. तो निःशस्त्र बनतो. दोघांचें युद्ध चालू असतां व रावण हतबल व निःशस्त्र बनला असतां त्या असहाय्य स्थितींत राम त्याला ठार करीत नाहीं. पुढें त्याचा निरुपायच होतो. रावण युद्धांत ठार झाल्यानंतर त्याची उत्तरक्रिया रीतसर व्हावी व त्याला सद्गति मिळण्याचा मार्ग मोकळा व्हावा असा आदेश श्रीराम बिभीषणाला देतो.

## लोकानुवर्ती राजा

सीता कोणत्याही प्रकारें दोषी नाहीं. ती पवित्र व निर्मळ आहे अशी स्वतःच्या मनाची खात्री असतांही राम केवळ जनापवादासाठीं तिला अग्नि प्रवेश करायला भाग पाडतो व तिचें पावित्र्य शाबीत करून दाखवितो. युद्धांत जी वानरसेना कामीं आली, त्यांची आपल्यासाठीं जी हत्या घडून आली, तीं दुर्दैवी घटना रामाला दुःखद होऊन राहिली होती. इंद्राच्या सहकार्यानें सर्व वानरसेनेला जीवदान मिळण्याची तो व्यवस्था करवितो.

लंकेंतील एक सहस्र सुंदर स्त्रिया रामाला अर्पण करण्याची बिभीषणाला बुद्धि होते; परंतु राम ती देणगी स्वीकारण्याइतका निर्बुद्ध नव्हता. ती देणगी तो प्रेमादरपूर्वक नाकारतो. सीतेशिवाय माझी पत्नी, माझी अर्धांगीं या नात्यानें मी दुसऱ्या कोणाही स्त्रीकडे केव्हांही पाहिलें नाहीं. असें त्याप्रसंगीं तो बिभीषणाला सांगतो.

राम हा खराखुरा लोकमतानुवर्ति राजा होता. लोकांच्या कल्याणासाठीं त्याला राज्य करावयाचें होतें. एकादा धोबी असला म्हणून काय झालें ? त्याच्याही शब्दाला मान देणें हें आपलें कर्तव्य तो ओळखतो. सीतेबद्दल एक धोबी आक्षेपार्ह उद्गार काढतो. रामाला तें समजतें. त्याबरोबर तो तिला आपल्यापासून दूर करतो. श्रीरामाला त्यामुळें अनिवार दुःख झालेलें असतें; परंतु लोकाराधनेसाठीं तें दुःख तो गिळून टाकतो.

अशा रीतीनें रामायणांत श्रीरामाची भूमिका सर्व श्रेष्ठ आहे. एकेक गुण पराकोटीला पोहोंचलेला दिसून येतो. सर्वकाळीं सर्वांनी आचरणांत आणण्यासाठीं झटावे असेच ते सद्गुण आहेत.



—ज्या महाकाव्यामध्यें श्रीराम व सीता यांच्यासारख्या महनीय व्यक्तीं अंतर्भाव झालेला आहे असें महाकाव्य आजवर कोणत्याहि काळीं कोणत्याहि देश निर्माण झालेलें माझ्या माहितींत नाहीं. काव्य आणि नीतिधर्म यांची इतकी सुंदर स कोणत्याहि काव्यांत घातली गेलेली आढळून येणार नाहीं.

—प्रि. ग्रिफीथ

# श्रीराम जयंतीचें महत्व

श्रीरामचंद्राचा जन्म झाला त्या दिवशीं किती तरी आश्चर्यकारक घटना घडून आल्या. चंद्रसूर्यांचें तेज त्यादिवशीं वाढले होतें. जिकडे तिकडे कोनाकोपऱ्यांतून प्रकाश पसरला होता. माणसांच्या स्वभावांतही थारेपालट घडून आला होता. पुण्यपुरुषाचें असेंच असतें. चंपूरामायणांत या दिवसाचें मोठें बहारदार वर्णन करण्यांत आलें आहे. आणि तो पुण्यदिन, हजारो वर्षांचा काळ लोटला तरी आजही मोठ्या समारोहानें साजरा केला जात असतो. खरें पहातां तो वसंतागमनाचाहि उत्सव म्हणतां येईल. त्यादिवशीं घरोघर श्रीरामचंद्राचें स्मरण केलें जातें. वाल्मिकी रामायण हा एक पवित्र व आदर्श ग्रंथ आजहि मानला जातो. त्या कथेंतील मुख्य नायक राम व मुख्य नायिका सीता ही दोन्हीं आदर्श समजलीं जातात. तेथें नांव ठेवायला जरासुद्धां जागा नाहीं. पुरुषानें किंवा स्त्रीनें उच्चांत उच्च आदर्श ठेवायचा तर कोणाचा ? श्रीरामचंद्राचा व सीतामाईचा. श्रीरामचंद्राचें चरित्र व चारित्र्य हीं अखिल मानवजातीला अनादि कालापासून स्फूर्तिदायक व प्रेरक होऊन राहिलीं आहेत. त्यांच्या चारित्र्याचा भारतवासीयांवर कसकसा परिणाम झाला आहे याचें शब्दांनीं वर्णन करून सांगणें कठीण आहे. जीवन सुसंपन्न, सौंदर्यशाली कसें बनवावें याचा धडा रामचंद्रानें सर्वांना घालून दिला आहे.

मूळ वाल्मिकी रामायण संस्कृत भाषेंत असलें तरी निरनिराळ्या भागांत जन्माला आलेल्या पंडीतवर रामभक्तांनीं आपापल्या भाषेंत त्याला वेगवेगळें व सुंदर स्वरुप दिलें आहे. मूळ कथानकाचा धागादोरा मात्र तोच. तामिळनाडमध्यें अकराव्या शतकांत तामीळ भाषेंत कंबन यांनीं रामायण रूपांतरीत केलें. तें कंबन रामायण या नावानें सुप्रसिद्ध आहे. हिंदी तुळसीदासजीनें ‘रामचरित मानस’ रचून जगावर अगणित उपकार करून ठेविले आहेत. मराठींत श्रीधर कवीनें व इतर अनेक कवीवरानीं रामायण विविध स्वरूपांत प्रसिद्ध केलें आहे.

खरा आर्य कसा असावा; ज्याला पुण्यश्लोक म्हणावयाचा तो कसा असतो, याचें नमुनेदार प्रतीक म्हणजे श्रीरामचंद्र प्रभू.

अशा या महान् पवित्र दिवशीं प्रत्येकानें उपवास करावा व दुसऱ्या दिवशीं त्याचें पारणें फेडावें असें अगस्त्य संहितेंत सांगितलें आहे. ‘उपासनं नवम्यां वै दशम्यामेव पारणम्.’

रामायणांत जीं निरनिराळीं पात्रें आहेत, तीं निरनिराळ्या गुणावगुणांचें दर्शन घडविणारीं आहेत.

रामरहस्योपनिषदांत रामनामाची महती परोपरीनें सांगण्यांत आली आहे. राम हा एक मंत्रच आहे. हनुमान हा रामाचा व रामनामाचा एक थोर उपासक होऊन गेला राममंत्रांत केवढी तरी अदृश्य शक्ति भरलेली आहे. हनुमंतानें ती ओळखली होती. वडाचें बी किती लहान

असतें ? त्या बियापासून प्रचंड वटवृक्ष निर्माण होतो. त्याचप्रमाणे रामनामांत अगाध सामर्थ्य लपलेलें आहे. 'तत्त्वमसि' हें उपनिषदांतील वाक्य आहे. तें सारसर्वस्व आहे. 'तें तूंच आहेस.' आणि रामनामांतही त्याच तत्त्वाचा संपूर्ण आविष्कार झालेला आढळून येईल. 'मी राम आहे' याचा जो कोणी निदिध्यास घेईल तो रामस्वरूपीं विलीन होऊन जाईल. तो संसार बंधनांतून मुक्त होईल.

**सदा रामोऽहमस्मीति तत्वतः प्रवदन्ति ये ।**
**न ते संसारिणो नूनं राम एव न संशयः ॥**

(राम रहस्योपनिषद)

---

# श्रीरामस्तोत्र

(कवि : **वि. के. छत्रे**)

**१ जे अंबरीषास्तव गर्भवास, सोसावया घेति जरी रमेश ।**
**नृदेह मोदें अवनीवरी या, प्रणाम त्या सादर रामराया ॥**
**२ जे रावणालागिहि पेलवे न, तें खेळणें शंभुधनू गणून ।**
**ज्या[1] लावुनी जिंकिति भूमिकन्या, प्रणाम त्या सादर रामराया ॥**
**३ पित्यास शब्दांतुनि सोडवाया, श्री टाकुनी आतुरही वराया ।**
**जाती सुखें जे विपिनीं वसाया, प्रणाम त्या सादर रामराया ॥**
**४ सौमित्रि सीतेसह हिंडतांना, दुष्टां वधीती बहु दानवांना ।**
**अरण्य निर्विघ्न तपा कराया, प्रणाम त्या सादर रामराया ॥**
**५ एकाकि-सीता कपटें करून, रानीं यदा रावण ने हरून ।**
**वधूनि त्या आणिति जे स्वजाया[2], प्रणाम त्या सादर रामराया ॥**
**६ दे शुद्धता साक्ष जरी हुताश, वनीं सगर्भा त्यजिती स्त्रियेस ।**
**प्रजामता जे बहुमान द्याया, प्रणाम त्या सादर रामराया ॥**
**७ ऋषि[3] प्रकोपानल टाळण्याला, एकान्ति आल्या प्रिय लक्ष्मणाला ।**
**जे देति आज्ञा नृतनु त्यजाया, प्रणाम त्या सादर रामराया ॥**
**८ जे वेधिती एक शरें खलक्ष्य, जें बोललें पाळिती नित्य वाक्य ।**
**जे एक पत्नी नृपती जगीं या, प्रणाम त्या सादर रामराया ॥**
**९ स्व स्व प्रजा धर्म जयांत पाळी, वसे सुखी त्या जन सर्वकाळीं ।**
**आदर्श ज्यांच्या म्हणतात राज्या, प्रणाम त्या सादर रामराया ॥**
**१० भ्राता नि भर्ता प्रभु आणि पुत्र, नृपाल शत्रूहि तसाच मित्र ।**
**आदर्श ज्या मानिती भारती या, प्रणाम त्या सादर रामराया ॥**

---

१ दोरी; २ स्त्री; ३ दुर्वासमुनि

# चौसष्ट कलांचें शिक्षण

**विविध प्रकारच्या कला व कारागिरी यांत नैपुण्य मिळविणें या गोष्टी भारतांत प्राचीन काळापासून चालत आलेल्या आहेत. पूर्वकाळीं शिक्षणक्रमांतही त्यांचा अंतर्भाव झालेला होता. विद्यार्थ्याला चौदा विद्यांप्रमाणें चौसष्ट कलांचेंही शिक्षण देण्यांत येत असे. त्या चौसष्ट कला कोणत्या याची माहिती पुढील लेखांत आमच्या एका मित्रानें करून दिली आहे.**

पोथ्यापुराणांत, महाभारतांत त्याचप्रमाणें भागवतांत आपण नेहमींच वाचत आलों आहोंत कीं, पूर्वींच्या क्षत्रियांस व राजपुत्रांना, ब्राह्मण आणि ऋषिकुमारांना गुरुगृहीं विद्याग्रहण करून सर्व विद्यांत निपूण व चौसष्ट कलांत पारंगत व्हावें लागत असे. त्यांची फार कठीण अशी परिक्षाहि घेण्यांत येत असे. वेद व इतर शास्त्रें यांच्या अभ्यासाबरोबर या कलांचेंहि ज्ञान प्राप्त करून घेणें आवश्यक असे. अशा तऱ्हेनें विद्याभ्यास झाला नसल्यास तो शिष्य राज्यकारभार हांकण्यासाठीं किंवा आयुष्यांतील इतर जबाबदाऱ्या शिरावर घेण्यासाठीं लायक आहे असें समजण्यांत येत नसे.

भागवताच्या दशम स्कंधांत भगवान श्रीकृष्णानें बलरामसहीत कशाप्रकारें विध्याभ्यास केला; याचें सुंदर वर्णन केलें आहे. श्रीकृष्ण व बलराम हे सर्वज्ञ, सर्व विद्यांचे व सर्व सृष्टीचे ईश्वर होते. तथापि, विशिष्ट कार्यासाठीं मनुष्यरुप धारण केल्यामुळें, आपल्या ठिकाणीं असलेलें स्वतःसिद्ध निर्मल ज्ञान त्यांनीं कोणास कळूं दिलें नाहीं; आपल्या अवतार—कार्य पूर्ततेच्या दृष्टीनें व लोकांस मार्ग लावण्याच्या उद्देशानें स्वतः विद्या ग्रहण करण्यासाठीं त्यांनीं गुरुगृही वास केला. तेथें त्यांनीं इंद्रिय निग्रह करून एक निष्ठेनें गुरुसेवा केली. गुरूंच्या ठिकाणीं परमेश्वराप्रमाणें दृढ भक्ति ठेवून आपल्या आचरणानें त्यांनीं सर्व छात्र वर्गास कित्ता घालून दिला. सांदीपनि गुरूंनीं त्यांना शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंदशास्त्र व ज्योतिष ह्या सहा अंगासहित व ईश, केन, कठ, प्रश्न इत्यादि दशउपनिषदांसहित चारही वेद शिकविले. तसाच त्यांनीं मंत्र व देवता ह्यांच्या ज्ञानासह धनुर्वेद .शिकविला; मनुस्मृति वगैरे धर्मशास्त्रें पढविली. आणि मीमांसा, न्याय, तर्क इत्यादि शास्त्रांचें रहस्य सांगून षड्विध राजनीतीचेंही समग्र शिक्षण दिलें; तसेंच रामकृष्णास चौसष्ट विद्यांत पारंगत केलें.

या चौसष्ट कला खालील प्रमाणें असून त्यांची माहिती आजच्या काळांत उपयुक्त ठरणारी आहे.

१. गीतं (गायन), २. वाद्यं (वादनकला), ३. नृत्यं (नाच), ४. नाट्यं (सोंग घेणें), ५. आलेख्यं (लिहिणें, चित्रें काढणें वगैरे), ६. विशेष कच्छेद्यं (निशाण मारणें), ७. तंदुल कुसुमावलि प्रकारः (तांदूळ व फुलें ह्यांच्या तऱ्हतऱ्हेच्या

आकृती काढणें ), ८. पुष्पास्तरणं ( फुलांचें गालीचे घालणें ), ९. दशनवसनांग रागा: ( दांत निरनिराळ्या रंगांनीं सुशोभित करणें, वस्त्रांवर वेलबुट्टी काढणें व अंग गोंदणें वगैरे ), १०. मणि भूमिकाकर्म ( त्रिकोण, चतुष्कोण इ. आकृतींनीं जामेनीवर मण्यांची रचना करणें ) ११ शयन रचनं ( नानाप्रकारच्या शय्या जेथच्या तेथें ठेवणें ) १२ उदक वाद्यं ( जलतरंगासारखीं वाद्यें करणें व वाजाविणें व. ) १३ चित्रयोगः ( मातीचीं चित्रें तयार करणें ), १४ माल्याग्रथन विकल्पाः ( फुलांचे हार, तुरे, गजरे इ. तयार करणें ), १५ शेखरापीडयोजनं ( मुकुट व. शोभिवंत करणें ), १६ नेपथ्ययोगाः ( पडद्याचे आंत सोंग देणें ), १७ कर्णपत्रभंगाः ( कानांवर कोंवळ्या कोंवळ्या पाकळ्या ठेवणें ), १८ सुगंधयुक्तिः ( सुवासिक पदार्थ तयार करणें ), १९ भूषण योजन ( सुवर्णादिकांचे दागिने करणें ), २०. ऐंद्रजालं ( जादुगिरी ), २१. कौतुमारयोगः ( अंगास उट्या व. लावणें ), (२२) हस्तला घवं ( हात चलाखी ), २३. चित्रशाका पूपभक्ष्य विकारक्रियाः ( नाना तऱ्हेच्या भाज्या व पक्वान्नें व. करणें ), २४. पानकरस रागासवयोजनं ( नाना तऱ्हेचीं पन्हीं करणें, तरतऱ्हेच्या रसांचीं पुटें देणें, पदार्थांवर निरनिराळे रंग देणें व मद्य तयार करणें ), २५. सुचिवाय कर्म ( शिवणें ), २६. सूत्रक्रीडा ( बाहुल्या नाचविणें, भोंवरे फिरविणें व. ), २७. वीणा डमरुकवाद्यानि ( वीणा व. वाद्यें वाजविणें ), २८. प्रहेलिका ( उखाणें जिंकणें ), २९. प्रतिमाला ( नाना प्रकारच्या मूर्ती, भांडीं व सांचे करणें ) ३०. दुर्वचक योगः ( कपट विद्या ), ३१. वाचनं ( पुस्तक वाचणें ), ३२. नाटककारव्यायिक दर्शनं ( नाटकें, प्रहसनें करून दाखविणें ), ३३. काव्य समस्यापुरणं ( दुसऱ्यांनीं दिलेला अपूर्ण श्लोक पुरा करणें ), ३४ पट्टिकावेत्रबाणविकल्पः ( पट्टा खेळणें, वेताच्या छड्या परतणें व बाण सोडणें ) ३५. तर्ककर्माणि ( तर्क चालविणें ), ३६. तक्षणं ( सुतारपणा ), ३७. वास्तुविद्या ( घर बांधणें ), ३८. रौप्यरत्नें परीक्षा ( रुपें व रत्नें यांची परीक्षा करणें ), ३९. धातुवादः अशोधित धातु शुद्ध करणें ) ४०. मणिरागज्ञान ( रत्नांना रंग देणें ), ४१. आकारज्ञानं ( खाणी कशा व कोठें सांपडतील तें सांगणें ), ४२. वृक्षायुर्योग वेद ( वृक्षाचें आयुष्य वाढविण्याचा योग ), ४३. मेष कुकुटलावक विधिः ( बकरे, कुकुट कुंभे व लावी पक्षी यांच्या झोंब्या लावणें ), ४४. शुकसारिका प्रलापनं ( शुक, मैना इत्यादिकांना बोलण्यास शिकविणें ), ४५. उत्सादनं ( पतंग उडविणें ), ४६. केशमार्जन कौशलं ( वेणी घालणें ), ४७. अक्षर मुष्टिकाकथनं ( मनांतील अक्षरें व मुठीमध्यें कोणता पदार्थ आहे हें सांगणें ), ४८. म्लेछित कुतर्क विकल्पः ( कर व नेत्र पल्लवी व. भाषांची योजना करणें ), ४९. देश भाषा ज्ञानं ( देशभाषा जाणणें ), ५०. पुष्पशकतटिका निर्मिति ज्ञानं ( बागबगीचे व. करणें ), ५१. यंत्रमातृका धारण मातृका ( रहाट, ओझीं उचलून नेण्याकरितां केलेलीं यंत्रें व. ), संवाच्यं ( वक्तृत्व ), ५३. मायसी काव्य क्रिया ( न बोलतां मनांतल्या मनांत काव्य रचणें ), ५४. अभिधान कोशः ( अनेक कोशांचें ज्ञान ), ५५. छंदोज्ञानं ( छंद शास्त्राची माहिती ), ५६.

क्रिया विकल्पः ( चमत्कार करून दाखविणें ), ५७. छलित योगः ( खुषमस्करीपणा ), ५८. वस्त्रगोपनानि ( वस्त्रें नेहमीं ताजी स्वच्छ राहतील अशा युक्तीनें ठेवणें ), ५९. द्यूत विशेषः ( जुगार ), ६०. आकर्ष क्रीडा ( मल्लयुद्ध ), ६१. बाल क्रीडनकादि ( लहान मुलांचीं खेळणीं ), ६२. वैनायिकी विद्यादानं ( विघ्नें नाहींशीं करण्याची विद्या ), ६३. वैजयिकी विद्यादानं ( विजय संपादन करण्याची युक्ति ), आणि ६४. वैतालिकी विद्यादानं ( भूत पिशाचादिकांचें ज्ञान ).

ही माहिती शैवतंत्राप्रमाणें आहे. यावरून त्या काळीं आपलें ज्ञान, विद्या, शास्त्रें, तंत्र, मंत्र, विज्ञान व कला ह्या सर्वांनीं कसा उच्चांक गांठला होता व तीं कशीं कळसास पोंचलीं होतीं हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

आज कलाकौशल्याकडे व त्यांत नैपुण्य मिळविण्याकडे आमचें लक्ष थोडथोडें वळूं लागलें आहे; परंतु पूर्वीच्या काळीं विविध कला व कारागिरी यांत नैपुण्य मिळविल्याशिवाय शिक्षणाला पूर्णता येत नसे; हेंहि यावरून दिसून येणार आहे. कलाकौशल्य कारागिरी व यांत्रिक आणि तांत्रिक शिक्षण या गोष्टी भारतीयांस नवीन नाहींत. प्राचीन काळापासून त्यांचे आम्हीं वारसदार आहोंत. मध्यंतरीं दीर्घकाळपर्यंत परकीयांच्या आक्रमणाखालीं काळ कंठण्याचें दुर्भाग्य वाट्याला आल्यामुळें आम्हीं आमच्या कलाकारागिरीस पारखे होऊन राहिलों होतों. सुदैवानें त्यांच्या पुनरुत्थानाचा काळ आतां आलेला आहे.

---


MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

Chemical Cleaners, Super Fine Darners

Master Dyers

*FOR*

Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

माटुंगा क्लीनिंग वर्क्स

स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ (मालक : एस्. व्ही. प्रधान

# श्री साई स्तोत्र

( रचयिता; साईसेवक : द. रा. आंबर्डेकर )

श्रीसद्गुरु साईनाथायनमः। अनंत कोटि ब्रह्मांड नायका। साइसद्गुरु भवभयहारका। अनादिसिद्धां भक्तजन तारका। तुमच्या पदीं नमन माझें ॥ १ ॥ तुम्हीं पूर्ण दया सागर। मी पातकी दीन पामर। तुमच्यावरी माझा भरिभार। ठेवोनी आतां राहिलों ॥ २ ॥ शिरडीवांसी बाबासाई। माय माउले माझे आई। धावोनि यावें लवलाही। कृपासागरा विश्वंभरा ॥ ३ ॥ बाबा तुम्हीच गजानन। करावें विघ्नांचें हनन। आपुली पदसेवा निर्विघ्न। माझेकडून करवावी ॥ ४ ॥ तुमची वाणी सरस्वती। हीच भावना माझे चित्तीं। तुम्हीच माझी लक्ष्मी संपत्ती। तुम्हीच माझे सर्वस्व ॥ ५ ॥ तुम्हीच माझे श्रीहरिहर। भक्तजनांचे पूर्णाधार। आपुल्या कृपेचा करपंजर। माझेवरी असावा ॥ ६ ॥ पुण्य नाहीं माझे पदरीं। दीन होवोनि आपुल्या दारीं। मागतों तव कृपेची माधुकरी। माझे पदरीं घालावी ॥ ७ ॥ जन्मो जन्मींचें संचित। प्राप्त झालें अकस्मात। म्हणोनि माझें लागलें चित्त। पदकमलीं आपुल्या ॥ ८ ॥ शीलधी ग्रामीं आपुला वास। सुखी कराया जडजीवांस। भवसंकटें वारण्यास। अवतार आपण घेतला ॥ ९ ॥ शीलधी म्हणिजे शीलाचा सांठा। ज्याचेकडे असेल मोठा। त्याला नाहीं कदा तोटा। आपुल्या उपदेशाचा ॥ १० ॥ आपण शीलधी सोडित नाहीं। दुःख दैन्य तेथें नाहीं। आपुली कृपा लवलाहीं। तेथेंचि होतें ॥ ११ ॥ म्हणून शीलधी मजला करावा। हा आशिर्वाद मला द्यावा। आपुल्यावरी ठेवोनि भावा। अनन्य शरण आलों मी ॥ १२ ॥ मी कोण आलों कुठून। याचें नाहीं मजला ज्ञान। तुमच्यावरी विश्वासून। लीन तव पदीं मी झालों ॥ १३ ॥ हे सर्वज्ञा साईनाथा। तुम्हीच माझे मातापिता। या माझ्या अस्थिर चित्ता। आपण स्थिर करावें ॥ १४ ॥ तुमची पूजा कैसी करूं। तुमचे पाय कैसे धरूं। तुमचें गुणगान कैसें करूं। हें तुम्हीच शिकवावें ॥ १५ ॥ बाबा हें तुमचेंच बाळ। जैसी यासी सुचवाल। तैसी तुमची सेवा करील। निश्चय असे हा माझा ॥ १६ ॥ आतां अवधि लावूं नका। पूर्ण करा माझा हेका। तप्त जीवा माझ्या झांका। कृपा साउलीनें आपुल्या ॥ १७ ॥ आर्त हांका मारून। आपणांस करितों

आवाहन। आपण येथें येऊन। कृपाशिर्वाद मज द्यावा ॥ १८ ॥ माझ्या हृदयाचें स्थिरासन। केलें आपणासाठीं आसन। आपण येथें येऊन। कृपा करून बैसावें ॥ १९ ॥ पाणी माझ्या प्रेमाश्रूंचें। चरणांवरी आपुल्या साचें। पादयोःपाद्यं म्हणून वाचें। चरण आपुलें प्रक्षालितों ॥ २० ॥ आचार, विचार, उच्चार। हे करोनि एकत्र। अर्ध्याचा हा प्रकार। स्वीकारावा साईनाथा ॥ २१ ॥ माझ्या बुद्धीचें आचमन। आपण टाकावें करून। मग बुद्धी शुद्ध होऊन। राहील मजकडे सदैव ॥ २२ ॥ माझ्या श्रद्धेचें उदक घ्यावें। आपण आतां स्नान करावें। मजला नच तिष्ठवावें। साईनाथा दयाळा ॥ २३ ॥ विश्वासाचें वस्त्र कल्पितों। आणि आपणां अर्पितों। मद् भक्तीचें चंदन लावितों। पदांगुष्ठीं आपुल्या ॥ २४ ॥ स्तुति शब्दांचीं सुमनें करून। आपुल्या चरणीं वाहून। धन्य करावें माझें जीवन। हीच आशा बाळगतों ॥ २५ ॥ निष्ठेचा मी धूप करितों। त्यागाग्नीवरी टाकितों। तो सुवास आपणां अर्पितों। साईनाथा सर्वज्ञा ॥ २६ ॥ वासनांची वात वळितों। देहाच्या पणतींत ठेवितों। भक्तीच्या स्नेहानें भरितों। पेटवितों निश्चयानें ॥ २७ ॥ हा आपणां दावितों दीप। याच्या प्रकाशें पाप ताप। विलया जावो संताप। हीच इच्छा बाळगितों ॥ २८ ॥ नैवेद्य दावितों भक्तिरसाचा। येथें माझी खुंटली वाचा। देहांतील द्विभावनेचा। भेद येथें मावळला ॥ २९ ॥ ज्ञानेंद्रियें कर्मेंद्रियें मेळविलीं। आणि देहांची उभारणी झाली। मन बुद्धि अहंकार एक केलीं। झाले त्रयोदश गुण ॥ ३० ॥ हा त्रयोदश गुणी विडा करून। बाबा आपणां केला अर्पण। याचा स्वीकार आपण करून। धन्य मजला करावें ॥ ३१ ॥ कर्तृत्वशक्तीची दक्षिणा। मी अर्पितों आपणां। ग्रहण करोनि या क्षणा। पुनीत मजला करावें ॥ ३२ ॥ द्वय नेत्रांचीं नीरांजनें। एकत्र करोनि स्थिर मनें। साईनाथा आनंदानें। आरती तुम्हां ओवाळितों ॥ ३३ ॥ आशा इच्छेचें श्रीफळ। तुम्हां अर्पितें तुमचें चि बाळ। श्रीफळ स्वीकारोनि प्रतिपाळ। बालकाचा करावा ॥ ३४ ॥ दृष्टी अंतर्मुख करितों। बाबा तुम्हां नमस्कार करितों। तुमच्या पदीं माथा ठेवितों। आशिर्वाद असावा ॥ ३५ ॥ स्थिर चराला व्यापून। आपण राहिलां उरून। प्रदक्षिणेची भावना धरून। कैसा निभाव लागेल ॥ ३६ ॥ माझे हृदयीं तुम्ही असतां। मीच माझे भोंतीं फिरतां। प्रदक्षिणेचें फल तत्वतां। माझ्या पदरीं पडेल ॥ ३८ ॥ तुमची वेडी वांकुडी स्तुती। हींच मंत्र पुष्पें शोभतीं। अर्पितों आपुल्या पदांवरतीं। दासा

अभय असावें ॥ ३८ ॥ आतां करितों प्रार्थना। कर्तेपणाचा अहंपणा। जावा हीच प्रार्थना। आपणांकडे माझी असे ॥ ३९ ॥ निष्ठा माझी वाढ-वावी। आपुली कृपा असावी। कृपा दृष्टी लाभावी। आपुली मजवरी निरंतर ॥ ४० ॥ हा नव्हे माझा संसार पसारा। आपुल्या इच्छेचा हा सारा। प्रभाव असे कृपा सागरा। साईनाथा दयानिधे ॥ ४१ ॥ हा तुम-चाची संसार। याचें ओझें तुमच्यावर। मी दीन पातकी पामर। तुमचे वरी विसंबलों ॥ ४२ ॥ तुमचा विसर पडूं न द्यावा। माझा विश्वास तुम्ही राखावा। तुमचा नाम जप तुम्हीं करवावा। माझ्या परा वाचेनें ॥ ४३ ॥ माझ्या हाकेला ओ द्यावी। आपुली सगुणमूर्ती दावावी। माझी चिंता निववावी। कृपा दर्शनें आपुल्या ॥ ४४ ॥ आधिव्याधींना फाटा द्यावा। अन्नवस्त्राला तोटा नसावा। आपुला हस्त शिरीं असावा। हीच प्रार्थना माझी असे ॥ ४५ ॥ काय मागावें आणि न मागावें। हें नाहीं मजला ठावें। मी केवळ भक्तिभावें। वेडें वांकुडें बोललों ॥ ४६ ॥ जें जें कांहीं माझें चुकलें। तें तुम्हीच पाहिजे निस्तारिलें। कारण तुमचे वरी ठेविलें। साईनाथा माझें मन ॥ ४७ ॥ बालकानें हट्ट धरावा। आईनें तो पुरवावा। हा मार्ग असे मला ठावा। साईनाथा माउले ॥ ४८ ॥ तुमचे चरण घट्ट धरावें। त्यांवरी मस्तक नमवावें। आणि अश्रूंनीं भिजवावें। साई समर्था दयाळा ॥ ४९ ॥ साई समर्थ जप करून। हें स्तोत्र करावें पठण। तेणें विघ्नें दूर होऊन। सर्वदा सुख मिळेल ॥ ५० ॥ अंतःकरण निर्मल होईल। श्रीसाई साक्षात्कार घडेल। साई समर्थ पाठकां रक्षील। हें वचन सत्य माना ॥ ५१ ॥

॥ श्रीसद्‌गुरु साईनाथ चरणार्पणमस्तु ॥

---

मी सर्वापेक्षां श्रेष्ठ व बुद्धिमान् आहे असें समजणें हें हीनपणाचें लक्षण आहे. गरजवंताला मदत करणें, परोपकार करणें व दुसऱ्यांचे गुणानुवाद गाणें ही खरोखर अभिनंदनीय गोष्ट आहे. परंतु त्याबद्दल कोणत्याहि स्वरुपांत मोबदल्याची अपेक्षा करणें हें हलकेपणाचें लक्षण आहे. तो परोपकार किंवा ती मदत ईश्वर–चरणीं केव्हांहि रुजू होत नाहीं. आपल्यावर इतरांनीं केलेले उपकार जन्मभर आठवावे. परंतु आपण दुसऱ्यावर केलेले उपकार ताबडतोब विसरून जावे. ते ईश्वरार्पण म्हणून मोकळे व्हावें.

---

## —: श्री सद्गुरु साईबाबाचीं वचनें :—

॥ शिरडीस ज्याचे लागतील पाय ॥
टळती अपाय सर्व त्याचे ॥

॥ माझ्या समाधीची पायरी चढेल ॥
दुःख हें हरेल सर्व त्याचें ॥

॥ जरी हें शरीर गेलों मी टाकून ॥
तरी मी धांवेन भक्तांसाठीं ॥

॥ नवसास माझी पावेल समाधी ॥
धरा दृढ बुद्धी माझ्या ठायीं ॥

॥ नित्य मी जिवंत, जाणा हेंचि सत्य ॥
नित्य घ्या प्रचित अनुभवें ॥

॥ शरण मज आला, आणि वाया गेला ॥
दाखवा दाखला ऐसा कोणी ॥

॥ जो जो, मज भजे, जैशा जैशा भावें; ॥
तैसा तैसा, पावे मीही त्यासी ॥

॥ तुमचा मी भार वाहीन सर्वथा ॥
नव्हे हें अन्यथा वचन माझें ॥

॥ जाणा येथें आहे साहाय्य सर्वांस ॥
मागे जें जें त्यास तें तें लाभें ॥

॥ माझा जो जाहला कायावाचा मनीं ॥
तयाचा मी ऋणी सर्वकाळ ॥

॥ साई म्हणे तोचि तोची झाला धन्य; ॥
झाला जो अनन्य माझ्या पायीं ॥

गलिच्छ मनाचीं प्रमुख पांच लक्षणें आहेत. त्याला रामचंद्राचे गुणानुवाद गाणें आवडत नाहीं. त्याला रामांची व रामभक्ताची निर्भत्सना करावी अशी बुद्धि होईल. तो मायाजालांत नेहमीं गुरफटलेला राहील; त्याला श्रीरामाचें स्मरण केव्हांही होणार नाहीं; तसेंच त्याला संसारांतील व सुखोपभोगासंबंधीं वार्तालाप करणें नेहमीं आवडेल.

लघु कथा—

# मोची आणि माणुसकी

कोणी एक गरीब व सत्वशील ब्राह्मण होता. रहात असे एका राजधानीच्या नगरींत; त्या नगरींत धनिक, जमीनदार, इनामदार किती तरी रहात असत; जो तो आपल्या सुखोपभोगांत दंग. एके दिवशीं त्या ब्राह्मणाला भिक्षांदेहीसाठीं बाहेर पडावें लागलें. दुपारची वेळ होती. तो अनेक घरें फिरला, त्यानें अनेकांचीं दारें ठोठावलीं; परंतु एकाकडूनही त्याला प्रतिसाद मिळाला नाहीं! कोणी त्याला कांहीं दिलें नाहीं. निराश झाला आणि नगरीच्या बाहेर एका रस्त्याच्या टोकाला एकांतांत विचार करीत बसला. मी किती दुर्दैवी! इतकीं घरें हिंडलों, परंतु एकालाहि माझी दया आली नाहीं. पोटांत कावळे काव काव करूं लागले होते. डोळ्यांवाटे अश्रुप्रवाह चालू होता.

इतक्यांत त्या वाटेनें रामनाम जपत कोणी एक सत्पुरुष जात होता. तो आपल्याच गुंगींत होता. त्याच्या कानीं कोणाचें तरी हुंदके पडले. दयाशील अंतःकरण! तो सत्पुरुष जागच्या जागीं थांबला. इकडे तिकडे पाहूं लागला. झाडाच्या बुंध्याशीं कोणी एक गृहस्थ बसलेला त्यानें पाहिला. 'मला काय त्याचें?' असें म्हणून पुढें न जातां तो सत्पुरुष त्या दुःखी ब्राह्मणापाशीं गेला व म्हणाला, "काय रे बाबा! असा दुःखी कष्टी होऊन येथें कां पडून राहिला आहेस? काय होतंय तुला?"

"मला कांहीं नाहीं होत! मी एक दुर्दैवी प्राणी आहें! भुकेनें व्याकूळ झालोय. या नगरीत अनेकांच्या घरी गेलो अनेक माणसें भेटलीं. त्यांच्यापुढें हात पसरला; परंतु एकानेही माझ्याकडे ढुकून पाहिलें नाहीं. त्यांचा काय दोष! मीच दुर्दैवी! स्वतःच्या दुर्दैवाचा विचार करीत पडलों आहे इथें!" ब्राह्मण म्हणाला.

"वेडा आहेस तूं! तूं ज्याच्यापुढें हात पसरलेस तीं माणसें नव्हतीं! माणसांपुढें हात पसरले असतेस तर त्यांनीं तुला विन्मुख मुळींच दवडलें नसतें!"

ब्राह्मण त्या दुःखी अवस्थेंतही आश्चर्यचकित झाला. म्हणाला, 'काय बोलतां हें? मी का आंधळा आहे? का माझी दृष्टि तारवटलेली आहे! अहो! शपथपूर्वक सांगतों कीं मी हात पसरले ते नाक, कान, डोळे, दोन हात व दोन पाय असलेल्या माणसांपुढेंच. खात्रीपूर्वक सांगतों.'

'नाहीं रे नाहीं! कुठें तरी चुकतें आहे तुझें. तुला माहित नाहीं कीं, माणसांसारखीं माणसें दिसतात, पण तीं माणसें नसतात, जनावरें असतात. माणसांमाणसांतही पुष्कळ भेद आहे! लक्षांत ठेव कीं आपल्या एखाद्या बंधूचें दुःख पाहून ज्याच्या हृदयाला पीळ पडत नाहीं व ज्याचें हृदय कळवळत नाहीं: तो माणूस कसला? त्याला निर्बुद्ध जनावर

समजलें म्हणून काय बिघडलें? हें बघ, माझ्याजवळ माणूस ओळखण्याचा एक चष्मा आहे. तसा चष्मा बाजारांत तुला कुठेंही मिळूं शकणार नाहीं. लहानाचें मोठें व मोठ्याचें लहान किंवा स्पष्ट दिसणारे चष्मे चष्मेवाल्यांच्या दुकानांत मिळतात; परंतु खरा माणूस कोण याची ओळख पटविणारा चष्मा मात्र तुला कुठेंही गेलास तरी मिळणार नाहीं. मी तो पूर्व पुण्याईमुळें पैदा केला आहे. हा घे. हीच तुला माझी देणगी. हा लावून पहा. पुन्हां या नगरींत एक हेलपाटा मार; आणि मग हीं जीं सभोंवार वावरताहेत, फिरताहेत तीं माणसें आहेत कीं दुसरीं कोणी आहेत तें तुला अचूक समजून येईल! एवढेंच नव्हे तर या नगरींत जास्त नाहीं तरी शेवटीं एखादा तरी '**माणूस**' तुला आढळून येईल आणि तुझें काम होईल! जा; असा निराश होऊं नकोस!"

ब्राह्मणाला नव्या दृष्टीचा लाभ करून बहाल करून चष्मा देऊन तो सत्पुरुष आपल्या वाटेला लागला.

ब्राम्हण स्वतःशींच म्हणाला, 'काय हें? ही मोठी आफत झाली! चष्मा लावल्याशिवाय माणसाची ओळख पटूं नये हें काय? पाहूं या तरी हा नवा प्रयोग करून! बिचाऱ्यानें भेटी दाखल मला चष्मा दिली. आतां त्याचा उपयोग करून पाहिलाच पाहिजे.

ब्राम्हणानें तो दिव्य चष्मा चांगला पुसून सवरून डोळ्यांवर चढविला, आणि मार्ग क्रमण करूं लागला. भुकेनें व्याकूळ झाला असला तरी चष्मा लावल्यामुळें त्याची छाती उंच झालेली होती. तो चौफेर नजर टाकीत चालला होता. त्या चष्म्यानें त्याला काय दाखविलें? प्रथम त्याला कांहीं माकडें दिसली, नंतर एक केसाळ अस्वल दिसलें! कुत्रीं, मांजरें किती तरी त्या रस्त्यानें फिरत होतीं! त्यांच्याजवळ काय मागावयाचें? तीं काय देणार? जो जों पुढें जावें तों तों सारे जनावरांचे तांडे! रेडे म्हैशी, बैलोबा! किती म्हणून सांगावे? ब्राह्मण चपापला. आपण कोणत्या जगांत वावरत आहोंत हेंच त्याला समजेना. यांत माणूस कुठें आहे? पाहूं या तरी! असें म्हणत म्हणत रस्त्याच्या अगदीं टोकला तो ब्राह्मण जाऊन पोहोंचला. एक मोठा वृक्ष होता आणि त्याच्या बुंध्याशीं एक माणूस बसला होता! किती आनंद झालाय माणसाला पाहून त्या ब्राह्मणाला! तो धांवत धांवत त्याच्याजवळ गेला आणि त्याच्या पुढ्यांत थक्कन् बसला!

झाडाच्या बुंध्याशीं बसलेला तो त्या नगरींतील एक मोची होता. कोणाचीं पादत्राणें तुटलीं तर तीं दुरुस्त करून द्यायचीं आणि चार पैसे मिळवायचे, हाच त्याचा रोजचा व्यवसाय होता. शिवाय घरबसल्या एखादें चप्पल तयार करून ते बाजारांत विकावयाचे!

आपल्या पुढ्यांत बसलेल्या भुकेलेल्या ब्राम्हणाच्यानें भुकेपायीं बोलवतहि नव्हतें. हें त्यानें तात्काळ ओळखलें. तो मोची म्हणाला, 'बाबा! तुम्हीं भारी भुकेलेले दिसतां!

मी तुम्हांला घरीं घेऊन गेलों असतों; परंतु मी पडलों मोची! तुम्ही माझ्या घरीं कसे याल? पण कांहीं हरकत नाहीं; चला माझ्याबरोबर.'

मोची त्या ब्राम्हणास घेऊन जवळपासच्या एका मिठाईवाल्याच्या दुकानीं गेला. आपल्या कुडत्याच्या खिशांतील चिमुकली थैली काढून ती त्यानें हळूच मिठाईवाल्यापुढें रिकामी केली व त्याला म्हणाला, 'हे बघा! अवघे पंचवीस नये पैसे आहेत माझ्याजवळ! याची येईल तेवढी मिठाई द्या यांना आणि पदरचें पाणीहि प्यायला द्या! मी जरा जाऊन येतों माझ्या घरीं!'

असें बोलून तो मोची आपल्या घरीं जाण्यासाठीं धांवत निघाला. ब्राह्मणाबद्दल त्याला अतिशय कळवळा आला होता. घरीं पायतणाचा एक जोड तयार करून ठेविला होता. तो विकून त्याचे येतील तेवढे पैसे ब्राह्मणाला दान द्यावयाचे असा त्याचा विचार होता. तो बेचैन झाला होता. भुकेनें तळमळणाऱ्या त्या जिवाची त्याला दया आलेली होती. तेथें जिवाशिवाचीं गांठ पडलेली होती. दयाळू अंतःकरणामुळें त्याच्या नेत्रांवाटे माणुसकीचीं मोत्यें ढळढळां वाहूं लागलीं होतीं!

**'तुका म्हणे सांगूं किती। तोचि भगवंताची मूर्ति॥'**

तो ब्राह्मण नाहीं तर भुकेनें तळतळणारा तो आपलाच जीव आहे असें मोच्याला वाटूं लागलें होतें. त्याला आपण मनासारखें कांहीं देऊं शकलों नाहीं, याची त्याला चुटपूट लागून राहिली होती. तो त्या हलवायाच्या दुकानावरून लगबगीनें निघाला आणि त्यानें आपलें घर एकदाचें गांठलें तें धापा टाकीत!

एका पेटींत ठेवलेला पादत्राणांचा जोड बाहेर काढून तो त्यानें वस्त्रांत बांधून घेतला व बाजारांत एकदांचा दाखल झाला.

तो संध्याकाळचा समय होता. त्या नगरांतील राजाचा एक नेहमींचा परिपाठ असा होता कीं, सायंकाळीं बाहेर फिरायला जातांना पायांत रोज नवा जोडा घालून बाहेर पडावयाचें. आजचा जोडा उद्यां नाहीं; रोज सायंकाळीं बाहेर पडण्यापूर्वी त्याच्या मंत्र्यानें नवा जोड खरेदी करायचा व तो राजापुढें आणून ठेवायचा.

त्याप्रमाणें मंत्री महाशय बाजारांत गेले व त्यांनीं ४।५ जोड्यांचे जोड राजेसाहेबांपुढें हजर केले. राजानें एकेक जोड पायांत घालून पाहिला, परंतु त्यांपैकीं एकही चडपणीं पायांत जाईना व राजाचें समाधान होईना.

राजा मंत्र्याला म्हणाला, 'आज मी आणाल तो जोडा पायांत घालून बाहेर पडणार नाहीं. मला पायांत ठीक बसणारा व कलाकुसरीसंपन्न असाच जोडा हवा आहे. त्याला पांचशें रुपये पडले तरी हरकत नाहीं; परंतु जोडा मनपसंत पाहिजे. आणि प्रयत्न करूनही तसा जोडा मिळाला नाहीं तर त्याबद्दल तुम्हांला शासन केल्याशिवाय मी रहाणार नाहीं!"

मंत्री विचारांत पडला. आज राजाला कोणत्या भुतानें पछाडलें आहे हें कोडें त्याला उलगडेना. मनाच्या त्या संशयी वृत्तीनें तो पुनश्च बाजारांत गेला. एका वृक्षाच्या

छायेंत एक मोची जोड्याचा एकच जोड घेऊन बसलेला त्याला आढळला. तो जोडा खरोखरच नामी होता. त्याची घडण डोळ्यांचें पारणें फेडणारी होती. मंत्र्याचें त्या जोड्यावर एकदम मन बसलें. राजेसाहेबांस हा जोडा आवडलाच पाहिजे असें त्याला वाटूं लागलें.

मंत्र्यानें पहातांच त्या जोड्यावर एकदम झडप घातली. किंमत विचारण्याच्या भानगडींतही तो पडला नाहीं.

"चल ये माझ्याबरोबर! आज तुझें भाग्य उदयाला आलें आहे खास. माझ्याबरोबर ये आणि आमच्या राजेसाहेबांना जी काय या जोड्याची किंमत असेल ती सांग!"

मंत्री व मोची दोघेही राजेसाहेबापुढें हजर झाले. राजानें पायांत जोडा घालून पाहिला व त्या जोड्याकडे टक लावून पहात राहिला. त्याची नजर त्याच्यावरून हालेना. पुण्य पुरुषाच्या हातांनीं बनलेला तो नयनरम्य जोडा होता. पायांत घालण्याचा जोडा इतका सुंदर असतो याची त्याच्यानें कल्पना करवेना. त्यानें एकवार मोच्याकडे पाहिलें व म्हणाला, "तूं खरा जातीवंत कारागीर आहेस! तुझ्या कलाकृतीवर मी खूष झालोंय्. काय त्याचें मोल सांग पाहूं एकवार!'

मोची कांहीं बोलला नाहीं. राजानें आग्रह केल्यावरून तो म्हणाला, 'महाराज आपल्या मर्जीला येईल तें कांहींबी द्या! आपण खूष झालां माझ्या कारागिरिवर हेंच माझें बाक्षिस!'

राजानें मंत्र्याला हुकूम सोडला कीं, मोच्याला जोड्याच्या किंमतीदाखल पांचशें रुपये व सुंदर काम केल्याबद्दल उत्तेजनादाखल आणखी पांचशें रुपये मिळून एक हजार रुपये ताबडतोब देण्यांत यावे.

यावर मोची म्हणाला, 'महाराज! थांबा जरा. ते पैसे मी घेऊं शकत नाहीं. ते ज्याचे त्याला द्यावे. ते ज्याला द्यायचे त्याला मी आतांच जाऊन घेऊन येतों.'

राजा आश्चर्यचकित झाला व म्हणाला, 'म्हणजे? हा तुझ्या हातचा जोडा ना रे?' तुझीच ना ही बनावट? मग पैशाचा धनी तूंच नाहीं का?'

'महाराज! बनावट माझी असली व पैशांचा धनी मी असलों तरी हा जोडा विकून जें कांहीं द्रव्य येईल तें एका गरीब ब्राह्मणाला देण्याचा संकल्प मी यापूर्वीच सोडून चुकलों आहे. तेव्हां त्या द्रव्यावर मालकी आतां त्या ब्राह्मणाची.'

असें सांगून मोची तेथून निघाला तो हलवायाच्या दुकानीं आला. ब्राह्मण विचार करीत तेथेंच बसून होता. मोच्यानें त्याला आपल्याबरोबर राजाकडे नेलें.

त्या ब्राह्मणाची व कोणत्या स्थितींत त्याची व आपली भेट झाली याची मोच्यानें राजाला जाणीव करून दिली. कांहींएक न बोलतां मोच्यानें केलेल्या विनंतीप्रमाणें राजाच्या मंत्र्यानें एक हजार रुपये ब्राह्मणाच्या पदरांत घातले. राजाच्या मनांत या एकंदर घटनेबद्दल मोठें कुतूहल निर्माण झालें होतें. तो ब्राह्मणास म्हणाला, 'भल्या गृहस्था! तूं खरोखर भाग्यवान् आहेस! मोच्यानें प्रगट केलेल्या माणुसकीमुळें व सत्य-

निष्ठेमुळें तुझें भाग्य उदयास आलें; परंतु मला सांग कीं, धनिकांनीं गजबजलेल्या या नगरींत तुझ्या पोटापुरतें देणारा दाता या मोच्याशिवाय तुला दुसरा कोणी मिळाला नाहीं याचें मला राहून राहून आश्चर्य वाटत आहे. खरंच का रे एकालाहि तुझी दया आली नाहीं ?'

राजाचें कुतूहल जागृत झालेलें पाहून ब्राह्मण म्हणाला, 'या नगरींत माणुसकीला वाव नाहीं. सारे आपल्याच छंदांत व सुखोपयोगांत दंग ! दुसऱ्याबद्दल त्यांना काडीचीहि पर्वा नाहीं ! मोचीच तेवढा माणुसकीचा अवतार मला आढळून आला. मोची तेवढा माणूस आणि बाकी सारीं जनावरें असा मी शोध लाविला आहे !'

'हा विचित्र शोध आहे म्हणायचा तुझा ! कशाच्या बळावर हा शोध लावलास तूं ?'

'होय; त्याला कारण आहे तसेंच साधनहि माझ्याजवळ आहे. महाराज ! मी कशाला बोलूं ? माझ्याजवळ हा दिव्य चष्मा आहे तोच बोलेल आपल्याशी !'

'पाहूं पाहूं तो चष्मा !'

'हा घ्या आणि चष्मा लावून पारख करण्याचा पहिला मान आपला !'

राजानें चष्मा डोळ्यांवर चढविला आणि प्रथम जवळच असलेल्या आपल्या मंत्र्याकडे त्यानें दृष्टि वळविली व एकदम ओरडला 'अरे ! हा तर कोल्हा दिसतोय मला !'

आणि नंतर त्यानें आळीपाळीनें सर्वांकडे पाहिलें. त्यांत माणूस तर दिसला नाहींच; परंतु कुत्री, मांजरें, बैल अशीं नाना प्रकारचीं जनावरें आपल्या सभोंवार पाहून राजा ओरडला, 'एखाद्या पशुसंग्रहालयांत आल्यासारखें भासतंय् मला ! काय हें ? ही दुनिया म्हणजे एक अजब व अजस्र पशुसंग्रहालयच समजायचं कीं काय ?'

मंत्र्याला खात्री करून घेण्याची उत्कंठा लागून राहिली होती. ती जाणून राजानें त्याच्या हातीं चष्मा दिला, तेव्हां त्यांतून पहाण्याचा पहिला प्रयोग त्यानें राजावरच केला ! आणि त्याला राजा दिसला कां ? का दुसरं कोणी दिसलं !

राजाकडे पहातांच मंत्र्यानें मोठ्यानें एक किंकाळी फोडली ! "वाघ ! वाघ !!" म्हणून तो सैरावैरा धांवूं लागला !

'कुठें आहे वाघ ? वेड तर नाहीं लागलें तुम्हांला !' राजा म्हणाला.

अहो, हातच्या कांकणाला आरसा कशाला ? आपणच हा चष्मा लावून या आरशांत पहा म्हणजे सारा उलगडा होईल ?

राजानें चष्मा लाविला आणि आरसा हातांत घेऊन त्यांत स्वतःचें प्रतिबिंब पाहिलें.

काय सांगायचें ! राजाचा चेहरा खाडकन् उतरला ! राजा अंतर्मुख झाला. त्यानें मोच्याला जवळ बोलावून घेतलें. त्याच्याकडे एकवार निरखून पाहिलं, तेव्हां तो नखशिखांत मानव असल्याचें पाहून त्यानें त्याला साष्टांग प्रणिपात केला. राजा भावनाशील व सात्त्वीक होता. त्याला ती स्थिति पाहून दुःख झालें व पराकाष्ठेचा पश्चात्तापही

झाला. तो मोच्याला उद्देशून म्हणाला, "काय करायचंय् हें राज्य आणि ही सुखसंपदा! जेथें माणूस असून माणसाचें हृदय नाहीं. माणूस असून माणुसकीच्या गुणाचा जेथें अभाव, तेथें राज्य वैभवाची काय मातब्बरी! शेवटीं हें वैभव आपल्या बरोबर येणार आहे थोडेंच! बरोबर येणार ती हृदयाची श्रीमंती; हृदयाची विशालता व उदारता! यापुढें मला माणूस बनायचं आहे! या कार्यांत तूंच आतां माझा गुरु! घे ही तुला राज्यसंपदा. मला मानवजन्माला येऊन त्याचें सार्थक करायचें आहे! मला तुझ्यासारखा माणूस बनायचें आहे."

मोची म्हणाला, 'मला राज्य नको आणि कांहीं नको! तें तुझें तुला लखलाभ होवो. जें काय द्यायचें असेल तें या गरीब ब्राह्मणाला दे. आणि एकच गोष्ट सांगतों. माणूस बनण्यासाठीं राज्यत्याग, गृहत्याग किंवा संसारत्याग करायला नको. जनक हा राजा नव्हता का? त्यानें मनुष्यत्व टिकवून नाहीं का राज्य केलें? आणि प्रभू रामचंद्र! महाराज! आपण राजा जनकांचा किंवा प्रभू रामचंद्राचा उच्च आदर्श सतत दृष्टीसमोर ठेऊन राज्यकारभार चालवावा. प्रत्येकानें ईश्वरानें दिलेल्या स्थितींत वावरत असतां आपापलें कर्तव्याचरण करावें. त्यांतच मोक्ष आहे. ईश्वरानें मला जो व्यवसाय लावून दिला व मला जी स्थिति दिली त्या स्थितींत मी सर्वस्वी राजी आहें. मला कसलाच लोभ नाहीं, हव्यास नाहीं! माझें काम मी इमानें इतबारें करतों; त्यांतच हातून होईल ते परोपकार करतों आणि आनंदानें जीवन कंठितों. मला आपल्याकडून कशाचीही अपेक्षा नाहीं. अपेक्षा एकच. आणि ती म्हणजे जनक राजाप्रमाणें किंवा प्रभु रामचंद्राप्रमाणें होण्यासाठीं आपण झटावें. म्हणजेच तुम्हीं मानव व्हाल व मानव जन्माचें सार्थक कराल. येतो मी.'

मोचानें तेथून पाय काढला, परंतु जातां जातां माणुसकीचा महिमा सर्वांना पटवून तो गेला. राजा व सारे लोक त्याच्याकडे भक्तिभावपूर्वक आदरानें पहात होते. सर्वांनीं त्याला प्रणाम केला.

(आधारित)

---

**प्रश्न**—ज्याचा त्याग केला असतां मनुष्य सर्वांना प्रिय होऊन रहातो असें काय आहे?

**उत्तर**—अहंकार! याचा त्याग केल्यानें सर्व लोक तुमच्यावर प्रेम करूं लागतील.

**प्रश्न**—ज्याचा त्याग केला असतां दुःख न होतां आनंद होतो अशी या जगांत कोणती गोष्ट आहे?

**उत्तर**—क्रोध! याचा त्याग केल्यानें आपण दुःखी नाहीं परंतु सुखी होऊं शकतों.

**—महाभारत**

---

# योगवासिष्ठाचा जन्म

लेखक : श्री. केशव कृष्ण प्रधान

प्रभू श्री रामचंद्राचें जीवनच इतकें सुंदर, काव्यमय आहे कीं, त्यांतील कोणत्याहि प्रसंगावर लिहिण्यास फारच आनंद वाटतो.

रघुवंशासारख्या श्रेष्ठ कुलांत जन्म व तोसुद्धां राजघराण्यांत, आदर्श पुरुष व राजश्रेष्ठ श्री दशरथाच्या परम सात्त्विक स्त्रीच्या, कौसल्या मातेच्या पोटीं व त्यांत ज्येष्ठ पुत्र—राजसिंहासनाचा वारस म्हणून. श्रीरामचंद्राचें जन्मजातक कोणालाहि हेवा वाटावा असेंच होतें. इन्दुकलेप्रमाणें उत्तरोत्तर वृद्धिंगत होणारें त्या सुकुमार देहावरील तेज श्रीरामचंद्राच्या मुखमंडलावर जेव्हां चमकूं लागलें तेव्हां अयोध्यानगरींतील सर्व प्रजाजन त्या राजकुमाराकडे पाहून तात्काळ अत्यंत मोहित होऊं लागले. श्रीरामचंद्र आज या राजपथावरून, एका राजवाड्यांतून दुसऱ्या राजवाड्याकडे जात आहेत ही शुभवार्ता कळतांच त्यांचें केवळ दर्शन घेऊन आपल्या नयनांचें पारणें फेडण्यासाठीं लोक गर्दी करून दुतर्फा उभे राहूं लागले. एखाद्या गंडस्थळांतून मदस्राव होणाऱ्या डौलदार गतीच्या हत्तीं भोंवती भुंग्यांचें थवेच्या थवे त्या मदाचा आस्वाद घेण्यासाठीं जसे जमा होतात, त्याप्रमाणें श्रीरामचंद्राचें यौवन प्रजाजनांना सुखवूं लागलें. दोन्ही बाजूला असलेल्या उंच व विस्तिर्ण प्रासादांच्या सौधातलावर उभ्या राहून रामचंद्राच्या दर्शनाला उत्सुक झालेल्या अयोध्यानगरींतील ललनांना केवळ मदनाच्या दर्शनानें तृप्ति व्हावी तसें श्रीरामदर्शनानें वाटूं लागलें.

## श्रीरामचंद्राची अस्वस्थता

श्रीरामचंद्राच्या सुखांत कोणत्याही तऱ्हेची कमतरता पडूं नये म्हणून कैकयी मिळून त्याच्या तिन्ही माता, असंख्य दासदासी व इतरेजन, अहोरात्र मनापासून श्रम करूं लागले. श्रीरामचंद्रासाठीं उंची आभरणें, अलंकार, शय्योपकरणें किंबहुना स्वतंत्र सुंदर राजवाडे पण होऊं लागले. श्रीरामचंद्रास पोहण्यासाठीं सुंदर संगमरवरी जलाशयें, विहार करण्यासाठीं ठिकठिकाणीं विस्तीर्ण उद्यानें, फुलबाग, शिकार करण्यासाठीं राखीव निसर्ग सौंदर्य बनें वगैरे सर्व सुसज्ज ठिकाणें तयार सुद्धां झालीं. परंतु—

श्री रामचंद्राचें मन मात्र ह्या सर्व सुखोपभोगांत रमेना. त्याचें जन्मतः हळुवार असलेलें मन—इतरेजनांचें दुःख पाहून हळहळूं लागलें. श्री बुद्धदेवांना ज्याप्रमाणें रोग, जरा व मृत्यु या त्रिदर्शनानें जगाच्या क्षणभंगूरतेचा साक्षात्कार झाला, अगदीं त्याप्रमाणेंच प्रभु रामचंद्राच्या अंतःकरणाला हें क्षणभंगुर विश्व भेडसावूं लागलें व त्यांस रात्रंदिवस 'समजमें न आये माया आपकी प्रभो' या एकाच विचारानें पछाडलें. विश्वाची उत्पत्ति, स्थिति, आणि लय हे तिन्ही प्रकार आपल्याला कधींतरी समजूं शकतील का? जिला

सर्वश्रेष्ठ–माया माया म्हणून संबोधतात तिचें स्वरूप आपणास कळूं शकेल काय? सुखासाठीं निर्माण केलेल्या या विश्वांतील असंख्य वस्तु मानवी मनाला पूर्ण सुख कां देऊं शकत नाहींत? एक ना दोन नाना विचारांनी त्याचें अंतःकरण भांबावून गेले व एखाद्या दुर्धर रोगानें पछाडावें अशी त्यांची स्थिति झाली.

प्रभु रामचंद्र दिवसेंदिवस रोडावूं लागले आहेत. त्यांची सिंहासारखी छाती, वज्रासारखे आजानुबाहु कृश होत आहेत व त्याच्या कमळनयना भोंवतीं श्यामल वर्तुळें दिसूं लागलीं आहेत, ही गोष्ट श्री दशरथ, कौसल्येच्या नजरेंतून सुटूं शकली नाहीं. बालपणीं चंद्रासाठीं हट्ट धरून बसणारे प्रभु रामचंद्र असाच दुसऱ्या कोणत्या गोष्टीचा अन्तर्यामीं हट्ट धरून तर झुरत नाहींत ना? म्हणून त्यांच्या मनांतील गुप्त इच्छेचा शोध लावण्यासाठीं त्यांनीं कित्येक उपाययोजना केल्या. शेवटी रामचंद्राच्या अतिशय लाडक्या मातेला कैकयीला पण–(मंथरेचा संचार होण्यापूर्वीं कैकयी मातेचें रामचंद्रावर व रामचंद्राचें कैकयी मातेवर सर्वांत जास्त प्रेम होतें ही गोष्ट सर्वांस विदितच आहे) त्याच्या मनांतील काढून घेण्यास सुचविलें–पण व्यर्थ–प्रभु रामचंद्र आपल्या मनांत खोल रुजलेले दुःख कोणासच सांगण्यास तयार होईनात.

## परमात्मा जागा होऊं लागला

प्रभु रामचंद्र त्यावेळेला अविवाहित होते.–व पौंगड दशा संपून नुकतेच यौवनांत पदार्पण करीत होते. दिवसेंदिवस त्यांनीं धारण केलेल्या सुकुमार नाजूक देहांतल्या, विश्वव्यापी स्मृतिकेंद्रांचा झपाट्यानें विकास होऊं लागला होता; व एकएक पाकळी–पाकळी–फुलून दशदिशांना दिव्य सुगंध पसरविण्यासाठीं फुलूं लागलेल्या जलाशयांतील सूर्य कमळाप्रमाणें त्यांची स्थिति होऊं लागली होती. उषःकालीं नुकत्याच फुटूं लागलेल्या भगवान सूर्यनारायणांच्या सहस्रावधि किरणांची हालचाल त्यांच्या आत्मसूर्याला जाणवूं लागली होती. अवतारकार्यांची जाणीव देणारा त्यांच्यातील परमात्म प्रभू जागृत होऊं लागला होता. या सर्व प्रकारांचें समर्पक उत्तर ते तरी कैकयी मातेला कसें देणार!

अन् एक दिवस – आणि तो सोन्याचा दिवस उजाडला. एका मोठ्या पहाटेस अयोध्या नगरींतल्या श्री दशरथाच्या राजवाड्या भोंवती भगवी वस्त्रें परिधान केलेल्या व आपल्या आगमनाची वर्दी देण्यासाठीं दिव्य शंख व तुतान्या वाजविणाऱ्या आश्रमवासियांची गर्दी दिसली. त्यांच्या सर्वांच्या पुढें एक भव्य जटाधारी —– शुभ्रवस्त्र परिधान केलेला व शिव संप्रदायाप्रमाणें चंदनाचें आडवे गंध व बाजुला पुंड्र लावलेला–वृद्ध पण तेजस्वी व हंसतमुख–महापुरुष उभा होता. त्याचें नांव वसिष्ठमुनि. वसिष्ठमुनींच्या आगमनाची वर्दी मिळताच धांवतच दशरथ राजा राजवाड्याचें दार स्वतः उघडून त्यांच्या स्वागतार्थ उभा राहिला. वसिष्ठदेवांना उच्चासनावर बसवून व त्यांची षोडषोपचारें पूजा करून विनम्र भावानें दशरथ राजा बाजूला उभा राहिला.

'राजा, तुझें क्षेम कुशल आहे ना! तुझ्या राज्यांतील सर्व प्रजाजन सुखी आहेत ना?' वसिष्ठ मुनींनीं हे प्रश्न विचारतांच त्यानें सरळ उत्तर न देतां आल्यामुळें दशरथ

राजा खालीं मान घालून खिन्न वदनानें उभा राहिला. वसिष्ठ मुनीनें तें तात्काळ जाणलें व श्री रामचंद्राची कुशलवार्ता काय म्हणून प्रश्न विचारला. दशरथ राजाच्या नयनांतून खळखळ अश्रू वाहूं लागले; व सर्व उपाय केले तरी प्रभु रामचंद्र दिवसेंदिवस रोडावतच्च आहेत हें वृत्त त्यानें वसिष्ठ ऋषींच्या कानांवर घातलें. अरे हो, बरेच दिवसांत मी त्यास पाहिलें नाहीं. बोलाव त्याला ' असें वसिष्ठ मुनींनीं म्हणताच—सर्वश्रेष्ठ वसिष्ठमुनी आपणांस बोलावित आहेत अशी वर्दी दूताकरवीं तात्काळ प्रभुरामचंद्रांस मिळाली.

## श्रीराम व वसिष्ठ यांच्या भावना

प्रत्यक्ष अखिल ब्रह्मांडाचे नायक, परमात्मा प्रभु रामचंद्र, पण केवळ विनयमूर्तीच असल्यामुळें वसिष्ठ मुनींसारख्या सर्वश्रेष्ठ मुनिवर्यांच्या निरोपाबरोबर गडबडून गेले व गोंधळून जाऊन त्यांस कांहीं वेळ कांहींच सुचेना. कां बरें वसिष्ठमुनी मला बोलावीत आहेत? मजकडून त्यांचा कांहीं अपराध तर घडला नाहीं ना? या विचारांनीं मंद मंद पाऊलें उचलून प्रभु रामचंद्र श्री वसिष्ठांच्या दिशेनें जाऊं लागले. परमात्मप्रभू आपल्याच दिशेनें येत आहेत हें दिसतांच अखिल प्राणिमात्रांना क्षणार्धांत संजीवन मंत्र देणारा आज कित्येक वर्षे महान् तपश्चर्या करून आपण ज्याला हरघडीला साध्य करून घेण्याचा प्रयत्न करीत आहोंत तो आपलें सारसर्वस्व—मुनिजन सुखकारी प्रभु रामचंद्र, साकार स्वरूपांत आपल्याकडे येत आहे हें आपलें महान् भाग्यच आपल्याकडे चालून येत आहे, असें श्री वसिष्ठमुनिना वाटलें व ' ये रामचंद्रा इकडे ये, असा अगदीं माझ्याजवळ बैस' असे सहजस्फूर्त उद्गार त्यांच्या तोंडून नकळत बाहेर पडले. परंतु गोंधळून जाऊन प्रभुरामचंद्र नम्रपणें वसिष्ठ ऋषींना व इतर मुनींना प्रणाम करून दशरथ राजाच्या पदस्पर्शार्थ त्याजकडे गेले. ' ये वत्सा, येथें माझ्या अंकावर बैस ' असें दशरथ राजा म्हणत असतांच, अत्यंत विनयानें खालीं मान घालून प्रभु रामचंद्र तेथें खालीं जमिनीवरच श्री वसिष्ठांच्या पदकमलापाशीं बसले.

' तुझ्या परमपूज्य पित्यानें, दशरथानें तुझ्या विषयीं मला सर्व कांहीं सांगितलें आहे' ' रामचंद्रा तुला काय होत आहे तें मला समजू शकेल कां ?' असा श्री. वसिष्ठ मुनींनी प्रश्न विचारतांच. आपले कमल नयन—विनयपूर्ण नजरेने विस्फारून प्रभु रामचंद्रांनीं एकवार सभोंवती पाहिलें व दुसऱ्याच क्षणीं ती अमृतपूर्ण दृष्टि सद्‌गुरु भावनेनें योगिराज वसिष्ठ-मुनींवर खिळवून, त्यांनीं अखिल ब्रह्मांडाला ग्रासणारा चित्तथरारक प्रश्न वसिष्ठ मुनीस केला.

' भगवन्—प्राणिमात्रांचे कर्म म्हणजे काय हो ? हें सर्व जग उत्पन्न कां होतें ? वृद्धादी विकारांनीं युक्त कां दिसते व अखेरीस नाश कां पावते. तसेंच मनुष्य जन्माला कां येतो, तो म्हातारा कां होतो आणि मरतो कां ? संपत्ति आणि विपत्ति या दशा पुनः पुन्हा उत्पन्न होतात कां आणि नाहींशा होतात कां ? हें सर्व मला समजावून सांगा.

प्रभु रामचंद्र मला लवकरच राज्याभिषेक करा किंवा निदान माझा लवकर विवाह करा' असा कांहीं सर्वसाधारण सामान्य जनासारखा हट्ट, वसिष्ठ मुनिसमोर

# सर्वश्रेष्ठ मानवधर्म

**********************

गुरू गोविंदसिंह शिखांचे मोठे गुरू. मुसलमानी सुभेदार या शिखधर्मीय लोकांवर जुलूम करूं लागला. त्यामुळें दोघांत नेहमीं भांडणें होत.

एकदां अशाच दोन तुकड्या लढत होत्या. लढाई जोरांत चालली होती. दोन्हीं तुकड्यांची माणसें कापली जात होती. लढाईंत नेहमीं हाच प्रकार चालू असतो. त्या लढाईपासून फलप्राप्ती होवो न होवो. माणसाचें मरण मात्र ठरलेलें. गोविंदसिंगांना हें कळत नव्हतें असें नाहीं, पण आपल्या सैन्यांत वीरश्री व निर्भयता उत्पन्न झालीच पाहिजे म्हणून ते अशा लढाया देत.

दोन्हीं तुकड्या संध्याकाळपर्यंत लढल्या. सूर्य अस्तास गेला आणि त्या दिवशींची लढाई थांबली.

सैनिक आपल्या छावणींत परतूं लागले. एका कन्हैया नांवाच्या शीख सैनिकानें एक मरणाधीन मुसलमान शिपाई पाणी मागत असतांना ऐकलें.

कन्हैया कळवळला. पाणी मागणारा आपला दुष्मान आहे, इतकेंच नव्हे तर तो परधर्मी आहे. हें सर्व तो विसरून गेला. त्यानें जवळून पाणी आणून त्याला पाजलें.

याच वेळीं दुसऱ्या एका शीख शियायानें हें पाहिलें. त्यानें कन्हैयाला गुरुसमोर नेऊन त्याच्या विरूद्ध तक्रार केली.

गुरुजींनीं विचारल, "कन्हैया तुझें म्हणणें काय आहे ? कन्हैया म्हणाला," मी घायाळ झालेल्या शिपायाला पाणी पाजलें. ही गोष्ट खरी आह पण त्यावेळीं तो दुष्मण

---

मांडतील असें वाटणारा भोंवतालचा जनसमूह त्या प्रश्नानें चकितच झाला व क्षणभर कांहीं समजेना, उमजेना अशी सर्व सभेची स्थिति झाली.

एका महान् मंगलमय अवतारकार्यांचे जनक आणि प्रणेते श्री वसिष्ठमुनी, सर्वश्रेष्ठ योगिराज आहेत असा दशदिशांनीं दिलासा दिला आणि त्यांच्या मुखांतून परमात्मा प्रभूच्या प्रश्नाला उत्तर आलें—

'हें बघ रामचंद्रा,'

'या पृथ्वीपासून परब्रह्म स्वरूपापर्यंत जे अनन्त कोटी ब्रह्मांडरूपी त्रसरेण सर्वत्र पसरलेले आहेत ते पुन्हां पुन्हां उत्पन्न होतात आणि पुन्हां पुन्हां परमात्म स्वरूपांत लीन होतात' त्याचें ज्ञान सुखदुःखाची शांती करणारें असून-तुझ्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें त्यांतच सामावलीं आहेत तें मी तुला आतां सांगतों.' गंगोत्रीच्या ओघाप्रमाणें श्रेष्ठ वसिष्ठ ऋषींचीं मंगलवाणी वाहूं लागली. आणि 'योगवासिष्ठाचा' अर्थात् एका महान् पवित्र वेदतुल्य ग्रंथाचा जन्म झाला आणि जग पावन झालें.

---

आहे किंवा परधर्मी आहे हा विचार मुळींच माझ्या मनांत आला नाहीं. मानवधर्म म्हणून मी माझें कर्तव्य केलें. कोणत्याही मृत्युपंथास लागलेल्या माणसाला मी ईश्वरासमान समजतों. मग तो कोणत्याही धर्माचा असो. याहून मला जास्त कांहीं सांगायचें नाहीं.

सर्वांची नजर गुरुजींकडे लागली होती. आतां कन्हैयाला कोणती शिक्षा होते हें ऐकण्यासाठीं सर्व आतुर झालें होते.

गुरुजींनीं सर्वांकडे नजर फिरवली. शिष्यांच्या मनांतला भाव त्यांनीं ओळखला. प्रसन्न मुद्रेनें त्यानीं आपल्या बंडीच्या खिशांतून एक मलमाची डबी काढली. ती त्यांनीं कन्हैयाला दिली. कन्हैयाला याचा अर्थ कळेना. तो गुरुजींच्या तोंडाकडे पाहतच राहिला.

थोडावेळ सर्व स्तब्ध राहिले. इतक्यांत गुरुगोविंदांच्या मुखांतून अमृतवाणी बाहेर पडली. 'कन्हैया माझ्या तोंडाकडे काय पाहत राहिला आहेस? तें मलम घेऊन जा. आणि त्या शिपायाच्या जखमांना लाव. माझ्या सैनिनांकडून मी याच श्रेष्ठ मानव धर्माची अपेक्षा करतो. समोरासमोर युद्ध होत असेल तेव्हां मुसलमान आपले दुष्मन. एकदा सैनिक घायाळ होऊन पडला कीं मग तो प्रभूचाच अंश असतो. त्याचा तिरस्कार किंवा द्वेष करतां कामा नये. कारण तो देवच आहे.

सर्व शिष्यांना आपण आज कांहीं नवीनच ऐकतों आहोंत असें वाटलें. गुरुजी नुसत्या शीख धर्माचेच नाहींत, तर मानव धर्माचे पण पाईक आहेत, याची पूर्ण जाणीव झाली.

'गुरु गोविंदसिंगजी की जय!' सर्वांनीं जयघोष केला. कन्हैया त्या शिपायाच्या जखमांना मलम लावत होता. तेथूनच तो ओरडला, 'गुरु गोविंदसिंग की जय!' तिसरा एक आवाज आला.

'खुदा उसका भला करे'

सभोंवारचें जग ज्याला हलका किंवा नीच समजतें व त्याचा अपमान करतें त्याचा पाठीराखा देव असतो. देव त्याला अंतर देत नाहीं. भगवंताच्या मनांत आलें तर तो त्याला हां हां म्हणतां उच्च पदावर नेऊन बसवील; मात्र त्यांचें भगवंताकडे लक्ष असलें पाहिजे.

***

आमच्यांत व श्रीरामचंद्रांत पांच पडदे आहेत. (१) आळस, (२) कौं मोह, (३) विषयासक्ति, (४) अहंकार, व (५) जागतिक गोष्टींसंबंधीं आवड.

# प्रसन्न राहण्याची गुरुकिल्ली

**प्रसन्नता किंवा आनंद सर्वांना हवा असतो; परंतु तो सर्वांच्याच वाट्यास येत नाहीं; याचें कारण काय ? आम्हांला प्रसन्नतेची प्राप्ति कशी होईल ? त्याची गुरुकिल्ली कोणती ?**

राजापासून रंकापर्यंत सर्वांची दृष्टि निदान एका विशिष्ट बाबतींत तरी एकच असते. स्वतः प्रसन्न किंवा आनंदी राहण्यासाठीं झटणें व इतरांनाही आनंद देणें, ही सात्विक व सुखकारी भावना आहे. परंतु ती भावना कितीही सुखकर असली तरी बहुतेकांस अंमलांत आणतां येत नाहीं.

**प्रसन्न ठेवण्याची कला**

कां बरें अंमलांत आणतां येत नाहीं किंवा तशा कार्यांत आपणास सफलता कां बरें मिळत नाहीं ? कोणी या गोष्टीचा विचार करीत नाहीं आणि तशी जरुरीही कोणाला वाटत नाहीं. विचार करणाऱ्यास त्याचें कोडें सुटल्याशिवाय राहणार नाहीं.

आम्हीं या जगांत एखाद्या माणसास जरी संतुष्ट ठेऊं शकलों किंवा निदान स्वतःला जरी संतुष्ट राखूं शकलों तरी पुष्कळ होईल. परंतु तेवढेसुद्धां आमच्या हातून घडत नाहीं. स्वतःला प्रसन्न ठेवणें हें कार्यही वाटतें तेवढें सुलभ नाहीं.

ईश्वरानें आपणांस जी स्थिति दिली आहे, ती ईश्वरी कृपा समजून जो समाधान राहूं शकतो तो स्वतःला संतुष्ट ठेऊं शकतो, परंतु ही सुद्धां सहजसाध्य गोष्ट नाहीं. भगवंतावर आपली संपूर्ण श्रद्धा असली पाहिजे व ज्याला 'आत्मसमर्पण' म्हणतात तें करतां आलें पाहिजे. बरीवाईट स्थिति वाट्यास येणें ही आपल्या हातची गोष्ट नाहीं. आपण चांगल्यासाठीं सतत झटावयाचें, त्यासाठीं उद्योग करावयाचा, परंतु जें कांहीं वाट्यास येईल, सुख येवो, दुःख येवो तो ईश्वरी प्रसाद म्हणून ग्रहण करावयाचा. ही त्याची इच्छा असें म्हणून मनाच्या प्रसन्नतेला थोडा सुद्धां धक्का लागूं द्यावयाचा नाहीं, हा एक योग आहे. तो आपण जरूर साध्य करून घेतला पाहिजे.

**एक महामंत्र**

'मामेकं शरणं व्रज' असें भगवंतानें गीतेत अगदीं जीव तोडून कळकळीनें सांगितलें आहे. तो किती महत्वाचा महामंत्र आहे! तो ज्यानें आपलासा केला तोच सुखी झाला. आत्मसमर्पणाचा तोच अर्थ आहे. ज्यानें हा मंत्र बरोबर पकडला, त्याच्या वाट्याला दुःख, शोक कधींही येणार नाहीं. त्याला चौफेर प्रसन्नता पसरलेली आढळून येईल.

एकदां असें झालें कीं, कोणी एक रूपसुंदर राजकन्या आपल्या राजवाड्याच्या सज्जांत केस सुकवीत उभी होती. खालून कोणी एक साधु जात होता. त्याची नजर

सहज वर गेली आणि ती त्या राजकन्येवर खिळून राहिली. इतक्यांत राजकन्येची दृष्टि सहज खालीं गेली व कोणी एक संन्यासी आपल्याकडे एकसारखा टक लावून पहात असल्याचें पाहून तिला साहजिक संताप आला. रागाच्या भरांत त्या सन्याशावर ती मोठ्यानें ओरडली व त्याला अपशब्द बोलली.

तेव्हां तो सन्यासी हात जोडून नम्रतेनें राज्यकन्येस म्हणाला, “मुली तूं माझ्या कन्येसारखी आहेस मला; मी तुझ्याकडे पहात होतों तो पापी दृष्टीनें मुळींच नव्हे. ज्यानें तुला निर्माण केलें त्या भगवंताच्या लीलेचें मी मनांतल्या मनांत कौतुक करीत होतों. तुला पहात असतां तुझ्या निर्मात्याची मला आठवण होत होती व त्याच्या लीलेचें किती कौतुक करावें याच विचारांत मी होतों.

**राजकन्येच्या डोक्यांत प्रकाश पडला**

ते शब्द ऐकतांच राजकन्येच्या डोक्यांत चक्क प्रकाश पडला व त्या साधूबद्दल तिला असीम आदर वाटून त्याला तिनें साष्टांग प्रणिपात केला.

संसाराला असार म्हणतात; परंतु त्या म्हणण्याचें सार कोण लक्षांत घेत आहे? या संसाराला गोचिडीप्रमाणें आम्हीं चिकटून रहातों. त्याच्या मोहांत सर्वस्वी सापडतों. हा मोह हेंच आमच्या दुःखाचें मूलभूत कारण असतें. जेथें मोह आहे तेथें त्याला दुःख चिकटलेलें असतें. अग्नीला स्पर्श केला असतां हात भाजतो, पोळतो, याची जाणीव असल्यामुळें आपण अग्नीपासून सावध रहात असतों. सर्प चावला तर त्याचें विष बाधतें या जाणीवेनें आपण त्याच्यापासून दूर दूर रहातों. त्याचप्रमाणें या संसारांत जर आपण सावधानतेनें वागूं लागलों, तर आम्हीं प्रसन्न राहण्यांत यश मिळवूं.

जो देवावर श्रद्धा ठेवतो, तोच लीलाधारी आहे, सुख किंवा दुःख त्याच्याच कृपेचें किंवा अवकृपेचें फळ असतें हें जो समजतो व सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ—अशी ज्याची वृत्ति झालेली असते, त्याच्यावर प्रसन्नतेची कृपा सदासर्वकाळ झालेली असते. ‘आवत हर्ष न उपजे। जावत शोक न होय, ऐसी रहनी जो रहे, घरमें योगी होय.’ या हिंदी दोह्यांत माणसानं कसें वागावें व रहावें याचें सार सांगण्यांत आलेलें आहे.

पूर्व संचितानुसार भगवंतानें आमच्या जीवनाची मांडणी व आखणी करून ठेविलेली असते. तेव्हां जन्मास आल्यापासून निजधामास जाईपर्यंत जी जी सुखदुःखाची स्थिति वाट्यास येईल ती ती भगवंताची कृपा मानून, असलेल्या किंवा वाट्यास आलेल्या स्थितींत समाधान मानून रहाणें हा प्रसन्न रहाण्याचा राजमार्ग आहे.



# श्रीराम व भरत यांचें परस्पर प्रेम

श्रीरामचंद्र व भरत एकमेकांकडे निस्सीम प्रेमभावानें आकृष्ट झालेले होते, याची साधारण माणसास कल्पनाही करवणार नाहीं. श्रीरामचंद्र चौदा वर्षांच्या वनवासासाठीं निघाले तो दिवस भरतानें बरोबर आपल्या अंतःकरणांत टिपून ठेविला होता. नंदीग्रामांत सन्यस्त वृत्तीनें राहून श्रीरामाचें चिंतन करीत तो एकेक दिवस मोजीत होता. श्रीराम शेकडो मैल दूर लंकेंत होते. तेथें रामरावण युद्ध चालू होतें. तें युद्ध संपवून व रावणाचा वध करून सीतेसह श्रीराम अयोध्येला यायचे होते.

वनवासाचे दिवस संपत आले, नव्हे संपले. फक्त एकच दिवस बाकी राहिला होता; परंतु अधीरतेमुळें, उत्कंठेमुळें तो एकच दिवस भरताला किती कठीण गेला! 'रहेऊ एक दिन अवधि अधारा। समुझंत मन दुख भयुऊ अपारा ॥ (तुळसीदास) भरत विचारमग्न स्थितींत होता. तो एकसारखें श्रीरामाचें चिंतन करीत होता. आतां एकच दिवस बाकी राहिला होता. तत्पूर्वी एक आठवडा त्याला रामरावण युद्धाच्या वार्ता समजल्या होत्या. परंतु त्या वार्तांत त्याला गोडी वाटत नव्हती. राम भेटला पाहिजे. जीवनांत तेवढेंच घडण्यासाठीं तो जिवंत राहिला होता. रामभेट झाली, रामानें सोपविलेल्या जबाबदारींतून आपण मोकळे झालों, म्हणजे सुटलों एकदांचे! मग आपलें कांहींहि होवो; त्याची त्याला पर्वा नव्हती.

### भरताचें शंकित मन

उद्यां श्रीरामाची, आपल्या परब्रह्माची भेट होणार, या विचारानें भरताचा सारा देह क्षणोक्षणीं पुलकित होत होता. त्याच्या मनांत आनंदाच्या लाटांवर लाटा उसळत होत्या. पण ठरलेल्या वेळीं म्हणजे चौदा वर्षांचा कालावधि समाप्त होतांच श्रीराम अयोध्येंत येईल ना? मला भेटेल ना? अशा प्रकारचे विचार मनांत येऊं पहात; परंतु भरत त्या विचारांना थारा देत नव्हता. ते मनाला दुःखी कष्टी करणारे विचार होते. ते त्याला नको होते; नको असले तरी ते हळूच कोणत्या तरी वाटेनें मनांत डोकावण्याचा प्रयत्न करावयाचे.

मध्यें फक्त एक रात्रच बाकी राहिली होती. रावणाचें, कुंभकर्णाचें किंवा बिभीषणाचें काय झालें याचें चिंतन भरत करीत नव्हता. त्याच्या मनांत रामाशिवाय दुसऱ्या कोणालाही थारा नव्हता. उद्यां सकाळच्या प्रहरीं राम अयोध्येंत येणार आणि मला भेट देणार! स्नान करून मी सूर्याला अर्घ्य अर्पण करीत असतां जे पहिले सूर्याचे किरण माझ्यावर पडतील त्याच क्षणीं प्रभू रामचंद्राचें आगमन होऊन त्याचे प्रकाश किरण माझ्यावर पडतील व मी पुण्यपावन होईन, असें तो स्वतःशीं म्हणत होता.

चौदा वर्षांपूर्वी चित्रकूटवर श्रीरामाची भेट झाली त्यावेळीं केलेल्या निर्धाराची त्याला आठवण झाली.

## रामचंद्राला जाणीव होती

आणि श्रीरामाला त्याचा तो निर्धार माहीत नव्हता का? कां माहीत नसणार? आणि भरताची व्याकुळता, अधीरता व निर्मल प्रेम याची त्याला जाणीव नव्हती का?

चौदा वर्षें परिपूर्ण होतांच मी जर अयोध्येंत पोहोंचलों नाहीं तर त्याच दारुण निराशेंत कंठीं आलेलें भरताचे प्राण त्याला सोडून गेल्याशिवाय रहाणार नाहींत याची श्रीरामाला पुरेपूर जाणीव होती. तो पुष्पक विमानांत बसून सीतामाईसह अयोध्या नगरींत प्रवेश करणार होता. त्याला वेळेचें भान बरोबर होतें. वेळ साधण्याच्या व राखण्याच्या बाबतींत तो अगदीं कांटेकोर होता. चौदा वर्षें! एक क्षण जास्त नाहीं व एक क्षण उणा नाहीं! ही चौदा वर्षांची पूर्णता कशी व्हायची? भरत काय? तो आपला दिवस मोजीत होता; परंतु श्रीरामाजवळ घटकांचा आणि पळांचाही हिशोब होता.

ज्या दिवशीं सकाळीं वनवासास जाण्याचा निर्णय त्यानें घेतला, त्या निर्णयाबरोबर तो तात्काळ बाहेर पडला नाहीं. त्याला आपल्या मातेचा निरोप घ्यावयाचा होता. दुःखी दशरथाचें जाण्यापूर्वी दर्शन घेऊन त्याचें सांत्वन करायचें होतें; कैकयी मातेला आणि अनेकांना भेटून त्यांचे प्रेमाशीर्वाद घ्यायचे होते; आणि ते घेईपर्यंत दुपार होत आली होती.

## बिभीषणाचा आग्रह

श्रीरामाला ती दुपारची वेळ साधायची होती. सकाळ आणि दुपार! यांत अंतर ४|५ तासांचें. परंतु तें परिपूर्ण होणें जरूर होतें. चौदा वर्षांची पूर्णता व्हायची होती.

युद्ध समाप्त झालेलें होतें. निघण्याची सर्व तयारी झालेली होती. सर्व निरवानिरव होऊन चुकली होती. तरीही बिभीषण श्रीरामाला पुढें पाऊल टाकूं देत नव्हता. श्रीरामाचा सहवास आणखी थोडें तरी श्रीरामाशीं बोलावें असें त्याला वाटत होतें; परंतु भरताच्या भक्तिभावाकडे, त्याच्या व्याकुळतकडेही त्याचें लक्ष लागून राहिलें होतें. श्रीराम बिभीषणाला म्हणत होता, बाबारे! तुझें आगतस्वागत मला पुरे झालें. माझें लक्ष आतां भरताकडे लागून राहिलें आहे. तो घवकापळें मोजीत माझी वाट पहात बसला असेल. मला येथून लौकर निघूं दे. माझ्या जाण्या आड येऊं नकोस.

श्रीराम त्यांच्यासाठीं सज्ज असलेल्या पुष्पक विमानांत बसून निघाले; आणि प्रयागमध्यें त्यांनीं आपलें विमान उतरविलें. चौदा वर्षे पूर्ण व्हायला अजून अवधि होता. तो पूर्ण करायचा होता; परंतु तो पूर्ण होईपर्यंत भरत थांबणार नाहीं. तो प्राणत्याग करील याची जाणीव असल्यामुळें श्रीरामानें हनुमानजीला पूर्व सूचना देण्यासाठीं व भरताला आपल्या आगमनाची ग्वाही देण्यासाठीं पुढें पाठवून दिला.

त्या दरम्यान भरताच्या मनांत नाना शंका कुशंका यायला लागल्या होत्या. हनुमान भेटीनें त्यांचे निवारण झालें.

श्रीरामचंद्राचें व भरताचें परस्पर प्रेम अशा प्रकारचें होतें.

---

# निस्सीम श्रद्धा हीच कसोटी

***********************************

**'श्रद्धावान् लभते ज्ञानं; त्याचप्रमाणें ज्याच्याजवळ जाज्ज्वल्य श्रद्धेचें गाठोडें आहे; ज्याला भगवंताच्या भेटीची तीव्र तळमळ लागून राहिली आहे, त्याला भगवत्प्राप्ति झाल्याशिवाय रहाणार नाहीं.**

भगवंताची भेट लौकरांत लौकर केव्हां होईल? त्याचें एकच उत्तर म्हणजे आपल्या अंतःकरणांत श्रद्धा व विश्वास पूर्णत्वाला पोहोंचलेला असेल तेव्हां. श्रद्धायुक्त अंतःकरणानें तुम्हीं त्याची आळवणी केली तर तो तुमच्यापासून दूर राहूं शकत नाहीं. ईश्वर आहे; आणि मला त्याला भेटायचें आहे. असा आपला पूर्ण निर्धार व्हायला हवा. ज्यांनीं ज्यांनीं श्रद्धापूर्वक व निर्धारपूर्वक त्याला आळविलें त्यांना तो पावला आहे; आजही पावत आहे व भविष्यकाळींही पावेल; मग माझी व त्याची भेट झाल्याशिवाय कशी राहील? अशा प्रकारची आपली दृढ श्रद्धा पाहिजे. ज्याची दृढ श्रद्धा असते तो भगवंताच्या भेटीसाठीं आतुर व व्याकुळ झाल्याशिवाय कदापि रहाणार नाहीं. ती भेट होईपर्यंत त्याला चैन पडणार नाहीं. त्याला रात्रीची स्वस्थ झोंप येणार नाहीं व भोजन केव्हांही गोड लागणार नाहीं. सारा वेळ त्याचाच निदिध्यास. मनाची अशी व्याकूळ स्थिति व्हावी लागते. पुष्कळ पुरुष व स्त्रिया कथा कीर्तनाला जातात; प्रवचने ऐकतात. त्यांना वाटत असतें की, बस्स! आतां यापलिकडे आणखी कांहीं करण्याची जरुरी नाहीं. परंतु अशानें का भगवंताची भेट होणार आहे? भगवान् वाटेल त्याला मिळायला वाटेवर पडलेला नाहीं.

**श्रद्धेचें फळ मिळणारच**

आपलें अंतःकरण त्या भेटीसाठीं तळमळून निघालें पाहिजे. ती तळमळ, ती उत्कंठा, ती जाज्ज्वल्य निष्ठा आपल्या ठायीं कुठें असते? परंतु आमची श्रद्धा खंबीर होऊं द्या; त्या श्रद्धेचें फळ मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं.

श्रीरामचंद्राची व आपली भेट निश्चित होणारच; आणि कोणत्याहि परिस्थितींत मी त्याला भेटल्याशिवाय रहाणार नाहीं, मी भेटणारच, अशा प्रकारची रामचंद्राबद्दल भरताची श्रद्धा होती.

तुळशीदासजींनी भरताच्या तोंडीं पुढील वाक्य घातलें आहे:— मोरे मन भरोस दृढ होई। मिलिहहिं राम सगुन सुभ होई॥ भगवान रामचंद्र मला भेटणारच भेटणार; मला त्याबाबतींत जरा सुद्धां संशय वाटत नाहीं. जिकडे जातों, जिकडे पहातों तिकडे शुभ चिन्हें दिसत आहेत.

भगवन्ताला भक्ताची सहज करुणा येते. त्याचा स्वभाव अत्यंत मृदू, कोमल आहे. तो दीनांचा नाथ आहे. कोणीहि दिनानें अंतःकरणापासून त्याची आळवणी

करावी; तो त्याला पावणारच. तुमच्यांत अवगुण असू द्या, कांहीं असू द्या. एकदां का शुद्ध व श्रद्धाशील अंतःकरणानें तुम्हीं त्याला आळविलें म्हणजे तो तुमचाच आहे.

भरताला भगवंताच्या सुकोमल अंतःकरणाची कल्पना होती. आणि त्याबरोबर आपली उत्कंठा, आर्तता लक्षांत घेऊन त्याची व माझी भेट होणार याची त्याला पूर्ण खात्री होती. जितका कालावधि लागेल तितके माझे प्राण त्याच्या भेटीसाठीं कंठाशीं येतील व त्या स्थितीला तो मला येऊंच देणार नाहीं.

**भरताची उत्कंठा**

श्रीरामचंद्राचें अयोध्या नगरींत आगमन कधीं होणार याचा कालावधि ठरलेला होता. तेथपर्यंत वाट पहाणें हें भरताचें कर्तव्य होतें. दिवस लोटत चालले, काळ जात चालला, आगमनाचा त्यानें मनाशीं ठरविलेला दिवस जवळ जवळ येत चालला, तसतशी भरताची उत्कंठा व व्याकुळता वाढत चालली. ध्यानीं मनीं राम! त्याशिवाय त्याला दुसरें कांहीं दिसत नव्हतें व सुचत नव्हतें. त्याला स्वतःच्या देहाचेंही भान राहिलें नव्हतें.

भरत रामविरहानें व्याकुळ झालेला होता. त्या विरहसागरांत तो गटांगळ्या खाऊं लागला होता. दिवस वाढत चालले, तस तशी उत्कंठा व विरहावस्था वाढत चालली. भरत त्या विरहसागरांत बुडून जातो कीं काय अशी भीति वाटूं लागली, प्राण अगदीं कंठाशीं आलें. भगवंताला भक्ताची काळजी. आतां बुडणार इतक्यांत रामभक्त हनुमानजी एका ब्राह्मणाचें रूप घेऊन आले व विरहसागरांत बुडण्याच्या पंथास लागलेल्या भरताचा त्यानें बचाव केला. त्याला दिलासा दिला.

भरताप्रमाणें आपली श्रद्धा असली, तितका जाज्वल्य विश्वास असला, तर, आपलीही भेटीची इच्छा पूर्ण झाल्याशिवाय रहाणार नाहीं. आजवर शेकडो, हजारो भक्तांना दर्शन देऊन भगवंतानें पुण्यपावन केलें आहे. या सत्य व घडलेल्या गोष्टी आहेत. मग आपणाला कां बरें भगवंताचें दर्शन घडणार नाहीं. त्यासाठीं आम्हीं पात्र बनूं या. निस्सीम श्रद्धेचें गाठोडें जवळ करूं या. तें वाढवूं या. म्हणजे भगवन्त आपल्या जवळ आल्याशिवाय रहाणार नाहीं.

---

॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

# महिला वस्तु भांडार

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें

लोकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

*** आमचीं कोठेंही शाखा नाहीं. ***

# श्रीसाईसच्चरित – गद्यानुवाद



लेे० : एक साईभक्त

## अध्याय नववा

श्रीगणेशास, सरस्वतीस, गुरूस, कुलदैवतास, सीता रामचंद्रास आणि सद्गुरु श्रीसाईनाथांस नमस्कार. मागील कथानुसंधानाप्रमाणें बाबांची आज्ञा मिळाली नसतांना भक्त घरीं परत जातांना कसे संकटांत पडत, त्याचप्रमाणें भिक्षावृत्तीचें व्रत आमरण आचरून भक्तांच्या कल्याणार्थ बाबा पंचसूनादि पातकांची निवृत्ति कशी करीत याविषयीं आतां श्रवण करा. आब्रह्मस्थावरांत सर्वत्र श्रीसाईच अनुस्यूत आहेत आणि कृपावंत होऊन सर्वांभूती भगवंत आहे हें ते प्रत्येक भक्ताच्या मनावर बिंबवीत असत. म्हणून श्रोते हो, मी आतां आपणांस प्रार्थना करतों कीं, या पवित्र कथा आपण लक्ष देऊन ऐका. त्यायोगें आपण कल्याण पावाल.

शिरडीच्या यात्रेचें एक वैशिष्ट्य असे. भक्तानें बाबांच्या परवानगीशिवाय घरीं परत जाणें म्हणजे संकटाला आमंत्रण दिल्यासारखें असे. या उलट आज्ञा झाली असतां एखादा तेथें हट्टानें राहीला तर त्यावर आपत्ती आल्याशिवाय रहात नसे. याचा अनुभव सर्वांना मिळाला आहे. जे जे बाबांच्या आज्ञाबाहेर वागले त्यांचें वाटेंत हाल झाले. कित्येकांना चोरांनीं लुबाडलें. जन्माचा धडा मिळत असे त्यांना. भाकर तुकडा खाऊन जा असें म्हटलें असतां जर कोणी घाईनें उपाशींच निघाला तर गाडी वगैरे कांहीं न मिळतां त्याला उपाशीं रखडावें लागे, असें अनेक भक्तांनीं पाहिलें आहे.

एकदां तात्या कोते पाटील कोपरगांवच्या आठवड्याच्या बाजारास जाण्यासाठीं निघाले. टांगा बाहेर उभा करून बाबांची आज्ञा मागण्याकरितां ते मशिदींत आले. त्यांनीं बाबांना नमस्कार केला आणि 'येतो' असें म्हटलें. परवानगी घेण्याचें हें एक सोंग होतें. भक्तांनीं कितीही टाळाटाळ केली तरी बाबा सर्व जाणत. तात्या उतावीळ झालेले पाहून बाबांनीं त्यांना अमळ थांबण्यास सांगितलें. 'राहूंदे, होईलरे बाजार, तूं आतां गांवाबाहेर जाऊं नकोस.' परंतु पाटलांचा जास्तच आग्रह पाहून त्यांनीं शामाला बरोबर घेऊन जाण्यास सांगितलें. 'शामा कशाला बरोबर' असें तात्यानीं म्हटलें आणि बाबांचा अवमान करून ते टांग्यांत बसून

बाजाराकडे निघून गेले. टांग्याच्या दोन घोड्यापैकीं एक फारच चपळ होता. तिनशें रुपये पडले होते त्याला. नेहमींच बाजाराला ते नीट जात. त्यांना केव्हांही चाबूक हाणावा लागत नसे. परंतु त्या दिवशीं काय झालें कुणास ठाऊक. साऊळ विहीरी जवळ येताच घोडे भडकले आणि एकाएकीं त्या चपळ घोड्यास टपका भरून तो कंबरेतून लुळा पडला. मग कोठला बाजार आणि काय? तात्यांना साईमाऊली आठवली. वेळींच त्यांनीं ऐकलें असतें तर हा अपघात टाळता आला असता. पण आतां त्याला उपाय काय?

असेंच एकदां कोल्हार गांवीं जाण्यासाठीं तात्यानीं टांगा जोडला. बाबांना वंदन करून त्यांनीं त्यांची परवानगी मागितली. 'आतां जाऊन येतों,' ते म्हणाले आणि पूर्ण अनुमति मिळण्यापूर्वीच ते बाहेर पडले. पुढें काय घडलें तें पहा. आधींच तो भिरक्याचा टांगा. वाटेंतील खांचखळगे न पाहतां तो एकदम बेभान उधळला. मोठा जिवावरचा प्रसंग! पण साईकृपेनें तो टळला. तेथील एका बाभळीच्या झाडावर टांगा आपटून मोडला म्हणून बरें, त्यामुळें पुढचा दगाफटका टळला.

हा दुसरा एक प्रसंग पहा. मुंबईचे एक इंग्रज गृहस्थ कांहीं हेतू मनांत धरून श्रीसाई दर्शनाला आले होते. चांदोरकरांचें एक ओळख पत्र त्यांच्या जवळ होतें, माधवरावाकडून एक तंबू मागवून त्यांनीं आपली सोय लावून घेतली होती. बाबांच्या इच्छेविरुद्ध कोणीही मशीदींत वर चढून त्यांचें दर्शन घेऊन जाणें शक्य नसे. या गृहस्थानें मशीदींत वर जाण्याचा तीन वेळां प्रयत्न केला पण त्यांचें सर्व प्रयत्न निष्फळ ठरलें. बिचारा पाहुणा मनांत फारच हिरमुसला. मशीदींत वर जाऊन गुडघे टेकून बाबांना नमस्कार करावा आणि त्यांच्या हाताचें चुंबन घ्यावें. अशी त्याची फार इच्छा होती. पण बाबांनीं त्याला मशींदीत वर आपल्याजवळ येऊं दिलेंच नाहीं. त्यानें खालीं सभामंडपांत रहावें; पाहिजे तर तेथेंच बसावें आणि तेथूनच दर्शन घेऊन जावें. मशिदीची पायरी चढण्याची त्यास मनाई होती. असो, तो गृहस्थ परत जाण्यास निघाला आणि बाबांचा निरोप घेण्यासाठीं अंगणांत आला. बाबा म्हणतात. 'अरे इतकी घाई कशाला करतोस; जाशील उद्यां.' हें ऐकतांच लोकांनीं त्याला न जाण्याची विनंती केली. बाबांची अवज्ञा करून गेले ते पुढें कसे पस्तावले हेंहि त्याच्या नजरेस आणून दिले. परंतु त्याच्या मनाला तें पटलें नाहीं. तो निघाला परवानगीशिवाय. जें होणार तें कसें टळणार? आणि मार्गांत त्याचे फारच हाल झाले. आरंभीं टांगा नीट चालला होता. नंतर घोड्यांनीं नेहमींची वाट सोडली. साऊळ-विहीर ओलांडतांच एक सायकल टांग्यापुढें आल्यामुळें घोडे एकदम भडकले आणि उधळले. हा गृहस्थ टांग्याच्या मागच्या बाजूस बसला होता त्याचा तोल गेला आणि तो उलटून खालीं रस्त्यावर पडला. कसाबसा टांगा थांबविण्यांत आला. तो गृहस्थ घसरत घसरत टांग्याजवळ गेला. लोकांनीं त्याला उचलून

आंत ठेविलें. शिरडी राहिली एकीकडे आणि मुंबई दुसरीकडे. मग टांगा कोपरगांवच्या हॉस्पीटकडे नेण्यांत आला. अपघात कसा झाला हें त्या गृहस्थांस पूर्णपणें उमजून आलें. त्याला आतां पूर्ण पश्चाताप झाला होता. पुढें हॉस्पिटलमध्यें कांहीं दिवस त्याला अवश्य प्रायश्चित भोगीत काढावे लागले.

अशा तऱ्हेनें लोकांना असंख्य अनुभव आले. ते बाबांची आज्ञा पाळूं लागले. कोणीही मग त्यांचा अवमान करण्यास धजलें नाहीं. कोणाच्या गाडीनें न्याकच्च निसटलें तर कोणाचें घोडेच वाटेंत थकलें. कित्येकांच्या गाड्या चुकल्यामुळें त्यांना उपास पडून चुरमुरे फांकीत बसावें लागलें. उलट पक्षीं ज्यांनीं बाबांची आज्ञा शिरसावंद्य मानली अवेळींही गाडी मिळाली. त्यांची वारी सुखाची झाली आणि जन्मभर त्यांना बाबांची आठवण राहिली.

वर्षानुवर्षें बाबांनीं भिक्षा मार्गाचें कां अवलंबन केलें होतें असें कोणाच्या मनांत आल्यास त्यांनीं आपली शंका निवृत्ति करून घ्यावी. बाबांचें आचरण पाहूं जातां भिक्षाच मागणें त्यांना रुचित होतें. यामुळें आनंद प्राप्ती होऊन विरक्ति आणि गृहस्थ कर्तव्य ही साधता येत असे. ज्यानें आपलें वायावाचा, चित्त आणि वित्त साईचरणी समर्पिलें आहे असा अनन्य भक्त त्यांना फारच प्रिय असे. घरामध्यें शिजल्या जाणाऱ्या अन्नाचा स्वामी गृहस्थ असतो. यति आणि ब्रह्मचारी यांना होमाहुतीमध्यें अग्रभाग मिळतो. करितां त्यांना आधीं न देतां जो गृहस्थ आपण स्वतः तें अन्न सेवन करतो त्यास चांद्रायण व्रताचारणानें त्रिशुद्धि मिळतें असा शास्त्र निर्बंध आहे. यती आणि ब्रह्मचारी यांना पाक निष्पति निशिद्ध आहे. ते चांद्रायणही करू शकत नाहींत. उदर भरण्यासाठीं यांना कोणताच व्यवसाय करता येत नाहीं म्हणून शास्त्रानें त्यांची उदरपूर्ती गृहस्थांवर सोपविली आहे. बाबा गृहस्थ नव्हते आणि वानप्रस्थाचा त्यांनीं स्वीकार केला नव्हता. ते केवळ संन्यस्त बाळ ब्रह्मचारी होते.

भिक्षांव्रतच त्यांना प्रशस्त. अखिल विश्वचि माझें घर असून मीच वासुदेव विश्वंभर व परब्रह्म अक्षर आहे अशी ज्यांची दृष्टी त्यांनाच भिक्षान्नाचा पूर्ण अधिकार असतो. नाहींतर भिक्षान्नाचे विडंबन आपण नेहमीच रस्त्यावर पाहत असतों. पुत्रेषणा वित्तेषणा आणि लोकेषणा या एषणात्रयींचा त्याग करून जो मुक्त झाला आहे त्यानेंच भिक्षान्नाची इच्छा करावी. नाहीं तर “ भिक्षापात्र अवलंबणें ! जळो जिणें लाजिरवाणें ” ही तुकोबांची मुक्ति अर्थशून्य आणि निःसार ठरेल.

श्रीसाईसमर्थ महान सिद्ध आहेत हें लहान थोरापासून सर्वांनाच कळतें. आम्ही मात्र नेहमीच संतपदी अश्रद्ध आशाबद्ध असे आहोंत.

पंचमहायज्ञाशिवाय गृहस्थांस जेवण निंद्य आणि अपवित्र आहे. शिरडींत साई असें पवित्र भोजन दररोज स्वतः करवून घेत. प्रत्यहीं पांच घरीं ते भिक्षेसाठीं जात. त्या घरच्या माणसांना अतिथियज्ञाचें स्मरण देत. भाग्यवान असत

ते आपल्या घरांत बसून ह्या पुण्याचा लाभ घेत. पंचमहायज्ञानंतर अन्नसेवन केल्यास नकळतच 'पंचसूना' पातकांचे क्षालन होत असते. 'कंडणी', 'चुल्ली,' 'पेषणी' 'उदकुंभी' आणि 'मार्जनी' हीं 'पंचसूना' पापें म्हणून लोकांत प्रसिद्ध आहेत.

उखळींत धान्य घालून तें कांडावें लागतें त्याशिवाय तें खाण्यास योग्य होत नाहीं. असें करतांना जी जीव हिंसा होतें तिला 'कंडणी' म्हणतात. 'पंचसूनादि' पातकांतलें हें पहिलें पातक होय.

चुलींत सरपण पेटवून पाकनिष्पत्ति करतेवेळीं नकळत जीवहत्या घडतें त्यास 'चुल्ली' असें म्हणतात. हें दुसरें पातक.

जात्यांत धान्य दळून त्याचें पीठ करण्यांत येतें त्यावेळेसही अशीच असंख्य जीवांची हानी घडतें तिला 'पेषणी' म्हणतात.

तळीं विहीरींमधून आपण कुंभ घेऊन पाणी आणतों, त्याचप्रमाणें याठिकाणीं नरनारी धुणीं धुतात त्यामुळें पुष्कळ जीव मारतात. इतकेंच नव्हें तर भांडी घासतांना व स्वच्छ करतांनाही हत्या घडते. ही झाली उदकुंभी.

गरम व थंड पाण्यांत आंघोळ करणें, सडासंमार्जन करणें त्यामुळेंही जीव हत्या घडतें तीस 'मार्जना' म्हणतात.

पंचमहायज्ञानें गृहस्थांस या पापांचे क्षालन करतां येतें. पंचसूनानिरास झाला. म्हणजे त्याची चित्त शुद्धी होऊन त्याच्या हृदयांत सोज्वळ शुद्धज्ञानाचा उदय होतो आणि मग तो अढळ मोक्ष प्राप्तीचा मार्ग आक्रमूं लागतो. असो. साईंच्या या भिक्षावृत्तीविषयी लिहीतां लिहीतां ग्रंथ विस्तार होईल. आतां या विषयींची एक अन्वर्यक कथा सांगून हा अध्याय समाप्त करूं या.

---


## लहान मुलाच्या आंकडीवर

### जुनें आणि प्रसिद्ध औषध

✻✻✻

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

**कांचनलाल वाडीलाल कं.** — दवाबझार, मुंबई २.

# संतसमागम गोड

शेगांवचे श्रीगजानन महाराज बाबांचे समकालीन. बाबांच्या अगोदर आठ वर्षे त्यांनी आपलें अवतार-कार्य संपविलें. शेगांवात त्यांचें वास्तव्य होतें, तरी वऱ्हाडांत सर्व ठिकाणीं त्यांचा संचार होत असे. ते महान योगी होते. ते भक्त कल्पद्रुम असून आपल्या संकट ग्रस्त भक्तांच्या हांकेला क्षणाचाही विलंब न लावतां धावून जात असत. विदर्भ व मध्य प्रातांत त्यांचे अनेक भक्त आहेत आणि त्यांच्या सेवेचा लाभ मिळालेली कांहीं मंडळी अद्यापिही विद्यमान आहेत. ते समर्थांचे अवतार होते. त्यांच्या दर्शनास येणाऱ्या सर्वांना त्यांनीं सु-वाटा दाखविल्या. निर्याणानंतरही त्यांनीं आपल्या भक्तांना अनेक स्वरूपांत अनेक ठिकाणीं दर्शन दिलें आहे. अद्यापिही त्यांचा साक्षात्कार होत असतो. त्यांनीं अनेक लीला आणि चमत्कार करून दाखविले. यांचें समग्र वर्णन बाबांचे प्रिय भक्त ह. भ. प. श्रीदासगणूमहाराज यांनीं 'श्रीगजानन विजय' नामक ओवीबद्ध ग्रंथात एकवीस अध्यायांत गुंफलें आहे. हा ग्रंथ फारच रसाळ आणि प्रासादिक आहे. श्रीसमर्थ गजाननांच्या लीलांत आणि चमत्कारांत प्रत्यही भक्तिप्रद उपदेश आणि तद्नुसार मार्गदर्शन आढळून येतें.

## समर्थ स्वरूपीं श्री गजानन

बाळापुरांत बाळकृष्ण नांवाचे एक शुद्ध अंतःकरणाचे, सत्वशील आणि विनम्र गृहस्थ राहत असत. ते रामदासी होते. त्यांच्या कुटुंबाचें नांव पुतळाबाई. त्याही परम भाविक आणि पतिपरायण होत्या. दरवर्षी दासनवमी उत्सवासाठीं बाळकृष्ण पत्निसह पायींच सज्जनगडची वारी करीत. पौष व० ९ मीला ओझ्यासाठीं एक घोडें कंथाकुबडी दासबोध आणि कांतेला बरोबर घेऊन बाळकृष्ण बाळापूर सोडीत. रामनामाचा गजर व भजन करीत त्यांनीं मार्ग आक्रमावा आणि त्या पतिव्रतेनें झांज वाजवून त्यांना साथ करावी. वाटेंत मुक्कामाच्या ठिकाणीं ते भिक्षा मागत आणि प्रभूरामचंद्रास नैवेद्य करीत. शेगांव, खामगांव मेहेकर मार्गानें जावून जालनापूरीं तें आनंदस्वामीस वंदन करीत. जांबेस तीन रात्रीं त्यांचा मुक्काम असे. अशारीतीनें वाटेंतील पवित्र स्थानांचें दर्शन घेत घेत ते माघ वद्य प्रतिपदेला सज्जनगडावर येऊन पोचत.

ते खरेंखुरे रामदासी होते. श्रीस्वामीसमर्थां कारणें यथाशक्तीप्रमाणें त्यांनीं ब्राह्मण भोजन घालावें आणि द्वादशीला उत्सव संपतांच गड उतरून आल्या मार्गानें परतावें. असा हा क्रम त्यांच्या वयाला साठ वर्षें पूर्ण होईपर्यंत अखंडित चालला होता. असो. वद्य एकादशीला समर्थ समाधीपाशीं ते बसले असतां त्यांच्या नेत्रांतून अश्रू धारा वाहू लागून त्यांचें हृदय भरून आलें. ते म्हणाले, गुरुराया, स्वामी समर्था, शरीर आतां थकत चाललें आहे. ह्यापुढें पायीं वारी होईल असें वाटत नाहीं. वाहनानें यावें तरी तेंही कठीणच. आजवर नेम चालला आहे; त्यांत अंतर पडूं पहात आहे. परमार्थासाठीं शरीर निक्षेप पाहिजे.

म्हणून गुरुमाऊली, जें कांहीं घडत आहे तें सांगण्याची जरूरी नाहीं. आपण सर्व जाणतच आहांत." अशी अंतःकरण पूर्वक प्रार्थना करून बाळकृष्ण झोपावयास गेले. पहांटेच्या सुमारास त्यांना एक स्वप्न पडलें. समर्थांनीं स्वप्नांत येऊन त्यांना सांगितलें, "अरे! असा हताश होऊ नकोस. यापुढें उत्सवासाठीं खास सज्जन गडास येण्याची आवश्यकता नाहीं. माझी तुजवर पूर्ण कृपा आहे. माझा उत्सव बाळापूरास कर. मी नवमीला येऊन तुला दर्शन देईन. हे माझें वचन प्रमाण मान. आपल्या शक्तीप्रमाणें परमार्थ आचरावा."

## समर्थांची मार्गप्रतिक्षा

दुसऱ्या वर्षी बाळापुरास आपल्या घरीं बाळकृष्णानीं उत्सवास सुरवात केली. दासबोधाचें वाचन, दुपारीं ब्राह्मण भोजन, अस्तमानाला धूपारती आणि रात्रौ हरिकीर्तन असा उत्सवाचा कार्यक्रम होता. गांवकऱ्यांनींहि आपापसांत वर्गणी जमवून उत्सवसमारंभास मदत केली. समर्थ कसे येतात पाहूं या असें बाळकृष्णांना सारखे वाटत होतें.

नवमीला दोन प्रहरीं मात्र एक अघटित गोष्ट घडून आली. बाळकृष्णांच्या घरांत रामाभिषेक चालला होता, इतक्यांत साक्षात्कारी श्रीगजानन तेथें पातले. लोक बुवांस म्हणाले, "उठा, उठा, श्रीगजानन महाराज तुमच्या दासनवमीसाठीं आले आहेत." बुवांनीं उत्तर दिले, "बरे झालें, महाराज आले. संतचरण माझ्या घराला लागले. पण आज मी त्या सज्जन गडवासी समर्थांची वाट पाहत आहे. ते आज येणार असा त्यांनीं मजबरोबर करार केला आहे. त्यांची वाणी असत्य केव्हांही ठरणार नाहीं."

इकडे बुवांच्या दारांत उभें राहून श्रीगजानन स्वामीनीं मोठ्यानें पुकार केला. "जय जय रघुवीर समर्थ!" आणि ते पुढील श्लोक बोलूं लागले.

> अहिल्या शिळा राघवें मुक्त केली ।
> पदीं लागतां दिव्य होऊनि गेली ॥

ही वाणी ऐकतांच बुवा दारांत येऊन पाहतात तों श्रीगजाननाची स्वानंदांत निमग्न असलेली अजानबाहू दिगंबर मूर्ति त्यांना दिसली. नमस्कार करण्यासाठीं बुवा पुढें गेले तों त्यांना समर्थ रामदासस्वामी दिसले. हातांत कुबडी, जटाभार मानेवर रुळत आहे, भाळीं गोपीचंदनाचा उभा त्रिपुंड असून हुर्मुजी कौपीन धारण केली आहे. त्याचें हें रुप दृष्टीस पडतांच बाळकृष्णांस आनंदाचें भरतें आलें आणि त्यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंचा पूर वाहूं लागला. सर्वेच दिसती गजानन. हताश होऊन पुन्हां त्यांनीं पाहवें तो समर्थ दृष्टीस पडावेत. बुवा मनांत घोटाळले. हें कोडें त्यांना कांहीं उमगेना. तोंच दयाघन श्रीगजानन प्रेमानें त्यांस म्हणतातः—

> नको गांगरू देऊं मन । तुझा समर्थ मीच असे ॥ १२७ ॥
> मागें बापा गडावरी । माझीच वस्ती होती खरी ॥
> आतां शेगांवाभितरीं । राहीलों येऊन मळ्यांत ॥ १२८ ॥

तुला सज्जनगडीं दिलें वचन । कीं दास नवमीस येईन ॥
मी बाळापुरा लागून । त्याचें स्मरण आहे कां ? ॥ १३९ ॥

त्या वचनाची पूर्तता । करण्यास येथें आलों आतां ॥
दे सोडोन अवघी चिंता । मीच आहे रामदास ॥ १४० ॥

शरीररुपीं वस्त्रास । तूं किंमत देतोस ? ॥
आणि आत्म्याला विसरतोस । याला काय म्हणावें ॥ १४१ ॥

श्लोक आहे गीते ठायीं । 'वासांसि जीर्णानि' तो पाही ॥
ऐसा मुळीं ना भ्रमिष्ट होई । चाल पाटीं बसवी मला ॥ १४२ ॥

असो, महाराजांनीं बुवांचा हात धरून त्यांनीं गृहांत प्रवेश केला आणि ते एका मोठ्या पाटावर आसनस्थ झाले. महाराज आल्याची गांवांत सर्वत्र बातमी पसरली. महाराजांच्या दर्शनासाठीं मंडळी बुवांच्या घराकडे झुंडीनें धावूं लागली. रामदासी बुवा मात्र सर्व दिवसभर संभ्रमांत होते. रात्रौ तिसऱ्या प्रहरीं त्यांना स्वप्न पडलें.

अरे गजानन माझीच मूर्ति । हल्लीं तुमच्या वऱ्हाड प्रांतीं ॥
संशय मुळीं ना धरीं चित्तीं । तो धरितां बुडशील ॥ १४६ ॥

मी तोच समजून । करी गजाननाचें पूजन ॥
गीतेचें हें आहे वचन । 'संशयात्मा विनश्यति" ॥ १४७ ॥

ऐसें स्वप्न पडल्यावरी । बाळकृष्ण तोषला भारी ॥
मस्तक ठेविलें अत्यादरी । गजाननाचे पायांवर ॥ १४८ ॥

महाराज आपुली लीला । मी ना समर्थ जाणण्याला ॥
तो घोटाळा उकलिला । तुम्ही स्वप्न देऊन ॥ १४९ ॥

नवमी माझी सांग झाली । न्यूनता न कांहीं उरली ॥
अर्भकावरी कृपा केली । तेणें धन्य झालों मी ॥ १५० ॥

आतां कांहीं दिवस । राहा या बाळापूरास ॥
हीच आहे मनीं आस । ती पूर्ण करा हो ॥ १५१ ॥

महाराज म्हणाले त्यावर । ऐक माझा विचार ॥
कांहीं दिवस गेल्यावर । येईन मी बाळापूरा ॥ १५२ ॥

भोजनोत्तर निघून गेले । स्वामी शेगांवासी भले ॥
रस्त्यानें न कोणा दिसले । क्षणांत पोंचले शेगांवीं ॥ १५३ ॥

# प्रभु श्रीरामचंद्राचें अवतार स्वरूप व रहस्य

( लेखक : श्री. मोरेश्वर वासुदेव लिमये ऊर्फ श्री अवधूतस्वामी )

परित्राणाय साधूनाम् विनाशायच दुष्कृताम् ।
धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे ॥

पृथ्वीवर जेव्हां जेव्हां धर्माचा ऱ्हास होऊन अधर्म वाढतो व परमेश्वराच्या भक्तांचा व साधुसज्जनांचा छळ होतो तेव्हां तेव्हां परमेश्वर मनुष्य देहानें पृथ्वीवर अवतार धारण करून आपल्या दिव्य तेजानें व पराक्रमानें अधर्माचा नाश करतो व आपल्या वैराग्यानें, व आदर्श धर्मचारित्र्यानें व सत्यबोधानें जगाला सत्य धर्माचें ज्ञान देतो. त्यामुळें पुनः जगांत धर्माची वृद्धि होऊन शांतता नांदते व प्रजा सुखी होते. चार युगांत मिळून परमेश्वराचे असे दहा अवतार होतात, व एरवीं धर्म रक्षणाचें कार्य परमेश्वर ऋषिमुनी व साधुसंतांच्या रुपानें अवतार धारण करून करीतच असतो. ही ऋषिमुनींची व साधुसंतांची परंपरा जगाच्या सुरवातीपासून गुरु–शिष्य रुपानें अखंड चालू असते व या परंपरेंतच सर्व अवतारी पुरुष निर्माण होतात. अशा तऱ्हेचे अवतारी पुरुष प्रगट होण्याला जगांत कांहींतरी निमित्त घडत असतें. तें म्हणजे, दुष्ट व अधर्मी लोक बलवान होऊन प्रजेचा छळ करतात तेव्हां साधुसंतांच्या प्रेरणेवरून सर्व लोक परमेश्वराची करुणा भाकतात, तपश्चर्यावान व द्रष्टे असे ऋषिमुनि अशा अवतार जन्मांचे रहस्य जाणतात व लोकांना आपल्या ज्ञानानें अभय देऊन परमेश्वर अवतार घेण्याबद्दलची आनंदाची भविष्यवाणी प्रगट करतात.

## रामायणाचा कर्ता

द्वापार युगामध्यें अशा तऱ्हेचा दिव्य व अद्‌भुत अवतार परमेश्वरानें रघुकुलांत दशरथ राजाच्या पोटीं प्रभु रामचंद्राच्या रुपानें घेतला. त्या अगोदर रावणादि राक्षस बलवान होऊन त्यांनीं ऋषिमुनींचा व त्यांच्या धर्म कार्यांचा नाश करण्याचे सारखे प्रयत्न चालू ठेवले होते. श्रीविष्णू हे धर्माचें व ऋषिमुनींचें दैवत आहे हें जाणून त्यांनीं श्रीविष्णूच्या भक्तांचा छळ करून सत्य भक्तिचा लोप करण्यास सुरवात केली. सर्व ऋषिमुनि व सत्वशील प्रजा हवालदील होऊन ते परमेश्वराची करुणा भाकीत होते. याच वेळीं वाल्मिकी महामुनि प्रगट झाले. पवित्र ब्राह्मणकुलांत जन्माला येऊन दैवाच्या आघातानें व वाईट संगतीनें वाल्या कोळी बनला व त्यानें वाटमारीचा धंदा सुरूं केला. पण श्रीनारदांच्या सत्संगामुळें त्याला पश्चाताप होऊन श्रीनारदानी दिलेला 'राममंत्राचा' त्यानें स्वीकार करून पुष्कळ वर्षें तपश्चर्या केली. त्यामुळें त्याच्या चित्ताची शुद्धि होऊन त्याच्या अंतःकरणांत श्रीसद्‌गुरु कृपेनें पुढें प्रभु रामचंद्राचें दिव्य अवतारचरित्र प्रगट झालें व त्यानें 'रामायणाचें' महाकाव्य लिहून ठेवलें. सर्व ऋषिमुनींनीं त्या रामायणाचा

आनंदानें स्वीकार केला व सर्व लोकांना आश्वासन दिलें कीं ‘ लवकरच परमेश्वर अवतार घेऊन आपलें रक्षण करील व आपलें दिव्य चरित्र आम्हांला दाखवील.’

## निरीच्छ व निरहंकारी

लवकरच दशरथ राजाच्या पोटीं परमेश्वरानें प्रभु रामचंद्राचा आपल्या लक्ष्मणादि तीन बंधूसह अवतार धारण केला. तो परमात्मा मनुष्य देहानें प्रगट होऊन सुद्धां पूर्ण निरहंकारी, अत्यंत शुद्ध, व वैराग्यशाली होता. बालवयापासूनच तो बाह्य विषय भोगांपासून अलिप्त, जगाबद्दल उदासीन व आपल्या आत्मस्वरुपांत दंग असे. त्याच्या या वृत्तिमुळें राक्षसांचा वध करून अधर्माचा नाश करण्यास व सर्व प्रजेचें रक्षण करण्यास हा कसा प्रवृत्त होईल ही काळजी सर्व ऋषिमुनींनां पडली. तेव्हां श्रीवसिष्ठ महामुनींनी त्याला श्रीसद्गुरुरूपानें आत्मबोधाचें ज्ञान देऊन त्याच्या अवतार कार्याची त्याला जाणीव करून दिली व श्रीविश्वामित्र महर्षिंनीं त्याला सर्व अरिष्टनाशक मंत्रांचें व युद्धांतील अस्त्रांचे ज्ञान करून दिलें. इतकेंही करून प्रभू रामचंद्र आपल्या अवतार कार्याबद्दल पूर्ण निरिच्छ व निरहंकारी होता हेंच त्याच्या अवताराचें रहस्य आहे. श्रीविश्वामित्रानीं त्याला आपल्याबरोबर नेऊन जें जें त्याला करावयास सांगितलें तें तें त्यानें केलें. ऋषींचे यज्ञ भ्रष्ट करणाऱ्या राक्षसांचे वध, अहिल्येचा उद्धार, जनकराजसभेंत शिवधनुष्य भंग, सीतास्वयंवर, या सर्व गोष्टी काळाच्या ओघानें त्याच्या चरित्रांत आल्या व त्यानें केल्या. अमुक मी करावें किंवा अमुक मला करावयाचें आहे असें तो महात्मा जाणीवेनें कधींच बोलला नाहीं. आपण परमात्म्याचे अंश आहोंत व आपल्याकडून परमात्म्याचें अवतार कार्यच घडावयाचें आहे हीच त्याच्या ठिकाणीं जाणीव होती व म्हणून सर्व परिस्थितींत प्राप्त झालेलें कर्तव्यकर्म करावयाचें एवढेंच त्याला ठाऊक होतें. त्याला राज्यावर बसवावयाचें दशरथानें ठरविलें तरी त्याची तयारी होती. त्यानें वनवासाला जावें असें ठरलें तरीही तो आनंदानें तयार झाला. ज्यांनीं त्याला वनवासाला पाठविलें त्यांचा त्याने राग किंवा द्वेष केला नाहीं. ज्यानीं त्यांच्यावर प्रेम केलें त्यांची आसक्ति धरली नाहीं. सीता व लक्ष्मण त्याच्याबरोबर वनवासाला आपल्या हट्टाने गेली. कोणी बरोबर आले नसतें तरी तो एकटाच वनवासाला गेला असता.

## जगाच्या कल्याणासाठीं अवतार

वनवासांत असतांनां श्रीराम आपला रोजचा दिनक्रम एकाद्या तपश्चर्यावान ऋषीप्रमाणें घालवीत असे. वनांतून जातानां ज्या ज्या ऋषींचे आश्रम भेटले त्यांचे त्याने आशिर्वाद घेतले. ज्या ज्या राक्षसानीं त्याच्यावर आघात केला त्यांचा त्यानें कर्तव्य म्हणून आत्मरक्षणासाठीं व किंवा लक्ष्मणाच्या व सीतेच्या रक्षणासाठीं वध केला. शबरी, हनुमान, सुग्रीव बिभीषण हे त्याला भक्त म्हणून शरण गेले. त्यांच्याबद्दल आपलें परमेश्वराचे कर्तव्य म्हणून त्यांचे रक्षण केलें. सुग्रीवाच्या व धर्माच्याच रक्षणासाठीं वालीचा वध केला. रावणानें सीता हरण केली तिला सोडवून आणण्याच्या कर्तव्यासाठीं लंकेवर स्वारी करून रावणांचा व इतर राक्षसांचा नाश त्यानें केला. व ऋषिमुनींनां रक्षण

दिलें, व जेव्हां शेवटीं चवदा वर्षें वनवास संपून अयोध्येंत पुनः राज्यावर बसायची पाळी आली तेव्हां त्याचाही त्याने आनंदानें स्वीकार केला. आपला बंधु भरत यानें राज्यावर बसून राज्य चालविलें असतें तरी त्याचें त्याला कांहींच वाटलें नसतें. अयोध्येचा 'राजाराम' झाल्यावर त्यानें देह असेपर्यंत सर्व प्रजेचे धर्मानें, न्यायानें व सत्याने रक्षण करून त्यांना पूर्ण सुखी केलें. आपलें अवतारकार्य संपलें आहे याची जाणीव झाल्याबरोबर तो परमात्मा भूलोकांतील मायिक देहासहें आपल्या स्वरुपांत विलीन झाला. अशा तऱ्हेनें आपल्या आदर्श चारित्र्यानें व दिव्य तेजानें त्या प्रभूनें सर्व दुष्टांचा व अधर्मियांच्या अहंकाराचा नाश केला व आपल्या भक्तांनीं व भूलोकांतील सर्व प्रजेला संसारिक व अध्यात्मिक जीवनाचे धडे घालून दिले. या दुःखमय संसारांत तो प्रभू नेहमींच आनंदी होता. सर्व लोक काळाच्या भयाने व्याप्त झाले असतां तो पूर्ण निर्भय होता. अधर्मांच्या संगतीनें सर्व जग धर्मापासून व सत्यापासून च्युत होत असतां तो धर्मनिष्ठ व तत्त्वनिष्ठ राहिला. सर्व प्रजा मानवी देहाच्या आहारीं जाऊन ऐश्वर्य व विषय लोलुप असतांना तो पूर्ण वैराग्यशाली राहिला. सर्व लोक तपश्चर्याहीन व म्हणून दुर्बल झाले असतां तो तपश्चर्यावान् व पराक्रमी झाला. द्वेष मत्सरानें युक्त असलेल्या जगांत त्यानें आपल्या शांत व प्रेमळ आचरणानें सर्वांचे प्रेम व आदर ही संपादन केलीं. असा हा प्रभू रामचंद्राचा दिव्य अवतार द्वापार युगांत जगाच्या कल्याणासाठीं होऊन गेला. पण त्याचें ज्ञान भक्ति व प्रेम मात्र साधुसंतांच्या द्वारा जगांत नेहमींच प्रगट आहे. त्यामुळें त्या प्रभूचें अस्तित्व जगांत नेहमींच आहे असा त्यांच्या भक्तांना अनुभव येतो.

**झालें रामराज्य—**

प्रभू श्रीरामचंद्राचा मानवी अवतार होण्याच्या आधींच त्यांचा आध्यात्मिक अवतार श्रीनारद सद्गुरूच्या कृपेनें श्रीवाल्मिकी ऋषींच्या हृदयांत प्रगट झाला. त्याप्रमाणें जे मुमुक्षु या ससारांत श्रीसद्गुरुला शरण जातात व त्याच्याकडून राममंत्र प्राप्त करून घेतात त्यानाहीं त्या राममंत्राच्या एकनिष्ठ जपाने व श्रीसद्गुरुकृपेने श्रीरामाचें आध्यात्मिक स्वरूप प्राप्त होतें. दहा इंद्रियानीं संसारांत वावरणारा जीव हाच 'दशरथ' त्यानें तपश्चर्या केली, ऋषिमुनींचे आशिर्वाद घेतले तेव्हां त्याच्यापोटी 'राम' आला, म्हणजे रामाच्या भक्तीची आवड उत्पन्न झाली. त्या रामाच्या भक्तिमुळें श्रीसद्गुरुला शरण जाण्याची बुद्धि झाली व श्रीसद्गुरुनी जीवात्म्याला त्याच्या रामस्वरूपाची ओळख होण्यासाठीं राममंत्राचा जप व कामक्रोधादि षड्रिपु मारण्यासाठीं आत्मबोध दिला. असा हा जीवात्म्याचा परमात्मस्वरूपाला जाण्याचा भक्तिमार्ग सुरू झाला. तेव्हां संसाराचे आघात होऊन वनवासासारखी स्थिति झाली. या वनवासांत सीता म्हणजे देह व लक्ष्मण म्हणजे मन ही बरोबर असतात म्हणजे देहानें व मनाने एकनिष्ठ भक्ति घडते. याच वनवासांत साधुसंताचे आशिर्वाद मिळतात व कामक्रोधादि राक्षसांचा वध होतो. शेवटी ज्या जीवदशेच्या अहंकारामुळें देहरूपी सीता हरण केली जाते म्हणजे भक्तिमार्गापासून च्युत होते तो दहा इन्द्रियाचा अहंकाररूपी दशानन रावण नाश पावतो. वासनारूपी

# खडतर तपश्चर्येची अद्भुत कहाणी

## श्रीदत्तभक्त निरंजन रघुनाथ यांचें आत्मवृत्त

निरंजन रघुनाथ हे एक थोर दत्तोपासक होते व त्यांनीं आपलें आत्मचरित्र लिहिलें असून तें फार हृदयंगम आहे.

निरंजन रघुनाथांचें मूळ नांव अवधूत. कौशिक गोत्री आश्वलायन शाखीय देशस्थ ब्राह्मण. मातेचें नांव लक्ष्मी आणि पित्याचें नांव श्रीधरपंत. श्रीधरपंत कळंब गांवचे कुळकर्णी होते. निरंजन रघुनाथांचा जन्म कळंब येथें कार्तिक शु० ८ श १७०४ या दिवशीं पंच पंच उषःकालीं झाला. माहूरची रेणुका ही त्यांची कुलस्वामिनी. घरची परिस्थिति गरीबीची असल्यामुळें नोकरीनिमित्त ते पुण्यास आले. तेथें नष्टे या नांवाच्या हुंडेकराकडे कारभारी म्हणून ते नोकरीस लागले. या पुण्याच्या निवासांतच त्यांच्या विरक्तीचा उदय झाला. पुण्यांत विष्णुमंदिरांत ठाकुरदास-बाबांची हृदयस्पर्शी कीर्तनें ऐकून निरंजन रघुनाथांची वृत्ति पालटली. ते बाबांच्याजवळ गेले आणि आपलें प्रवृत्त्यंतर त्यांना निवेदन केलें. तें ऐकून ठाकुरदास म्हणाले, ‘ तूं होशील रे नारायण ! ’ ते शब्द शुभशकुनासारखे कानीं सांठवून निरंजन रघुनाथ मंदिराबाहेर पडले, परंतु मुक्कामावर गेले नाहींत. एका वाण्याच्या घरीं रात्र काढून दुसऱ्या दिवशीं पुण्याबाहेर पडले आणि चिंचवड मार्गें देहूस गेले. देहूस आल्याबरोबर तुकोबांच्या स्मरणानें त्यांची वृत्ति भारावून गेली. मनाची विरक्ति अधिकच वाढली. इंद्रायणीच्या पात्रांत स्नान करीत असतांना त्यांनीं प्रतिज्ञा केली.

---

“ लंका ’ जळून खाक होते. ‘सीतेची’ म्हणजे देहाची शुद्धि होते. व जीवात्मा रामस्वरूपांत विलीन होतो म्हणजे युद्ध नाहीं अशा शांत अयोध्या नगरीत रामराज्याची स्थापना करतो. परमात्मस्वरुपाची प्राप्ती सर्व भगवद्भक्तांना व साधुसंतांना श्रीसद्गुरुच्या भक्तिमार्गानें झाली. आणि त्यानीं आपले अनुभव आपल्या ग्रंथांच्या द्वारा जगाच्या कल्याणासाठीं निवेदन केले. ‘ तूं का राम ’ झालेल्या तुकारामाना, ‘ झालें रामराज्य काय उणे आम्हांसी ’ ही अंतर्बाह्य परमात्मस्वरूपाची ओळख पटली आणि त्याच परमात्म स्वरूपांत ते विलीन झाले.

असें हें श्रीप्रभूरामचंद्राच्या अवताराचें रहस्य आहे. माझे परमप्रिय श्रीसद्गुरु गजानन महाराज यांनीं आम्हांला हें सांगितलें व पटवून दिलें. तेंच मुमुक्षु जनापुढें प्रेमानें प्रगट केलें आहे. त्याचा सर्वांनीं स्वीकार करावा व सत्य भक्तिमार्गाचें अवलंबन करून आपल्या जन्माचें सार्थक करावें अशी त्या परमात्मस्वरूप प्रभूरामचंद्राच्या चरणीं नम्र प्रार्थना आहे.

---

मग करसंपुटीं जल घेऊन । सोडिलें संकल्पा लागून ।
जीव भाव मन प्राण । गुरु-अर्पण केलासे ॥
हृदयीं ठेविला नेम करून । आजपासून द्वादश महिने ।
उपरि सात दिन जाण । देह धारण करणें हा ॥
मजला दत्तात्रय दर्शन । झालीया ठेवीन हा प्राण ।
नाहीं तरी देह अर्पण । केला असे गुरुपायीं ॥

तुकोबांच्या साक्षीनें हा संकल्प केल्यावर त्यांनीं कौपीन धारण केली आणि

काढिली लज्जेची गवसणी । निर्लज्ज शस्त्र हातीं घेऊनि ।
त्याचि ग्रामांत जाऊनी । भिक्षाटण पै केलें ॥

साधनेच्या वाटेवर पहिलें पाऊल टाकलें आणि पुढील वाटचाल सुरू झाली. मुखीं दत्तनामाचें चिंतन सुरू होतें. तीन दिवस अन्न पाण्यावांचून कांट्याकुट्यांतून आणि डोंगर दऱ्यांतून वाट तुडवीत ते 'घोडनगरी' येथें आले. तेथें भिकोबा नांवाच्या सत्पुरुषाकडे राहिले. त्यांनीं दिलेली एक गोधडी आणि नरोटी घेऊन पुढें ब्राह्मणवाड्यास आले. तेथें एका कानफाट्याच्या मठांत राहिले. निरंजनांचा निग्रह समजल्यावर त्या कानफाट्यानें त्यांना गिरनारवर जावयास सांगितलें. त्यानंतर ते जुन्नरास येऊन ठाकूरमंदिरांत थांबले. मंदिरांतील बैराग्यांनीं त्यांचा उपहास सुरू केला. येथें कुशाबा नामक एका बालोन्मत्त पिशाश्चवत् सत्पुरुषाचें दर्शन घेऊन ते कोहूळहून अकुल या गांवीं आले. तेथे चंडीदास बुवा नांवाचे संस्कृतज्ञ सत्प्रवृत्त गृहस्थ होते. त्यांचें एकादशस्कंधावर पुराण ऐकून निरंजनांची दत्तदर्शनाची ओढ अधिकच वाढली. तेथेंच कार्तिक शु. ९ श. १७३३ ( प्रजापति संवत्सर ) या दिवशीं त्यांचें सगुणध्यान सफल होऊन त्यांना श्रीदत्तात्रेयांचा स्वप्नसाक्षात्कार झाला.

हृदयांतरी करितों ध्यान । हें देहीं गेलों विसरून
तेथिंचा आनंद पाहून । वृत्ति शून्य पै झाली ।
ऐसें एक घटिकापर्यंत । वाटे पाहतों स्वप्नांत ।
जे कां रचना मूर्तिमंत । मनोमय योजिली ॥
ऐसें पाहतां तेचि वेळीं । कर्मरेषा विचित्र बळी ॥
दत्तात्रय मूर्ति हृदयकमळीं । मातें जाली बोलती ।
तेथें मनाची मूर्ति सान । ते श्रीगुरूनीं हृदयीं आलिंगून ।
मुखासी लावून माझा कान । मंत्र झाले बोलती ॥

अंकुलास असतांना त्यांच्यावर एक विलक्षण संकट आलें. एका तरुण मुलीचा पति तिला सोडून निघून गेला होता. निरंजन रघुनाथांकडे पाहून, रूपसाम्यामुळें तिनें आईबापांस सांगितलें कीं, 'माझा नवरा जोगडा बनून आला आहे!' या संकटांतून सुटतां सुटतां त्यांची त्रेधा उडाली. त्यांनीं कळवळून आपलें पूर्ववृत्त विवेदून सुटका करून घेतली. तेथून ते सिन्नरास आले. तेथें अग्निकुंडावर स्नान करून देपुरास गेले.

तेथें बाबाजी भागवत या आतिथ्यशील गृहस्थांकडे आठ दिवस राहून व शिंद्यास बाळक-रामबाबा नांवाच्या सत्पुरुषाचें दर्शन घेऊन त्यांनीं नाशिक गांठलें. येथेंच त्यांना गुरुलाभ झाला. रघुनाथस्वामी नायक सत्पुरुषानें त्यांना गुरुबोध दिला आणि त्यांच्या उत्कट भावनेला ज्ञानाची दृष्टि दिली.

श० १७३३ मध्यें कार्तिकांतील अमावास्येच्या रात्रीं निरंजनांच्या हृदयांत बोधाची पूर्णीमा उजळली. त्यानंतर श्रीसद्गुरूंनीं त्यांना योगांतील अनेक रहस्यें आणि परमार्थांतील अनेक क्षणानुभव यांचा प्रत्यय आणून दिला. त्यानंतर गुरुमठांत दत्तजयंतीचा सोहळा साजरा करून आणि गंगातीरावर आपल्या आत्मवृत्ताचा पूर्वार्ध शुद्ध शुद्ध करून त्यांनीं गिरनारचें प्रस्थान ठेविलें. नाशकास त्यांचा मुक्काम दीड महिना होता. ज्यानें हृदयांत बोधाचें अखंड चांदणें निर्माण केलें, त्या सद्गुरूचा निरोप घेतांना निरजनांचे हृदय विकल झालें !

मस्तकीं वंदिली चरणधुली । रोमांच उठिले तये वेळीं ।
आसुवें आलीं नेत्रकमळीं । बाष्प कंठीं दाटला ॥
स्फुंद स्फुंद करी रुदन । गुरूमुखातें अवलोकून ।
वाटे केव्हां होईल येणें । गुरूचरणाजवळिकें ॥

सद्गुरूचा आशीर्वाद घेऊन निरंजन निघाले. नाशिकाहून ते त्र्यंबकेश्वरी आले. तेथें त्र्यंबकेश्वराचें दर्शन घेऊन आणि ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा करून तीन दिवस गांवांत काढले. तेथें असतांनाच सद्गुरुचें एक परमार्थपथप्रदर्शक पत्र आलें.

त्यानंतर अनेक हाल–अपेष्टा सहन करीत, निर्जन प्रदेश रात्रंदिवस तुडवीत आणि वाटेत भलेबुरे अनेक अनुभव पदरीं बांधीत ते कोंकण ओलांडून गुजराथेंत शिरले. धर्मपूर या राजधानीच्या ठिकाणीं ते सात दिवस राहिले. येथील मुक्काम संपत आल्यावर नाशिककडे जाणाऱ्या एका ब्राह्मणाकरवीं त्यांनीं आपल्या गुरुदेवांना एक भावनामय पत्र दिलें. त्यानंतर ते सुरतेला गेले. तेथून बडोद्याला गेले. तेथें राममंदिरांत एक पूर्णप्रज्ञ आणि प्रतितिसंपन्न संन्यासी होते. त्यांचा आशिर्वाद घेऊन ते ढवलकें येथें गेलें. तेथें रुद्राक्षाकार शिवलिंगाचें दर्शन घेऊन त्यांनीं पुढील वाटचाल सुरू केली. गुजराथ टाकून काठेवाडांत प्रवेश केला.

अखेर गिरनार दृष्टीच्या टप्प्यांत आला. दहा योजनें अंतरावरून गिरनारचे शिखर दिसूं लागलें. गुरोपदेशिलेल्या सगुणध्यानाचा क्रम तीन महिने चालला होता. त्या ध्यानाला 'ध्येयदर्शना'चें फळ पुन्हां एकदां उत्कट स्वरुपांत लाभलें. जुनागड आदि ठिकाणें ओलांडून ते शेवटीं गिरनारावर आलें, पर्वतावरील सर्व पवित्र स्थानें पाहून त्यांनीं गिरिप्रदक्षिणा केली. परंतु ते स्वप्नांतील ध्यान कांहीं गोचर होईना. मनांतील विकलता सारखी वाढत होती. तशाच अवस्थेंत द्वारकेला जाऊन ते पुन्हां गिरनारवर आले. संकल्पाची मुदत संपत आली होती. ते निग्रहानें शिखरावर गेले. आणि दत्तात्रेयाच्या पादुकांजवळ त्यांनीं धरणें धरलें. तीन दिवस अन्नपाण्यावाचून काढले. उपवासानें गात्रें क्षीण होऊन गेलीं होतीं. इतकें होऊनही दत्तदर्शन होत नाहीं.

असें दिसल्यावर त्यांनीं एक भला मोठा पाषाण आणला आणि तो दत्तपादुकांजवळ ठेवून गुरु स्मरणपूर्वक त्याच्यावर डोकें आपटून घ्यावयास प्रारंभ केला.

जैसें श्रीफळ देवाप्रती । नवस करूनी फोडिती ।
शकलें वेगळालीं होतीं । क्षण एक न लागतां ॥
तयापरी मस्तक उचलून । पाषाणावरी मारिलें जाण ।
भडभडा रुधिर आंतून । यावयासी लागलें ॥
सर्वोचि त्यापरी दुसऱ्यानें । ताडितां झालों बहुसत्राणें ।
तंव मस्तक होवोनि छिन्नभिन्न । अचेतन पडियेलों ॥
तों इतुकियांत श्रीदत्तात्रय । षड्भुज मूर्ती सावयव ।
ध्यान केलें होतें बरवें । तयापरी प्रगटले ॥

अशा प्रकारें कृतार्थ होऊन आणि दत्तदर्शनाची खूण भाळीं मिरवून निरंजन गिरनारहून खालीं उतरले. हा जीवन सिद्धीचा सोहळा त्यांना भाद्रपद कृ. ११ ( सोमवार ) श. १७२४ या दिवशीं सकाळच्यावेळीं अनुभवावयास मिळाला. त्यानंतर प्रभास आणि सोमवार या तीर्थांचें दर्शन घेऊन ते समुद्र मार्गें मुंबईस आले. आणि तेथून तीन दिवसांत नाशकास गुरुचरणांजवळ येऊन पोंचले. सर्व वृत्त गुरुदेवांना निवेदून त्यांनीं आत्मचरित्राचा उत्तरार्ध नाशीक येथेंच गोदातीरावर कार्तिक शु. ११ श. १७२४ मध्यें पूर्ण केला.

केवळ एका वर्षाच्या अवधींत मुमुक्षुतेपासून मुक्तीपर्यंतची वाट आक्रामिणारा हा परमार्थाचा प्रयासी अजब आहे. निरंजनाचें आत्मचरित्र म्हणजे कठोर साधनेचा एक रोकडा प्रत्यय आहे. हें आत्मचरित्र गुरुदेवाच्या पुनर्भेटीपर्यंत पुरें करून आणि तें गुरुचरणीं अर्पण करून त्यांनीं नाशिक सोडलें. त्यानंतरही त्यांची भ्रमंती थांबली नाहीं. सप्तशृंगी, वळवडें ( कोल्हापूर प्रांत ) या क्रमानें त्यांची स्थलांतरें चालू होतीं. वळवडें येथें त्यांचा निवास असतांना मिरजेचे अधिपति श्रीमंत गंगाधरराव बाळासाहेब पटवर्धन यांच्या कानीं त्यांची कीर्ति गेली आणि त्यांनीं निरंजनांना मिरजेस आणून त्यांचा अनुग्रह घेतला. (श. १७६७)

आत्मचरित्रात्मक दोन प्रकारणांखेरीज निरंजनाची बरीच ग्रंथरचना आहे. 'अनुभवामृत पदबोधिनी', 'आत्मबोध प्रकाशिनी', 'केनोपनिषत्', 'रघुनाथ चरित्र', 'केशव चैतन्य कथाकल्पतरू' हे त्यांचे ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. याशिवाय त्यांनीं अनेक पदपदांतरेंहि केली आहेत. 'अनुभवामृत पदबोधिनी' हीं अमृतानुभवावरील गद्यटीका त्यांच्या प्रज्ञेचें आणि प्रतितीचें प्रत्यंतर घडाविणारी आहे. ही सर्व ग्रंथरचना त्यांनीं जीवनाच्या अखेरच्या दहा वर्षांत मिरजेंत केला आणि भाद्रपद शु. ११ शके १७७७ या दिवशीं कृष्णामाईच्या प्रवाहांत जलसमाधि स्वीकारली.

मिरजेच्या किल्ल्यांत त्यांनीं स्वहस्तें स्थापिलेली एकमुखी षड्भुज दत्ताची मूर्ति आजहि ह्या अनन्य भक्तांच्या खडतर साधनेची कहाणी कौतुकानें उरीं सांठवून उभी आहे.

—संकलीत.

# श्रीरामभक्त गोपाण्णा

पूर्वीच्या गोवळकोंड्याच्या नबाबाच्या राज्यांत नेलाकोंडा नांवाचें एक सुंदर निसर्गरम्य गांव होतें. गांवांत मुख्यत्वेंकरून विद्वान् आणि वेदपाठी त्रिलंगी ब्राह्मणांची वस्ती विशेष होती.

लिंगाण्णा या गांवाचे पुढारी. त्यांचें गोत्र अत्रि. ते एक फार गाढे पंडित असून सात्त्विक वृत्तीचे गृहस्थ होते. त्यांच्या पत्नीचें नांव कमम्बा. त्या सद्गुणी शुद्ध, आचरणाच्या आणि पति परायण होत्या. लिंगण्णा नबाबाचे मंत्री होते. खुद्द नबाबसाहेबांची त्यांच्यावर बहाल मर्जी असे आणि ते त्यांच्या शब्दाला मान देत. त्यांच्या घरून अतिथी केव्हांही विन्मुख गेला, असें कधींच झालें नाहीं व त्यामुळें त्यांच्याकडे नेहमीं साधुसंतांची आणि विद्वानांची ये जा असे.

**रामनामाची आवड**

अशा या सत्वशील दांपत्याच्या पोटीं फार दिवस पुत्रसंतान नव्हतें. संततीसाठीं त्यांनीं श्रीरामप्रभूंची सेवा केली. लवकरच त्यांना एक सुंदर पुत्ररत्न झालें. मुलाचें नांव गोपाण्णा ठेवण्यांत आलें.

गोपाण्णांना लहानपणापासून रामभक्तीचें वेड. ते नेहमीं रामनाम गायनांत गुंग असत. ते कुशाग्र आणि तीव्र बुद्धीचे होते. वडिलांनीं त्यांना संस्कृत आणि तेलगू शिकविलें. वयाच्या पांचव्या वर्षीं ते वाल्मिकी रामायण उत्तम रीतीनें समजूं शकत.

गोपाण्णांना पुस्तकी विद्येचा हव्यास नव्हता. त्यांना सर्वदा रामनाम आवडे. आपण सर्वस्वी त्या श्रीरामप्रभूंचे असून आपले सर्व व्यवहार त्याच्याच कृपेनें होतात, असा त्यांचा दृढ निर्धार होत चालला. ते नेहमीं रामभक्तांच्या शोधांत असत. एके दिवशीं संत कबीर त्यांच्या घराकडून रामनाम संकीर्तन करीत जात असतां गोपाण्णा त्यांच्याकडे एकदम आकर्षिले गेले. कबीरांना देखील गोपाण्णामध्यें एक खरा रामभक्त आढळून आला. गोपाण्णानें त्यांना घरांत बोलावून नेलें आणि त्यांचें पूजन केलें. कबीरांनीं तावडतोब त्यांच्यावर अनुग्रह करून त्यांना रामनामाचा मंत्र दिला. गुरुप्राप्तीमुळें त्यांची भक्ति गोचर होऊन त्यांच्या उत्कट भावनेला ज्ञानाची दृष्टि लाभली आणि त्यांच्या हृदयांत बोधरूपीं चांदणें फुललें. गुरुकृपेनें त्यांचा पुनर्जन्म होऊन त्यांना 'रामदास' असें नामाभिदान मिळालें; पुढें त्यांचा लवकरच विवाह झाला. आत्मज्ञान आणि ईश्वरप्राप्तीच्या आपल्या मार्गांतील सहप्रवासी म्हणून त्यांनीं आपल्या पत्नीचा स्वीकार केला; कारण त्यांचें सर्व जीवन राममय बनलें होतें.

**तहशीलदार बनले**

गोपाण्णांचे चुलते आकाण्णा आणि मापाण्णा हे नबाब तानिशाच्या पदरीं मोठ्या हुद्द्यावर नोकरीस होते. त्यांनीं आपल्या पुतण्यास नबाबासमोर उभे केलें. या हुशार,

तरतरीत, इमानी आणि सरळ हृदयी तरुणाकडे नवाब आकर्षिला गेला. त्यानें गोपाण्णांना भद्राचलमचे तहशीलदार नेमलें; त्यांच्याकडे शासन आणि वसुलीचे सर्व अधिकार सोपविले. नेमणुकीचीं वस्त्रें स्वीकारतांना गोपाण्णा म्हणाले, 'मी रहीममध्यें रामाची सेवा करीन आणि सर्व त्याला अर्पण करीन.' आज्ञा होतांच ते नोकरीवर रुजू होण्यासाठीं भद्राचलमकडे निघाले.

भद्राचलम् येथें येतांच रामदास प्रथम तेथील राममंदिरांत प्रभूदर्शनासाठीं गेले. मंदिराची पडित स्थिति पाहून त्यांचें हृदय कळवळून आले. लवकरच देवालयाचा जीर्णोद्धार करण्याची त्यांनीं ताबडतोब शपथ घेतली.

आपण येथें नबाबाची चाकरी करण्यास आलों नसून श्रीरामप्रभूंनीं आपला दूत म्हणून त्यांच्या भक्तीचा प्रचार करण्यास आपणांस पाठविलें आहे, हीच त्यांची भावना होती; त्याप्रमाणें त्यांनीं कार्यास सुरवात करून त्यांत त्यांना भरपूर यशही लाभलें. लोक रामभजन करूं लागले. या कार्याबरोबरच त्यांनीं गांवांतील शिक्षण, उद्योगधंदे, व्यापार आणि शेतीस उत्तेजन देऊन शक्य ती मदतही केली.

त्यांच्या अमदानींत सुबत्ता आणि शांतता नांदूं लागली. लोक सुखी झाले. ते तत्परतेनें कर आणि सारा देऊं लागले. आणि वेळच्या वेळीं नबाबाच्या खजिन्यांत गांवचा वसूल जमा होऊं लागला. गोपाण्णांची लोकप्रियता उत्तरोत्तर वाढत होती. लोकांचा त्यांच्यावर अढळ विश्वास बसून ते त्यांच्यासाठीं प्राणार्पण करण्यासही एका पायावर तयार होते. सर्वत्र आनंदी आनंद भरून राहिला होता. या सर्वांचा कळस म्हणजे गोपाण्णाना एका पुत्ररत्नाचा लाभ झाला. मुलगा रूपानें आईसारखा होता आणि बुद्धीनें बापाच्या वळणावर गेला होता. गांवांत सर्वांचा तो आवडता होता.

### अघडित घटना

इतक्यांत एक अघटित घटना घडून आली. रामजन्मोत्सव चालू होता. या आनंद प्रसंगी गोपाण्णांचा मुलगा विहिरींत पडून मरण पावला. गोपाण्णानी मुलाचें प्रेत बाहेर काढून देवालयांत रामासमोर आणून ठेवले आणि कळवळून रामाचा धांवा सुरू केला. 'कोदंड रामा, मी अंतःकरणपूर्वक तुझी सेवा करीत असून माझे जीवन सर्वस्वी तुझ्या चरणीं अर्पण केलें असतां मला ही शिक्षा कां बरं! देवा! तुझ्याशिवाय मी कोणाची विनवणी करूं? माझ्या मुलास जीवदान देऊन मजवर कृपा कर.' त्यांच्या नेत्रांतून सारखा अश्रूंचा पूर वाहत होता. सर्व लोक दुःखी झाले होते. इतक्यांत काय चमत्कार झाला पहा! मुलाच्या देहांत चैतन्य आलें. मुलगा उठून उभा राहिला आणि ओरडतच म्हणूं लागला, 'मी रामाचा आहे. रामप्रभूंनीं मला नवजीवन दिलें.' लोकांनीं रामनामाचा गजर केला.

या घटनेनंतर रामदासांच्या वृत्तींत बदल दिसूं लागला. अधिकाधिक प्रभुसेवेची त्याची उत्कंठा वाढूं लागली. जीवन क्षणभंगुर आहे म्हणून श्रीरामचंद्रांचें कांहींतरी

भक्कम कार्य आपल्या हातून घडावें असें त्यांना सारखें वाटूं लागलें आणि राम मंदिराच्या जीर्णोद्धाराकडे त्यांचें लक्ष केंद्रित झालें.

देवालय पुनर्बांधणीचें काम ताबडतोब मोठ्या उत्साहानें सुरू झालें. मंदिराची इमारत, देवांचे पोषाख आणि दागदागिने यावर रामदासांनीं अतोनात खर्च केला. देवाच्या पूजेअर्चेसाठीं त्यांनीं जमिनी तोडून दिल्या. कारागिरांना व कामगारांना त्यांनीं मोठी बिदागी दिली आणि ब्राह्मण व पंडितांना सढळ हातानें दक्षणा वाटण्यांत आली. हा सर्व खर्च सरकारी तिजोरींतून होत आहे याची त्यांना जाणीवच नव्हती. सर्व कांहीं देवासाठीं घडत आहे ही त्यांची भावना. याचा परिणाम व्हायचा तोच झाला. गांवचा वसूल नबाबाच्या खजिन्यांत वेळींच पोचूं शकत नव्हता.

## रामदासास पकडलें !

हिंदूच्या देवालयासाठीं सरकारी पैशांचा व्यय करण्यांत येत आहे, अशी तक्रार गोपाण्णांच्या हितशत्रूंनी नबाबाकडे केली. निरोपावर पाठवूनही वसूलभरती होत नाहीं हे पाहून नबाबानें आपले शिपाई भद्राचलम येथें पाठवून गोपाण्णांना पकडून आणण्याचा त्यांना हुकूम दिला. शिपायांनीं रामदासास गिरफदार केलें. सर्व गांव रडूं लागला. कोणाचेंही कांहीं चालेना. नबाबानें त्यांना दरबारांत आणून त्यांच्या हातापायांत बेड्या ठोकल्या आणि सरकारी पैशाची पै न पै त्यांच्याकडून भरपाई होईपर्यंत रामदासांना अंधारकोठडींत डांबून ठेवण्याचा हुकूम सोडण्यांत आला, इतकें झालें तरी रामदासांची मनःशांति मुळींच ढळली नाहीं. ते रामनामांत निमग्न होते.

श्रीरामचंद्रांनीं आपल्या लाडक्या भक्ताला जाणून बुजून दुःखाच्या खाईत लोटलें! ते आपल्या सेवकाला विसरले नाहींत; आपल्या भक्ताचा मोठेपणा जगाला कळून यावा म्हणूनच त्यांनीं हा सर्व खेळ केला.

आणि यानंतर एक अद्‌भुत चमत्कार घडून आला !

तानीशा नबाब मध्यरात्रीच्या सुमारास आपल्या बेगमेसहित महालांत बसले असतां दोन तेजस्वी पुरुष त्यांच्या समोर उभे राहिले. त्यांचें तें दिव्य तेज पाहून नबाब दिपूनच गेला. त्यानें नम्रपणानें विचारलें, ‘आपण कोण महाराज ?’

ते म्हणाले, ‘आम्ही रामदासांचे दूत असून भद्राचलमहून आलों आहोंत. आम्ही खऱ्या भक्तांचे चाकर. मी राम आणि हा लक्ष्मण. ही घ्या रामदासाकडून येणारी रक्कम पांचपट आहे. पैसे घ्या आणि पावती द्या. रामदासांना मुक्त करा.’

पावती मिळतांच ते दोघे दिव्य पुरुष अंतर्धान पावले. तनाशा ‘आ’ वासून पहातच राहिला. एकदम तो उद्गारला, ‘रामदास खरोखरच तुम्ही एक साधुपुरुष आहांत धन्य, धन्य तुमची !’ धांवतच तो अंधार कोठडीकडे निघाला.

## रामदासांची सुटका

त्यावेळीं रामदास रामभजनांत दंग होते. ते भानावर नव्हते. तानिशानें अंधार

कोठडीच्या दारांत प्रवेश करतांच रामदासांच्या हातांत त्यानें नुकतीच दिलेली पावती पडलेली त्याला दिसली. त्यानें ताबडतोब रामदासांची मुक्तता केली. आपल्या या अचानक सुटकेचें रामदासांना आश्चर्य वाटूं लागलें. तोच नबाब अदबीनें त्यांना म्हणतो, 'हे सत्पुरुषा, तुम्ही माझ्या राज्याची कीर्ति कितीतरी पटीनें वाढविली आहे. राम आणि लक्ष्मणांनीं तुमच्याकडून येणाऱ्या बाकीची पांच पटीनें भरपाई केली आहे. हे सर्व पैसे मी आपल्या भद्राचलमच्या राममंदिरासाठीं देत आहें. मला वाटतें ही रक्कम सत्कार्यासाठीं खर्च होत आहे.'

तानीशा नबाबानें रामदासांना उत्तम पोषाख देऊन त्यांचा अनेकप्रकारें गौरव केला. त्यांना सोन्याच्या पालखींत बसवून सैन्यानिशी वाजत गाजत मोठ्या सन्मानानें भद्राचलम् येथें परत पाठविलें.

लोकांना रामनामाचें महत्त्व कळून चुकलें. रामदासाबद्दलचा त्यांचा आदर द्विगुणित झाला. ते त्यांना संत म्हणूं लागले.

रामदासानीं रामस्वरुपांत विलीन होईपर्यंत आपलें उत्तर आयुष्य प्रभूच्या अखंड भजनांत व संतसेवेंत घालविलें. रामदासांनीं उभारलेलें भद्राचलमचें राममंदिर अद्यापिही आहे. देवालयाच्या गाभाऱ्यांत भक्तांनीं रामदासांचें एक छायाचित्रही ठेवलें आहे. रामदासांनीं केलेलें देवांचे पोषाख आणि दागिने अद्यापपावेतो दृष्टोत्पतीस पडतात. नबाबानें दिलेल्या त्या उदार देणगीमुळें देवाची पूजा अर्चा आणि सर्व सोपस्कार आजतागायत उत्तम रीतीनें होत आहेत.

सर्व कांहीं राम आहे. सर्वत्र रामच भरलेला आहे.


## ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

३६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४

**तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण होलसेल व रिटेलर्स**

# श्रीरामायण व विनोबाजी

**महात्मा गांधींप्रमाणें आचार्य विनोबा भावे यांचा रामायण व त्यांतल्या त्यांत तुळसीदास रामायण हा एक अत्यंत आवडता ग्रंथ आहे. त्यांच्यावर बालपणापासून रामनामाचे संस्कार होत गेले व आज ते परिणितावस्थेला पोहोंचले आहेत. रामायण व रामनाम यांच्यासंबंधीं त्यांच्या संस्कारी मनाला काय वाटत, त्याची पुढील लेखावरून कल्पना करतां येणार आहे.**

**— संपादक**

माझ्या जीवनामध्यें रामायण, वेद, गीता या ग्रंथांनीं फार मोठें स्थान व्यापलें आहे. इतर ग्रंथ नाहींत असें नाहीं. वेद, उपनिषद, गीता, ब्रह्मसूत्र, योगसूत्र, रामायण आणि भागवत यांची रचनाच मुळीं अशी आहे कीं, ज्यामुळें भरतभूमीचा पाया भक्कम बनायला मदत झाली आहे आणि जर कां हा आधार तुटला, तर आमचं घरच मुळीं बिनपायाचं बनेल. ही तुलसीदासांची कृपा म्हटली पाहिजे कीं, त्यांनीं वाल्मिकी रामायणाचं मंथन करून त्यांतून सार आणि अनुभवाची रत्नें बाहेर काढलीं आणि त्यांतून रामरसायनरूपी अमृत चाखायला दिलं. 'वाल्मिकी रामायण' हा आद्यग्रंथ समजला जातो. सूज्ञ लोकांना हें सांगण्याची आवश्यकता नाहीं कीं वाल्मिकीला हा ग्रंथ रचायला प्रेरणा कशी मिळाली ? जोपर्यंत गंगा यमुनेचा प्रवाह चालू आहे तोपर्यंत रामकथेची ही धारा वाहात राहील.

## घरोघर रामायणाचा प्रवेश

समस्त भारत वर्षांमध्यें रामायणाएवढा लोकप्रिय ग्रंथ मिळणं कठीण. तशी 'गीता' काय कमी लोकप्रिय आहे ? परंतु तिला आदरणीय म्हणतां येईल. तत्वज्ञानाच्या रूपानें ती आपल्याला ज्ञानामृत पाजीत असते, परंतु 'रामायण' मात्र अगदीं घरगुती वस्तु होऊन बसलेलं आहे. त्यानं प्रत्येकाच्या घरांत प्रवेश केला आहे आणि ही अगदीं अनुभवसिद्ध गोष्ट आहे.

आपले दोन सख्खे भाऊ असूनहि त्यांच्याविषयीं देखील आपल्याला तेवढी माहिती नसेल जेवढी माहिती आज आपल्याला लक्ष्मण आणि भरताबद्दल आहे. हे दोघेहि आमच्या भावाहूनहि आपल्याला जवळचे वाटतात. अशा प्रकारें लोकजीवनांत ज्या महान् ग्रंथानें प्रवेश केला आहे त्याच्या तोडीचं दुसरं पद्यकाव्य जगांत दुर्लभ होऊन बसलेलं आहे. डांटेने लॅटीनमध्यें, होमरनें ग्रीकमध्यें तर मिल्टननें इंग्रजीमध्यें रचना केली आहे आणि फिरदौसीचा 'शहनामा'तर प्रसिद्धच आहे. याप्रमाणे जगांतील भिन्नभिन्न देशांत भिन्नभिन्न जातींत त्यांचे त्यांचे स्वतःचे ग्रंथ आहेत यांत संशय नाहीं. परंतु ज्या ग्रंथांतील पात्रं आपल्याला हरघडी मदत करतात, आमचे

वाटाडे ठरतात, आम्हांला दिलासा देतात, अशा कोटींतील कथाग्रंथ म्हणजे 'रामायण' होय.

## बायबल व रामायण

बायबलमधे येशू ख्रिस्ताच्या चरित्राची रचनाच अशा आकर्षक भाषेंत केली गेली आहे कीं त्याचा एक वेगळाच परिणाम चित्तावर होऊं शकतो ही गोष्ट अमान्य करून चालणार नाहीं. येशू तर करुणेचा सागर आणि मोठा ब्रह्मज्ञानी होता. करुणाभाव आणि ब्रह्मचर्य या दोहोंचा सुंदर मिलाफ एकाच व्यक्तीमधें झालेला होता. अशा प्रकारचें विलक्षण व्यक्तित्व येशूचें होतें. त्यानें जगाला कारुण्याचे धडे दिले. परंतु रामायण ही एक अशा प्रकारची रचना आहे कीं, ज्यांतील पात्रें घरोघरीं वावरत असून आम्हांवर चांगला परिणाम घडवून आणीत आहेत. सीता, राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न याचा कुटुम्ब जीवनावर सतत परिणाम घडून आलेला आहे. तसा बायबलचा दिसून येत नाहीं. त्याठिकाणी आध्यात्मिक परिणामाकडेच लक्ष दिलं आहे. परंतु ज्यामध्यें या दोन्हींही गोष्टी दिसून येतात असा ग्रंथ रामायणच होय. याचा अर्थ असा कीं, बहीण म्हणजे सीता, आमची आई म्हणजे सीता, आमचा भाऊ कोण म्हणाल तर लक्ष्मण आणि आमचे काका म्हणजे प्रभु रामचंद्रजी, अशा प्रकारें ह्या सर्व व्यक्ति अगदीं आमच्या घरचींच माणसें बनून राहिली आहेत.

वाल्मिकीची प्रतिभा असामान्य होती. त्या प्रतिभेची अद्वितीयता फक्त भारतांतच नाहीं. जगांतील सर्व भाषाचं आम्हीं अध्ययन केलेलं नसलं, दहा—वीसच भाषा आम्हीं जाणूं शकत असलों तरी देखील आम्हीं सांगू शकतों कीं, वाल्मिकीची प्रतिभा साऱ्या जगांत अद्वितीय अशीच आहे. एका ठिकाणीं मी लिहिल देखील आहे कीं, वाल्मिकीची प्रतिभा, व्यासाची प्रज्ञा आणि शुकदेवाचं प्रेम या तीनहि गोष्टी अद्वितीय आहेत. या तिहींचा लाभ भारताला लाभला आहे, ही मोठी भाग्याची गोष्ट होय. वाल्मिकीच्या प्रतिभेनं रामायणाला जन्म दिला. व्यासाच्या प्रज्ञेमुळेंच महाभारत निर्माण झालं, शुकदेवाच्या प्रेमानें भागवताची रचना केली गेली. ही प्रतिभा, ही प्रज्ञा हें प्रेम भारतानीं खास आकर्षणें होऊन बसलेलीं आहेत. ही आपलीच संपत्ति आहे, आपल्याच बापानं कमावलेली जिंदगी आहे तेव्हां त्याचा आम्हीं वाटेल तसा उपयोग करूं शकतों.

## विविध भाषेंतील रामायणें

एकदां याच बाबतींत मी कांहीं बोललों होतो, त्यावेळीं तामिलनाडांत आमची पदयात्रा चालू होती. तेव्हां मी म्हटलं होतं कीं, रामायणांतील कांही गोष्टीं जर चांगल्या वाटत नसतील तर रामायणाची सुधारलेली आवृत्ति प्रसिद्ध करा. त्यावेळीं माझ्या बोलण्याचा मथितार्थ कांही लोकांच्या लक्षांत आला नाहीं आणि त्यांची अशी समजूत झाली कीं, मी जणूं रामायणावर आक्षेपच घेत आहें. प्रसन्न असं रामायण, आनंदायी रामायण, कालिदासाचा रघुवंश, भवभूतीचे उत्तर राम चरित्र, हिंदीमध्यें तुळसी रामायण आहे तर उडियामध्यें बलराम रामायण आहे. कंबनचे तामीळ भाषेंतील रामायण आहेच.

एक तुच्छनचं मल्याळममध्यें, तर एकनाथ मोरोपंतांनीं रामायणाची रचना मराठींत केली आहे. गिरधराचं गुजराती रामायण आहेच. आणि हे सर्व वाचण्याची संधि मला मिळाली. हल्लींच कांहीं दिवसापूर्वी राजाजींनीं देखील एक रामायण लिहिलं असून तें देखील मी वाचून पाहिलं आहे. अशाप्रकारें जिथें जिथें जीं जीं रामायणावरील पुस्तकें आमच्या पहाण्यांत येतात तीं तीं आम्हीं वाचून काढतों. रामकथा पुन्हां पुन्हां वाचण्याची इच्छा होते आणि रामायण पुन्हां पुन्हां वाचण्यांत फार मजा येते. शेवटपर्यंत मनाची तृप्ति म्हणून होत नाहीं. तुलसीदासानें म्हटलंच आहे.

'राम अनंत अनंत गुणांनीं, जन्म कर्म अनंत नामानीं राम अनेक असून निरनिराळ्या युगांत राम जन्म घेत आलेले आहेत. रामाचा वेळोवेळीं अवतार होत राहील. नित्य निरंतर हें असेंच चालू राहील. अवतारकार्य केव्हांही समाप्त होणार नाहीं. तुलसीदासानं रामायणांत काय कमी फरक केला आहे? त्यांनीं किती स्वतंत्रपणें आणि धैर्यानें काम केलं आहे. प्रभु रामचंद्रांच्या चरित्रावर दोन प्रकारचे आक्षेप होते. शुद्र वध आणि सीतात्याग. ते दोन्हींही कथानकामध्यें पुसून निघाले आहेत. दोहोंचा त्यांत नामनिर्देश नाहीं. वाल्मिकीचे प्रभुरामचंद्रजी तर स्वर्गाला निघून गेले, पण तुलसीदासांचे रामचंद्रजी इथेंच कुठेंतरी बागेमध्यें वास करीत आहेत. रामायण पूर्ण झाल्यावर अयोध्येच्या बाहेर वनामध्यें बसलेले आहेत, त्याच ठिकाणीं सीतामाई पण आहेत, लक्ष्मणहि आहे, हनुमान देखील विद्यमान आहे आणि सारे कसे अगदीं आरामांत बसले आहेत.

## तुळसीदासाची दृष्टि

आपणांस वाटतं कीं तुलसीदासांनीं जणु जादूच केली आहे. इतर रामायणांत तें दिसून येत नाहीं. कृत्तिदासानें बंगालीमध्यें रामायण लिहिलं आहे. दुसरीकडे कंबनने लिहिलेल्या रामायणांत अरण्यकाण्ड, सुन्दर काण्ड, युद्धकाण्ड, फारच मोठें आणि तसेंच रसाळ पण आहेत. परन्तु तुलसीदासानं अरण्यकाण्ड किष्किंधाकाण्ड, युद्धकाण्ड या तिहींना अगदीं संक्षेपरूप दिलेलं आहे. मी देखील विचार करीत होतों की यांत काव्याचे कितीतरी प्रसंग असतांना त्यांकडे दुर्लक्ष करून तुलसीदासांनीं हें एवढं थोडक्यांत का आटोपलं. हें कोडं कांहीं मला सुचेना. परन्तु एके दिवशीं रात्रीं तुलसीदासांची कृपा झाली. माझ्या मनांत त्याचं उत्तर आलं. तुलसीदासजी रामसीतेच्या वियोग सहन करूं शकत नव्हते. आणि म्हणूनच अशा प्रसंगांना थोडक्यांत मांडण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे. राम-सीतेच्या विवाह प्रसंगाचं फार लांबलचक वर्णन केलेलं आहे. अरण्यांत जिथपर्यंत सीता प्रभु रामचंद्राबरोबर होती, त्या प्रसंगाचं देखील भरपूर वर्णन करायला गोस्वामीजी विसरले नाहींत; परंतु जेथें सीतेचा वियोग झाला ती गोष्ट तुळसीदासांना सहन झाली नाहीं. म्हणून तें फारच थोडक्यांत लिहिलं आहे. 'सियाराममय सब जगजानी'—सीताराम सर्वत्र भरलेले आहेत. तेच आमचे आई—वडील. आईवडीलांचं रहाणं मुलांना कसं सहन होऊं शकेल? तुळसीदासांनीं सीतामाईमार्फत आपली 'विनयपत्रिका' प्रभुरामचंद्राजवळ पोहोंचती केली आहे. एवढें आई-वडिलांचे

अद्वैत त्यांच्या मनांत होतें. म्हणून वियोगानें भरलेल्या भागाची त्यांनीं काटछाट केली आणि शेवटीं देखील त्यांचा वियोग होऊं दिलेला नाहीं. शेवटीं सांगून टाकलं कीं प्रभुरामचंद्रजी सर्वांसमवेत उपवनामध्यें विराजमान झालेले आहेत आणि आम्हां सर्व भक्तगणांचे प्रतिनिधी भक्त शिरोमणि नारदमुनी देखील तेथें आलेले आहेत.

## रामायणांतील रामनाम

तुळसीदासांनीं खरोखरच एका नव्या सृष्टीला जन्म देऊन एक सहज नाटक उभें केलें. तें अत्यन्त नीतिमान् काव्य आहे. त्यांत कोठेंहि मर्यादातिक्रमण झालेलें नाहीं आणि कविताशैली देखील वाखाणण्याजोगी आहे.

जसं तुलसीदास म्हणाले ‘ या रामायणांत अन्य कितीतरी दोष असतील, पण एक गुण मात्र यांत निश्चित आहे आणि तो म्हणजे ‘ रामनाम ’ आणि तो जसा मला शिरोधार्य आहे तसा इतरांनाहि होईल. ’ म्हणूनच म्हणतों कीं तुलसीदास महाकवि तर होतेच पण त्याहूनहि महान् भक्त होते.

तुलसीदासानीं रामाला परलोकांत पाठवलं नाहीं किंवा शंबूकवधहि दाखविला नाहीं. आणि सीतात्यागाबद्दलहि कुठं उल्लेख केला नाहीं. हा काय साधारण फरक आहे ! जसं आपल्या वाडिलानीं घर बांधावं अन् त्याला खिडकीच नसावी व शेवटी ती उणीव आपण भरून काढावी त्यांतलीच ही गोष्ट आहे. अशा प्रकारें अनेकांनीं (रामायणामध्यें) फरक घडवून आणला आहे. आपआपल्या काळांत लोक–हृदय शुद्धीसाठी जें जें परिवर्तन करणं आवश्यक होतं तें तें परिवर्तन केलं गेलं...आपल्याला देखील तो अधिकार आहे. आपल्या चित्तशुद्धीसाठीं ती कथा गातों, नाहींतर गाण्याची जरूरीच काय होती ! चित्तशुद्धीसाठीं ती आपल्याला मदत करते म्हणून तर आपण तिचं पारायण करतो, फार मोठा उपकार आहे रामायणाचा. आजपर्यंत तें आपल्याला प्रेरणा देत आलें आहे व पुढेंही देत राहील.

तुरुंगांत देखील भारतन् कुमारप्पाना हिन्दी शिकवावं लागत होतं. त्यांची मातृभाषा होती तामिळ आणि जवळ जवळ ते तो विसरूनच गेले होते. त्यांना इंग्रजी येत होतं. जेव्हां ते मजजवळ हिन्दी शिकण्यासाठीं आले त्यावेळीं मी त्यांना तुळसीरामायणांपासून हिन्दी शिकवण्याचा निश्चय केला. यासाठीं पहिल्याच व्याख्यानांत मी त्यांना तुळसीरामायणाबाबत सांगतांना स्पष्ट करून दिलं कीं, शेक्सपीयर आणि बायबल दोन्हींचं एकत्रीकरण म्हणजेच तुलसीरामायण ! शेक्सपीयर अत्यंत उत्तम साहित्याचा संकेत आणि बायबल म्हणजे अध्यात्माचा संकेत आणि तुळसीरामायणांत दोहोंचा मिलाफ झालेला आहे.

ही कथाच अशी आहे कीं लहान मुलांपासून तों मोठ्या स्त्रिया आणि ग्रामीण लोक ज्याच्यावर जास्त संस्कार झालेले नाहींत, अशांना देखील ऐकण्यांत व गाण्यांत मोठा आनंद वाटतो आणि ज्यांना खोलींत शिरण्याची संवय आहे अशांना तसं खोलीत शिरायला पण वाव मिळतो.

# गुरुशिष्य-संवाद

********************

**संसारार्णवघोरे यः कर्णधारस्वरूपकः ।**
**नमोऽस्तु रामकृष्णाय तस्मै श्रीगुरवे नमः ॥**

## भक्तिलाभाचा उपाय

**मास्तर :** ( नम्रपणें ) महाराज चित्त ईश्वराकडे कशानें लागेल ?

**श्रीरामकृष्ण :** सर्वदा नामस्मरण, निरंतर त्याचं गुणसंकीर्तन केलं पाहिजे. शिवाय सत्संग—भगवद्भक्त अथवा साधुसत्पुरुषांच्या चरणापाशीं अधुनमधून जायला हवं. रात्रंदिवस संसारांतच घुटमळत राहिल्यानें आणि सदासर्वदा वैषयिक भानगडींतच गढून गेल्यानं मन ईश्वराकडे लागत नसतं. म्हणूनच मधें मधें एकान्तवास करून त्याचं चिंतन करणं अत्यंत आवश्यक. सुरवातीला तरी मधूनमधून एकांतवास न केल्यास ईश्वरावर मन स्थिर ठेवणें फारच अवघड.

झाड जोपर्यंत रोप असतं तोपर्यंत त्याच्याभोंवतीं कुंपण घालावं लागतं एरवीं गाई बकऱ्या येऊन केव्हांच फन्ना उडवून टाकतील त्याचा.

ध्यान करावं मनांत, कोनांत ( कोपऱ्यांत ) नि वनांत. आणि नेहमीं सदसत् विचार करावा. एक ईश्वरच सत् म्हणजे नित्य वस्तु, आणि बाकी सर्व असत् म्हणजे अनित्य. वारंवार असा विचार करीत राहून अनित्य गोष्टी मनांतून काढून टाकाव्यात.

**मास्तर निम्रपणें :** संसारांत कशा तऱ्हेनें राहावें ?

**श्रीरामकृष्ण :** आपलं कर्तव्य पार पाडत असावं, मात्र मन भगवंताच्या चरणीं ठेवून, बायको, पोरं, आई, बाप साऱ्यांनाच घेऊन चालावं, त्यांची सेवा करावी खूप आपुलकीनं त्यांच्याशीं वागावं, पण मनाशीं मात्र पक्की खूणगांठ बांधून असावं कीं, ते आपले कुणीच नव्हत.

थोरामोठ्यांची मोलकरीण—मालकाचा सारा कामधंदा उरकते, पण तिचें मन मात्र गुंतलें असतं खेड्यांतल्या स्वतःच्या घरांत. मालकाच्या पोरांना अगदीं पोटच्चं समजून वागविते, 'सोन्या माझा बाळ' करून त्यांना आंजारते, गोंजारते पण जाणून मात्र पक्कं असतें कीं ही माझी कोणी म्हणतां कोणी देखील लागत नाहीं.

भक्ष्याच्या शोधांत कासवी भटकत असते पाण्यांत, पण तिचं मन असतं किनाऱ्यावर—जिथें तिचीं अंडी असतात तिथें. संसारांतील सर्व कामकाज करावं पण चित्त मात्र ठेवावं ईश्वराच्या पायाशीं.

ईश्वरभक्तीची जोड करून न घेतांच संसार करूं जाल तर, जास्तच गुरफटून पडाल. संकटाच्या माऱ्यानें कातावून जाल, शोकदुःखादिकांच्या भडिमारापुढें देखील

थोडा धीर धरवणार नाहीं. आणि विषय चिंतनांत जितके रमाल तितकी आसक्ति आणखीच वळावत जाईल.

हातांना आधी तेल माखा आणि मगच फणस कापायला घ्या. एरवीं चीक हातांना चिकटून जाईल. ईश्वर प्रेमाचं तेल मिळवून नंतर मग सांसारिक फणसास हात घाला.

परंतु ही भक्ति मिळविण्यासाठीं एकान्तवास करायला हवा. लोणी काढायचं झाल्यास एकीकडे विरजण घालावं लागेल. हालवा हालव केल्यानं दहीं चांगलं जमत नसतं. तर सारीं कामं सारून एका बाजूला दहीं घुसळावं लागेल. तेव्हांच कुठं लोणी हातीं येईल.

आणि हें बघा, असं निर्जनीं मन लावून ईश्वराचं ध्यान केल्यानं मनांत ज्ञान, वैराग्य, भक्ति उदय पावतात, पण संसारांतच पुरून ठेवलं तर तेंच मन नीच होऊन जातं.

संसार आहे पाणी, नि मन जणूं दूध, पाण्यांत मिसळून दिल्यास दूधपाणी एकजीव होऊन जातील. मग निर्भेळ दूध खटपट करून देखील हातीं लागायचं नाहीं. पण त्याच दुधाला विरजण लावून दहीं करून त्यांतून लोणी काढून मग तें पाण्यांत जरी ठेवलं तरी सुद्धां न मिसळतां वर तरंगू लागेल. एवढ्याच करतां निर्जन जागीं साधना करून अगोदर ज्ञानभक्तिरूप लोणी हस्तगत करून घेतलं पाहिजे. मग तें लोणी संसार जलांत सोडून दिलंत तरी सुद्धां त्यांत मिसळणार नाहीं. तरंगतच राहील.

ह्या बरोबर “विचार” करणं देखील अत्यंत आवश्यक आहे. कामिनी, कांचन अनित्य ईश्वर एकमात्र वस्तू पैशानं असं मिळून मिळणार तर काय ? खाणं–पिणं, कपडेलत्ते, राहायला जागा–बस इतकचं ना ? पैशांनीं परमेश्वर मिळणार नाहीं. म्हणूनच पैसा आयुष्याचें ध्येय होऊं शकणार नाहीं. ह्याचं नांव “विचार” समजलं ?

**मास्तर**—होय महाराज, नुकतंच मी “प्रबोध चंद्रोदय” नाटक पाहिलंय त्यांत आहे हा “वास्तु–विचार.”

**श्रीरामकृष्ण**—हं वास्तुविचार, हेंच पाहाना, पैशांतही काम आहे आणि सुंदर शरीरांतही आहे काय ? विचार करून पहा, सुंदर स्त्रीच्या शरीरांत देखील नुसती हाडं, मांस, चरबी, मल, मूत्र हींच भरलेली दिसतील. मग भगवंताला सोडून ह्या असल्या गोष्टीकडे कां बरं मन लावायचं ? कां बरं त्या दयाघनाचा विसर पडूं द्यायचा ?

## ईश्वर दर्शनाचा उपाय

**मास्तर :** ईश्वराचं दर्शन का खरोखर होऊं शकतं ?

**श्रीरामकृष्ण :** यांत काय संशय ? जरूर जरूर होऊं शकतं. त्यासाठीं मधून एकांतवास, त्याचं नामगुण–गान नित्यानित्य–वस्तु–विचार ह्याच साऱ्या उपायांचं अवलंबन करायला हवं.

**मास्तर :** कोणत्या अवस्थेंत त्याचं दर्शन घडत असतं ?

**श्रीरामकृष्ण :** खूप व्याकुळ होऊन रडल्यास त्याचं दर्शन होऊं शकतं. बायका पोरांकरतां रडून लोक घागर घागर टिपं गाळूं शकतात, पैशासाठीं आक्रोश करून डोळे सुजवूं शकतात, पण ईश्वराकरता कुणी रडला आहे ? त्याला अगदीं बेंबीच्या देठांपासून आळवा बघूं ?

इतकें बोलून श्रीरामकृष्ण पुढील आशयाचें गाणें म्हणूं लागले. " मना अगदीं अंतःकरणापासून त्या शामा मातेला आळवा बघूं, " " पाहा मग ती कशी राहूं शकते दर्शन दिल्यावाचून तें; ती कधींच 'राहूं शकणार नाहीं. मना तिच्या दर्शनाची खरोखरच तळमळ लागली असेल तर जवा आणि बिल्बदल ओंजळींत घेऊन त्यांना भक्तिचंदन ' ' माखून आईच्या पदीं अंजली दे. '

व्याकुळता आली कीं अरुणोदय झाला म्हणून समजा. त्यानंतर लवकरच सूर्य उगवेल. व्याकुळता उत्पन्न होण्याचाच अवकाश, मग दर्शनाला मुळींसुद्धां उशीर नाहीं.

तीन प्रकारच्या ओढींची शक्ति एकत्र झाल्यास ईश्वर दर्शन देतो. विषयी माणसांची विषयसंबंधीची ओढ, आईची मुला साठीची आणि सतीची पतीसाठीची. ह्या तीन ओढी कुणा एखाद्यांत एकाच वेळीं उद्भवतील तर त्या जोरावर ईश्वराचं दर्शन करून घेणं शक्य आहे.

एकुण काय कीं ईश्वरावर प्रेम करायला हवं. आई जशी मुलावर, सती जशी पतीवर नि विषयी जसा विषयांवर प्रेम करतो, तसं प्रेम त्याच्यावर केलं पाहिजे. ह्या तिघांची प्रीति. या तीन जणांची ओढ एक करून जितकें होईल, तितकं आकर्षण जर ईश्वराविषयीं वाढूं लागेल तर अवश्य, अवश्य त्याची भेट होईल.

व्याकुळ होऊन त्याचा धांवा केला पाहिजे. मांजरीच पिलूं नुसत मँव मँव करीत राहतं. आईला हांका मारणंच त्याला माहीत. जिथं आई ठेवील तिथं तें राहत. कधीं सैंपाकघरांत, कधीं खालीं जमिनीवरच, तर कधीं बिछान्यावर, ती ठेवते आणि तें राहतें. त्रास होऊं लागला कीं तें फक्त म्यँव मँव करून हांका मारतें, बस. दुसरं तिसरं त्याला कांहीं ठाऊक नसत. अन् त्याची आई देखील कुठेंही कां असेना, पिलांचा आवाज कानावर पडला रे पडला कीं, आपली तडक येऊन हजर.



अभिप्राय—

# हंसत खेळत मनाची ओळख

[ लेखक : **द. पां. खांबटे**; प्रकाशक—**केशव कोठावळे**, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४; मूल्य **दोन रु.** ]

सुप्रसिद्ध लेखक श्री. द. पां. खाम्बेटे यांनीं मनुष्याच्या शरिरांत वास करणाऱ्या मनाच्या विविध लीलांचा परिचय करून देण्याच्या हेतूनें मानसशास्त्रासंबंधीं अनेक दाखले ठिकठिकाणीं देऊन हें ११२ पानी पुस्तक अत्यंत सुलभ भाषेंत लिहिलें आहे. आमच्या सर्व दुःखांचें मूलभूत कारण शरिरांत वास करणारें मनच होय. मनुष्याला बंधनांत ठेवणारें व स्वातंत्र्यांत विहार करायला लावणारें मनच होय. परंतु सर्वसाधारण लोकांना या मनाचे व्यापार सहसा समजत नाहीं. आमच्या साधुसंतांनीं मनावर ताबा ठेवण्याचा व एकाग्रता साधण्याचा सदुपदेश केला आहे व उपाययोजनाहि सांगितली आहे. वाऱ्याप्रमाणें सैरावैरा धांवणाऱ्या मनाला लगाम घालणें व त्याच्याकडून हुकमी कार्य करून घेणें हें मोठें दुर्घट कार्य आहे; परंतु संतांनीं तें साध्य केलें आहे. मनाचे व्यापार समजून घेणें अतिशय जरूर आहे. पाश्चात्य देशांतील मानसशास्त्रवेत्त्यांनीं या विषयावर अमाप ग्रंथसंपदा निर्माण करून ठेविली आहे. आपल्याकडे मात्र त्या विषयावर फारशी ग्रंथसंपत्ति नाहीं. श्री. खांबेटे यांनीं मराठी वाचकांसाठीं व त्यांच्या मनांत मनाच्या माहितीसंबंधीं जिज्ञासा उत्पन्न करण्याच्या हेतूनें हा प्रयत्न केला असून तो चांगला साधलेला आहे.

ज्या मानसिक स्थितीवर आपलें सुखदुःख, यशापयश अवलंबून आहे, ज्यामुळें या जगांतील अशक्य गोष्टी साध्य करून दाखवितां येतात, त्या मनाचे व्यापार तरी कसे चालतात, त्याच्या भराऱ्या व उड्डाणें कशा प्रकारचीं असतात हें समजून घेणें प्रत्येकाचें कर्तव्य असतें परंतु अशा गोष्टीकडे आम्हीं लक्ष देत नाहीं. तें देणें मात्र जरूर आहे.

आपल्या मनाचे धागेदोरे, भावनांचे आघात, तुम्हांला असें भय आहे का ? तुम्हीं मत्सरी आहांत कां ? आपल्या स्वप्नांचा अर्थ, विसरभोळ्याचें मानसशास्त्र वगैरे बारा प्रकरणांत मनाच्या व्यापारांची व उलाढालींची माहिती अनेक उदाहरणांच्या सहाय्यानें व सहज समजेल अशा रीतीनें करून देण्यांत आली आहे. हें पुस्तक मानसशास्त्र-विषयक असलें तरी तें वाचीत असतां कंटाळा येत नाहीं. अधिकाधिक वाचन करावें असेंच वाटतें. लेखकानें शास्त्रीय विषयाचें उद्बोधन जास्तींत जास्त सुलभतेनें केलें आहे. विषमप्रतिपादनाची ही सुलभता व विषयाचें नावीन्य यामुळें या पुस्तकांचें वाचन अनेकांकडून होईल व मनासंबंधीं जिज्ञासा निर्माण करण्याचा लेखकाचा हेतु सिद्धीस जाईल असें आम्हांला वाटतें.

———




# मार्च १९६१ शिर्डीवृत्त

या महिन्यांत बाहेरगांवचे भक्तांची गर्दी श्रीसाई दर्शनासाठीं नेहमीप्रमाणें होती. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली. ती खालीलप्रमाणें—

**कीर्तन**:—सं. गवई मराठे. ४ कीर्तनें केलीं, दोन एकादशी प्रीत्यर्थ व एक श्रीरामदासनवमी प्रीत्यर्थ व एक महाशिवरात्र प्रीत्यर्थ अशीं केली.

**प्रवचन**:—श्री. दिगंबर महादेव कुलकर्णी, सातारा.

**नृत्य**:—कु. उषा ठाकूर, कु. विजया ठाकूर, श्री. राजेंद्र धाग, श्री. लक्तीव श्री. विरबाला, भारती नृत्य ताडदेव मुंबई मास्तर गुलू–मुंबई ( लंगडा नृत्यवाला )

**बांसरीवादन**:—पी. एस. खोपकर, मुंबई.

**गायन**: सौ. कुमुद मुंडकूर, धी लॉरेन्स स्कूल होनावर; श्री. दत्तोबा तावडे, मुंबई; श्री. पुरुषोत्तम कोठेकर, परभणी ( मराठवाडा ); श्री. बाबुराव नरोडे, कोपरगांव; मास्तर अमिचंद, मुंबई; कु. सरस्वती लाखे, खेड ( पुणें ); श्री. होनाजी लाखे, श्री. दत्तात्रय लाखे, मु. खेड ( पुणें ).

महाशिवरात्रीनिमित्त श्रींचे पालखीची गांवांतून मिरवणूक व रात्रौ कीर्तन.

ता. १९।२।६१ रोजीं श्री. जे. बी. मेहता यांनीं त्यांचे मुलीचे विवाहाप्रीत्यर्थ श्रीसाईस महापूजा व दिपोत्सव ( दिव्यांची रोषणाई श्रींचे कळसावर व इतर ठिकाणीं ) त्यांनीं वरील सर्व खर्चाची रक्कम पाठविल्यामुळें करण्यांत आली.



प्रेस ॲक्टनुसार सादर करावयाची माहिती

तक्ता क्रमांक ४

# श्री साईलीला

## मालकी व तत्संबंधीं इतर तपशील

१ **प्रकाशन स्थळ :** 'साई निकेतन', व्हिन्सेंट रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

२ **प्रकाशनाचें स्वरूप :** मासिक.

३ **मुद्रकाचें नांव :** शरद कृष्णाजी सापळे.

**राष्ट्रीयत्व :** भारतीय.

**पत्ता :** रुक्मिणी निवास, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.

४ **प्रकाशकाचें नांव :** गो. वि. क्षीरसागर ( रिसीव्हर )

**राष्ट्रीयत्व :** भारतीय.

**पत्ता :** 'साई निकेतन', व्हिन्सेंट रोड, खोदादाद सर्कल जवळ. प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

५ **संपादकाचें नांव :** गो. वि. क्षीरसागर ( रिसीव्हर )

**राष्ट्रीयत्व :** } वरीलप्रमाणें
**पत्ता :** }

६ **पत्राची मालकी :** श्रीसाईबाबा शिरडी संस्थान
व्यवस्थापक रिसिव्हर—गो. वि. क्षीरसागर.

**पत्ता :** वरीलप्रमाणें.

मी गो. वि. क्षीरसागर असें जाहीर करतों कीं, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणें खरा आहे.

**प्रकाशक**

**गो**

# श्रीसाईनाथ वाचनालय, शिरडी

## भक्तांनीं दिलेलीं देणगी पुस्तकें

| अ.नं. | भक्तांची नांवें | पत्ता | पुस्तकें | पुस्तकांचीं नांवें |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. शिवाजी एम्. शेटे | राहुरी | २ | दुधाची घागर<br>चतुर बिरबल |
| २ | ,, वामन पी. पटेल | अहमदाबाद | १ | श्रीसाईबाबा चरित्र ( गुजराथी ) |
| ३ | ,, के. एल. पुराणिक | पुणें | २ | श्रीसद्गुरुपदबोध<br>श्रीउपासनी महाराज |
| ४ | ,, शिवनेस स्वामी | कोईमतुर | १ | सायन्स ते समाधि |
| ५ | ,, व्ही. आर. दळवी | मुंबई | १ | लोक–नीति |
| ६ | ,, एस. एस. बोरकर | पुणें | ६ | इंग्लिश पुस्तकें |
| ७ | ,, पु. बा. कुलकर्णी | मुंबई | १ | श्री. दादासाहेब परुळेकर यांच्या आयुष्यांतील आठवणी |
| ८ | ,, हनुमानप्रसाद पोद्दार | गोरखपूर | १ | कल्याण–संक्षित योगवासिष्ठ अंक |
| ९ | रावसाहेब तात्याजी गोंदकर | शिर्डी | १ | रेमीनी सेन्सेस ऑफ लेनीन (इं.) |
| १० | दिवाळी अंक वाचक मंडळ | ,, | ५ | महर्षि श्रीयोगीश्वर याज्ञवल्क्य चरित्र<br>श्री गुते गजानन महाराज चरित्र<br>श्री माणिक प्रभू चरित्र<br>श्री बीडकर महाराज चरित्र<br>धवलगिरि–ग्रंथ |
| ११ | श्री. शा. द. नागरे | शिर्डी | १ | श्री नृसिंह स्वामी चरित्र |

---


**जैसें डोळयां अंजन भेटे । ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे ॥**
**मग वास पाहिजे तेथें प्रगट । महानिधी ॥** ज्ञानेश्वर.

हीं कदाचित् कविकल्पना असेल—पण डोळे काळजीपूर्वक तपासून अचुक चष्मा बनवून घेतल्यास, शतायुषी झालांत तर दृष्टि स्वच्छ रहाते हें सत्य आहे.

याकरितां **निर्दोष चष्मे** बनविणार

# शेंडे आणि कंपनी

**बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४.** यांचा सल्ला घेऊन निर्धास्त रहा.

बाहेरगांवीं फ्रेम्स, लेन्सिस् व प्रिस्क्रिप्शनप्रमाणें चष्मे बनवून ऑर्डरप्रमाणें पाठवूं.





तारेचा पत्ता : 'ABHAY' Hyderabad. टेलिफोन नं. ४६३८

## हैद्राबाद सॅनेटोरियम

**खास क्षयरोग्यांसाठीं !**

हवेशीर आधुनिक सुखसोयींनीयुक्त अत्यंत माफक दर असलेलें व साईभक्तांनीं चालविलेलें एकमेव ठिकाण.

पुण्याहून रेल्वेनें फक्त बारा तासांचा प्रवास.

**गरीब साईभक्तांसाठीं खास सवलत**

विशेष माहितीकरितां खालील पत्त्यावर लिहा:—

**सुपरिंटेंडेंट हैद्राबाद सॅनेटोरियम,**
**रमतापूर, हैद्राबाद ३. [ आंध्र प्रदेश ]**



